Peer reviewed Journal Impact Factor: 7.265 ISSN-2230-9578

# Journal of Research and Development









*A Multidisciplinary International Level Referred Journal*

***June 2022 Volume-14 Issue-6***

**Chief Editor**

***Dr. R. V. Bhole***

*'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.)*



**Address**

'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

# Journal of Research and Development

***A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal***

## *June-2022 Volume-14 Issue-6*

**Chief Editor**
Dr. R. V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

| EDITORIAL BOARD | | |
|---|---|---|
| ***Nguyen Kim Anh***<br>***[Hanoi] Virtnam*** | ***Prof. Andrew Cherepanow***<br>*Detroit, Michigan [USA]* | ***Prof. S. N. Bharambe***<br>*Jalgaon[M.S]* |
| ***Dr. R. K. Narkhede***<br>***Nanded [M.S]*** | ***Prof. B. P. Mishra,***<br>*Aizawal [Mizoram]* | ***Prin. L. N. Varma***<br>*Raipur [C. G.]* |
| ***Dr. C. V. Rajeshwari***<br>***Pottikona [ AP]*** | ***Prof. R. J. Varma***<br>*Bhavnagar [Guj]* | ***Dr. D. D. Sharma***<br>*Shimla [H.P.]* |
| ***Dr. AbhinandanNagraj***<br>***Benglore[Karanataka]*** | ***Dr. VenuTrivedi***<br>*Indore[M.P.]* | ***Dr. ChitraRamanan***<br>*Navi ,Mumbai[M.S]* |
| ***Dr. S. T. Bhukan***<br>***Khiroda[M.S]*** | ***Prin. A. S. KolheBhalod***<br>*[M.S]* | ***Prof.KaveriDabholkar***<br>*Bilaspur [C.G]* |

**Published by**-Chief Editor, Dr. R. V. Bhole, (Maharashtra)

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

## CONTENTS


| Sr. No. | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1 | अविनाश ओगले यांच्या कवितेचे स्वरूप<br>**प्रा. अशोक रघुनाथ आलगोंडी, प्रा. डॉ. विनोद गायकवाड** | 1-7 |
| 2 | जागतिक स्तरावर कोविड-१९ मुळे संक्रमित मानवाची आणि मानवी मृत्यूची स्थिती (विशेष संदर्भ- डिसेंबर२०१९ ते जानेवारी२०२२)<br>**प्रा. डॉ. तायनाथ व्ही.पी.** | 8-10 |
| 3 | भारतीय विधीगीतातील स्त्रीचित्रण<br>**प्रा.डॉ.दत्तात्रय लक्ष्मण फलके** | 11-14 |
| 4 | मराठी महाकवि वसन्त त्र्यम्बक शेवड़े प्रणीत ‘अभिनव मेघदूत‘ गीतिकाव्य में प्रियसी चिन्तन एक समीक्षात्मक अध्ययन<br>**डॉ. हंसराज मीना (काबरा)** | 15-20 |
| 5 | “कथाकार प्रा.माधव सरकुंडे यांच्या ‘ताडमं’ या कथा संग्रहातील व्यक्ती चित्रण”<br>**श्री. चेपूरवार गंगाधर नरसिंगराव** | 21-25 |
| 6 | श्री अरविन्द की दिव्य जिवन की अवधारणा तथा अतिमानस संकल्पन संबंधी एक विवेचन<br>**Dr. Narendra V Raghatate** | 26-31 |
| 7 | साहित्य में चित्रित किसान<br>**श्रीमती कंचन चौरसिया** | 32-34 |
| 8 | पंचायती राज संस्था की महिला सशक्तिकरण में भूमिका मध्यप्रदेश के बालाघाट जिले के विशेष संदर्भ में<br>**कांता वर्मा डॉ सुनील कुमार जांगिड़** | 35-40 |
| 9 | महिला सक्षमीकरण<br>**प्रा. डॉ. शितोळे अनिल विजय, गायकवाड प्रतिभा शिवाजी** | 41-45 |
| 10 | ‘प्राचीन भारतीय राजनीति और शासन’<br>**खेमराज आर्य** | 46-50 |
| 11 | पुनर्वसनाचे शासनाचे धोरण व शिवना टाकळी प्रकाल्पग्रस्तांचे वास्तव<br>**प्रा. नंदकुमार कुकलारे** | 51-59 |
| 12 | लोकमान्य टिळकांचे राष्ट्रीय शिक्षणविषयक विचार<br>**डॉ. रमाकांत शिवाजीराव शातलवार** | 60-62 |
| 13 | हवामान बदलाचा महाराष्ट्रातील कापूस उत्पादनावर होणारा परिणाम<br>**डॉ. दिलीप फोके** | 63-64 |
| 14 | डॉ. आंबेडकरांचे राष्ट्रीय जलधोरणातील योगदान<br>**अमरदिप दामोधर रामटेके** | 65-68 |
| 15 | **کشمیری زبان میں صحافت**<br>**میرسجادحُسین (گلشن پورہ ۔ ترال،کشمیر)** | 69-71 |
| 16 | शाश्वत विकासाची उद्दिष्टे आणि भारताची कामगीरी : एक दृष्टीक्षेप<br>**प्रा.डॉ.पी.आर.मुठ्ठे प्रा.डॉ.एस.डी.आवाळे** | 72-76 |
| 17 | लोकमान्य टिळकांचे राजकीय विचार आणि धोरण<br>**कुणाल दिलीप राठोड** | 77-81 |
| 18 | बँकांमधील कर्ज योजनेचा उपयोग सर्वसामान्य व्यक्तीने कसा करावयाचा<br>**प्रा. मनोहर नारायण मोरे** | 82-83 |
| 19 | डॉ. बी.आर. अम्बेडकर का शैक्षिक दृष्टिकोण<br>**डॉ. सुरेखा पिपलानी** | 84-87 |
| 20 | राष्ट्रीय शिक्षा नीति २०२० के सन्दर्भ में विद्यालयी पाठ्यचर्या में ”लोकल फौर वोकल की उपादेयता“।<br>**रवीश चन्द्र पचौली** | 88-89 |
| 21 | सिविल सेवा के छात्रों का जीवन संघर्ष: डार्क हॉर्स<br>**डॉ. वृषाली विकास मिणचेकर** | 90-93 |
| 22 | नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कादंबरीतील शेतकरी जीवनदर्शन !<br>**प्रदिप केशव चापले** | 94 -99 |
| 23 | हवामान बदल समस्या, आव्हाने व उपाय<br>**प्रा. चंदनशिवे वर्षा वैजनाथ** | 100-103 |

| | | |
|---|---|---|
| 24 | आंबेडकरवादः एक विद्रोही दर्शन<br>**प्रा. डॉ मंगल ससाणे** | 104-107 |

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, June 2022, Volume-14, Issue-6

# 'अविनाश ओगले यांच्या कवितेचे स्वरूप'

**प्रा. अशोक रघुनाथ आलगोंडी[1] प्रा. डॉ. विनोद गायकवाड [2]**

[1]मराठी अभ्यास व संशोधन केंद्र राणी चन्नम्मा विद्यापीठ, बेळगावी

[2] प्रमुख, मराठी विभाग अधिष्ठाता, कला शाखा राणी चन्नम्मा विद्यापीठ, बेळगावी

**सारांश:** कृ. ब. निकुंब, इंदिरा संत, शंकर रामाणी, यासारख्या बेळगावमधील श्रेष्ठ कवींनी मराठी काव्य वाङ्मयात मौलिक भर घातली आहे. इंदिरा संतांच्या जाण्याने बेळगावच्या काव्य क्षेत्रात निर्माण झालेली मोठी पोकळी भरून काढण्याचे कार्य अविनाश ओगले यांनी केले आहे. गझल, चारोळी, वृत्त, गेय कविता, मुक्तछंद, विडंबन या सारख्या सर्वच काव्य प्रकारात अविनाश ओगले यांनी विपुल असे लेखन केले आहेतेव्हा ,स्वतःचं असं एक वेगळं भाव विश्व त्यांच्या काव्यातून उभं राहतं . रचना यसहज आणि साधी शब्द .ती भाव वृत्ती केवळ त्यांची रहात नाही तर ती वाचकांची स्वतःची बनून जातोमुळे कवितेमधला आशय समजण्यास वाचकाला फारसा बुद्धीवर ताण द्यावा लागत नाहीपरंतु काव्यातून व्यक्त होणारा . याची प्रचीती त्यांनी लिहिलेल्या असंख्य .कवीचा मनोव्यापार लक्षात घेता कवी म्हणून अविनाश ओगले अलौकिक ठरतात ,चारोळ्या ,कविता विडंबन' .गझल यामधून होते ,थेंब टपोरेमध्ये प्रकाशित १९९४ हा त्यांचा पहिला कविता संग्रह ' झालाय. या टपोऱ्या थेंबाच्या प्रारंभाने ओगले यांनी काव्य प्रांतात स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली त्यानंतर . ) 'चषक माझा'चंद्रशेखर गोखले यांच्या केलेले व या चारोळी संग्रहाचे चषकीय दृष्टीने 'मी माझा'िडंबनहा ( विडंबन चारोळी संग्रह १९९६ मध्ये आलाया व्यतिरिक्त त्यांच्या कविता .मध्ये प्रकाशित झाला २००४ कवितासंग्रह 'काजवा' तर . त्यांचे हे विखुरलेले लेखन .दैनिकातून प्रकाशित झाल्या होत्या ,अनेक दिवाळी अंकातून ओगले कुटुंबीयांनी 'रंग मनाचे' या 'बप्रतिबिं' आणिदोन संग्रहातून एकत्रित केले आहे .

खऱ्या अर्थाने ओगले यांना कविता सापडली होतीते ,कविता त्यांच्या जीवनाशी इतकी एकरूप झालेली होती की . मी शब्दांशिवाय काहीही देऊ' स्वतः म्हणत असत नाही शकतसंग्रहाच्या अर्पण पत्रिकेत म्हटले 'काजवा' म्हणूनच त्यांनी ' ,आहे

"कवी शब्दांशिवाय काहीही मिळवू शकत नाही.
कवी शब्दांशिवाय काहीही साठवू शकत नाही.
कवी शब्दांशिवाय काहीही देऊ शकत नाही'.'[१]

गझल आणि विडंबन हा त्यांचा अत्यंत आवडता प्रांतआणि नंतरच्या काळात त्यांनी असंख्य गझला , असे असले तरी .विडंबनं लिहिली सामाजिक, वैचारिक, कौटुंबिक, निसर्गवर्णनपर, चिंतनपर, आई अशा आशयाच्या अशा असंख्य कविताही त्यांनी लिहिल्या आहेत. समाजात घडणाऱ्या अघटित घटना पाहून कवीचे मन अस्वस्थ होतं आणि हा अस्वस्थपणा कवीला बेचैन करत राहतोत्याला शब .्दांतून व्यक्त व्हावं लागतं. ओगले यांच्या व्यक्तित्वाबद्दल सांगताना डॉ. विनोद गायकवाड म्हणतात, "ओगलेंचे व्यक्तिमत्व बहिर्मुखी विनोदी आणि अंतर्मुखी गंभीर, चिंतनशील होते."[२] हेच त्यांचे व्यक्तिमत्व त्यांच्या कवितेत उमटलेले पाहायला मिळते. त्यांच्या केवळ गंभीर कवितांचा विचार करताना निसर्गवर्णन, सामाजिक, चिंतनशील, वैचारिक, कौटुंबिक, शैक्षणिक-वैज्ञानिक विषयांवरच्या कविता आढळतात.

**१-निसर्गवर्णनपर कविता .**

कृइंदिरा संत यांच्याप्रमाणेच अविनाश ,निकुंब.ब. ओगलेंच्या कवितेत देखिल निसर्गाचे सौंदर्य आणि बेळगाव परिसर .उमटल्या आहेत त्याच्या विविध छटा आणि बेळगावला लागून असलेला खानापूर, तिलारी, चंदगड वगैरे भाग हा निसर्ग सौंदर्याने नटलेला आहे . अगदी आल्हाददायक वातावरण तीनही ऋतूत ,विविध प्रकारची औषधी वनस्पती .अनुभवायला मिळते पावसात ,फुलांनी बहरलेली झाडे-फळा ,घनदाट जंगले टपोऱ्या थेंबांचा पाऊस आणि ,धबधबे फेसाळणारे रात्रीच्या वेळी लुकलुकत चमकणारे काजवे यांची भुरळ कवीला पडली नाही तरच नवलम्हणूनच की काय . अविनाश ओगले यांच्या कवितेत हा सारा निसर्ग शब्दबद्ध झालेला आहे.

पाऊस आणि थेंब यांचे त्यांना भलतेच अप्रूप असलेले दिसतेत्यांच्या थेंब टपोरे या पहिल्याच . कवितासंग्रहातील'थेंब टपोरे' शीर्षक कवितेत ते म्हणतात,

"थेंब टपोरे टपोरे
खाली आसुसली माती
मातीच्या गं अंगावर
लक्ष रोमांच फुलती."[३]

कित्येक दिवस थेंबासाठी आसुसलेली मातीटपोरे , रोमांच थेंब अंगावर झेलते तेव्हा मातीच्या अंगावर नवा माती त्या स्पर्शा .फुलतोने शहारून जातेहे जे थेंब . आहेत ते पानापानांमधून वाजत राहतात आणि

फुलांच्या पाकळयांना झुलवतात तेव्हा ते जणू मोतीच असल्याचा भास कवीला होतोते एवढेच नाही तर . कवीच्या मनाला- देहाला त्या टपोऱ्या थेंबाचा गंध मोहून जातोगंध उरात साठवून घेतला तरी कितीही हा . इतक्या .त्याच्या स्मृतींनी डोळयास डोळा लागत नाही त्या स्मृती ताज्या होऊन जातात.

अविनाश ओगले यांच्या कवितेतला पाऊस अनेक दृश्य प्रतिमा घेऊन शब्दबद्ध झालेला आहेपाऊस हा . निसर्गाचा एक अविभाज्य घटक असल्याने त्यांच्या अनेक कविता निसर्गाचे पाऊस या विषयावरच्या किंबहुना पावसामुळे निसर्गात बदलाचे संचित उलगडून दाखवितात,मग कधी तो पाऊस घराचे छप्पर उडवितो . तर कधी प्रेयसीची पावसात ,कधी मातीत मृद्गंध पसरतो झालेली भेट या साऱ्यांची आठवण पावसाच्या .आगमनातून कवीला होते

पावसाचं आणि कवींच अतूट नातं असतंकवीने . पावसात एकही कविता लिहिली नाही असे होणे शक्यच पावसाळयात तर कव .नाहीींच्या प्रतीभेला उधाण आलेले दिसतेधो धो कोसळणाऱ्या पावसाप्रमाणे . याच कवींच्या प्रवृत्तीवर ओगले मार्मिक .कविता येतात .टिप्पणी करतात पाऊस आल्या आल्या कवींच्या कविता देखिल पावसासारख्या येतात आणि मग सामान्य लोकांची चिंता वाढतेकवींच्या या स्वभावावर ओगले . भाष्य करतानाच पाऊस आल्याने नवा रेनकोट घ्यावा लागतो ही सर्वसामान्यांची बाजूही मांडतात .

रम्यउत्साहपूर्ण असा हा पावसाळा ,आनंददायक , गळणाऱ्या घराच्या .अनेकांना चिंतेचा वाटतो रातून डोक्यावर पडणाऱ्या धारा काळजीने मन छप्प ,जळायला लागते म्हणून ते पुढे म्हणतात

"पावसानं आधी आमचं छप्पर उडवलं
मग आमची पार दाणादाण उडविली.
माणसंकापडं सगळंच चिंब भिजलं ,चूल ,
छातीशी हात बांधून बसून राहिलो आडोशाला
उपाशी पोटानं.कुडकुडत ,काकडत ,"४

डोक्यावरचं छप्परचं जेव्हा पावसाने उडतं तेव्हा त्यांची झालेली दयनीय अवस्था कवी शब्दातून व्यक्त करतो .'काजवा' या संग्रहातील त्यांची 'पाऊस' ही कविता वैशिष्ट्यपूर्ण आहे. या कवितेतून अविनाश ओगले यांची सौंदर्यवादी भावना व्यक्त होते. ही दीर्घ कविता असून ती एकूण नऊ तुकड्यात लिहिली आहे. प्रत्येक तुकडा एक स्वतंत्र कविताच आहे. पावसाचं आणि आपल्या सहचारिणीचं नातं मांडत असताना अविनाश ओगले यांनी आपले स्वतःचे आणि कवितेचे भावबंधही उलगडले आहेत. निसर्गातील विविध गोष्टी अविनाश ओगले यांच्या कवितेत चित्रित झालेल्या आहेत . 'झाडांच्या मुळांना मला एकदा विचारायचंय ...या कवितेत कवी 'झाड' हे रूपक घेऊन व्यक्त होतात. झाडाचं उध्वस्तपण आणि माणसाचं उध्वस्तपण अशा समान दृष्टिकोनातून त्यांची कविता पाहताना दिसते.

वाढत्या शहरीकरणामुळे जंगलेच्या जंगले उद्ध्वस्त झाली आहेतजो काही निसर्ग शिल्लक . निसर्गाच्या या .केवळ कवितेत राहिला आहे तो उद्ध्वस्तीकरणाविषयी अविनाश ओगले यांचे कविमन कमालीचे अस्वस्थ होते. एक फक्त झाड तोडले जाते पण त्या एका झाडाच्या कत्तलीने कवीच्या आयुष्याचा एक लचकाच तोडून नेल्यासारखा वाटतो' .झाडया कवितेत ' ,कवी सांगतात

"वारा घुमायचा पानापानातून, पाने नाचायची,
डोलायची,
पानापानांचे ते सुखद हुंकारआता कायमचे विरून ,
.गेले
पाऊस थांबल्यावरचिंब भिजल्या पानांतून ,
थेंबाथेंबाने टपटपणारे धुंद संगीत.कायमचे संपले ,
रात्रीच्या शांतवेळी पानांच्या सळसळीची
कशी उबदार जाग असायची.
आता साऱ्या रात्री कशा भयाण शांत होतील'."५

झाड तोडताना केवळ एक झाड तोडले जात नसून त्या झाडाशी असलेला निसर्गाचा ऋणानुबंध तोडला जातो .हा कवीचा अस्वस्थपणा इथेच थांबत नाही . कवीला वाटते त्यांच्या बाबतीत ऋतुचक्र फिरायचे जणू आता त्यांच्या आयुष्यात वसंतच .थांबले आहे .व्यक्त करतात फुलणार नाही अशी अगतिकता ते

अविनाश ओगले यांच्या कवितेत जसा पाऊस अनेक विविधांगी अनुभव घेऊन येतोतसा तो , अनैसर्गिक गोष्टीही घेऊन येतोनिसर्गातील प्रत्येक . घटकाला नैसर्गिकपणेच घडू द्यावे तरच त्याची अनुभूती पक्ष्यांना .घेण्याचा आनंद कमालीचा आनंदायी असतो आले मुक्तपणे संचार करता पाहिजे. यातून ओगले यांची कविता निसर्गाच्या बदलाची मीमांसा करते.

**२. सामाजिक आणि वैचारिक कविता-**

साहित्य हा समाजाचा आरसा असतो असे म्हटले जातेकादंबरी किंवा अन्य साहित्य ,कविता ,कथा . ,समाजमनाचा स्वभाव ,प्रकारातून समाजाची वास्तवता प्रश्न इत्यादींचे चित्रण समाजातील शोषित घटकांचे कविता तर समाजाच्या बदलांचे उत्तम .झालेले असते अविन .संचित आहोश ओगले यांची कविता या बदलाच्या संचितात नसली तरी ती समाजाची वास्तव स्थिती प्रकट करताना दिसतेकवीला समाजाविषयी . कळवळा आहे आणि हा समाजाविषयी असलेला त्यांचा या 'रंग मनाचे ,काजवा ,थेंब टपोरे' कळवळा त्यांच्या .संग्रहातील बहुतेक कवितांमधून प्रत्ययास येतो

"ओगलेंची सामाजिक कविता सध्याच्या काळातील सामाजिक परिवर्तनाची नोंद घेते, परिणामी कवितेतून त्या विषयीच्या नोंदी उमटतात."[६] हे डॉ चंद्रकांत पोतदार यांचे ओगलेंच्या कवितेबद्दलचे मत महत्वाचे वाटते.

जगात माणसांची गर्दी वाढली खरी पण माणुसकी हरवत गेलेली पहायला मिळतेमाणूसच माणसाचा . अरण्यांची जपणूक व्हावी .मोठा शत्रू झालेला आहे तसे एक माणसांचे .म्हणून अभयारण्ये निर्मिली आहेत .अभयारण्य हवे असल्याचे अविनाश ओगले सांगतात

"आता हवंय एक माणसांचे अभयारण्य
जिथं असेल अभय माणसाला माणसापासून
तिथं नसतील माणसांवर जातीपातींचे शिक्के,
दाण्या दाण्यांवर नसतील खाणाऱ्यांची नावे,
स्वच्छंद पक्ष्यासारखे राहता येईल आपल्याला
कुठल्याही झाडाच्या फांदीवर'.'[७]

जिथे माणसापासून माणसाला कसलेच भय नसेल तसे एक फक्त माणसांचे अभयारण्य कवीला हवे आहे . पातीत विभागला जाऊन उच्च नीच -आज माणूस जाती भाव -असा कुठलाच भेद .भेदापायी भ्रष्ट झालेला आहे नसलेले मुक्त पक्ष्यांसारखे स्वच्छंदी राहता येईल असे माणसांचे अभयारण्य अविनाश ओगले यांना अभिप्रेत आहे , नसेलया अभयारण्यात कसलीच कुणाशी स्पर्धा . स्वार्थ नसेल ,मत्सर नसेलभांडणे आणि हेवेदावेही , .नसतील असा आदर्श समाज ओगले यांना हवा आहे कवीची समाजाप्रती असलेली सामाजिक जाणीव .आत्मीयता यातून स्पष्ट होते

या आधी म्हटल्याप्रमाणे माणसांची गर्दी वाढली आहे .या गर्दीत माणूस स्वतःलाच हरवत चालला आहे . सुविधा आ-अत्याधुनिक सोयीणि संशोधनामुळे माणसाचे जीवन सुखदायी झाले आहे ,मोबाईल . .इंटरनेटमुळे तर जग अगदी जवळ येत चाललंय जगभरात कुठे काय चाललंय हे आपणास घर बसल्या असे असताना आपण .एका सेकंदात समजू शकते आपल्याच माणसांपासून ही ,दूर जात आहोत (घरातील) म्हणून ,अधिकच जाणवते खदखद कवी मनाला अविनाश ओगले या 'जग किती जवळ येत चाललंय' ,कवितेत म्हणतात

"जग किती जवळ जवळ येत चाललंय
जगभरातल्या माझ्या मित्र मैत्रिणींशी
मी मोबाईलवर मनमुराद बोलत असतो तेव्हा,
माझे म्हातारे वडील माझ्याकडे खूप आशेने पहात असतात
कीशब्द थेटच बोलेन त्यांच्याशीही मी दोन ,
.म्हणून"[८]

.

अविनाश ओगले यांनी परिवर्तन या कवितेमधून परिवर्तनाचा झालेला परिणाम व त्याची दुसरी बाजू स्पष्ट केली आहेसमाजातील तीन क्षणचित्रे त्यांनी . ही क्षणचित्रे वाचकाला .शब्दातून रेखाटली आहेत .वैचारिक डोस दिल्याशिवाय राहात नाहीत संगणकाप्रमाणे कोरड्या झालेल्यामाणसाच्या भावना पाहून बँकेचे खऱ्या अर्थान संगणकीकरण पूर्ण झाल्याची खात्री वाटणे म्हणजे माणसामध्ये असलेला माणूसपणाचा स्थायीभाव नाहीसा झाल्याचे या शब्दांच्या क्षणचित्रातून जाणवते. ही भयाण समाज परिवर्तनावादी स्थिती कवी कवितेतून मांडत राहतो .

मनुष्य नेहमीच मानसिक समाधान आणि स्थैर्य मिळविण्यासाठी मंदिराची वाट धरतोमंदिरामधला . देवच त्यास एक आशादायी किरण वाटत असतोपण , ,कवी म्हणतो

"कुठल्याच मंदिराचा मजवर प्रभाव नाही
तरीही इथे सुखाचा काही भाव नाही.
सत्ता इथे मठांची आणिक आश्रमांची
घामास अन श्रमांना कोठेच वाव नाही."[९]

कवीवर कुठल्याच मंदिराचा प्रभाव नाहीयाचे . ,इथल्या मंदिरांची .कारणही त्यांनी सांगितले आहे मठांची आणि आश्रमांची सत्ता असल्याने कष्टकरी स्वार्थी .श्रमिकांना कोठेही वाव असल्याचे दिसत नाही आश्रम किंवा मठही ,मनोवृत्तीच्या माणसांनी मंदिरे त्या .शिल्लक सोडले नाहीतवरही ते स्वतःची सत्ता गाजवत असतातअशा मंदिरांचा प्रभाव कवीवर . या कवितेमधून समाजाच्या दांभिक .बिलकूल नाही .प्रवृत्तीवर ओगले यांनी बोट ठेवले आहे

अविनाश ओगले यांच्या कवितेत असलेली सामाजिक जाणीव आजच्या तरूणाईच्या वाढत्या निष्क्रिय आणि दिशाहीन भरकटलेपणापर्यंत येऊन पोहचते .'मला माझ्या मुलाची खूप भीती वाटते' या कवितेमधून त्यांनी सर्व सामान्य पालकांची चिंता मांडली आहे .तर आजच्या विज्ञानयुगातही देव ,धर्म- .ढोंगी भोंदूबाबा यांचे अवडंबर माजले आहे .यज्ञयाग अज्ञानी वागत आहोत असेच आम्ही ज्ञानी असूनही कवीला सुचवायचे आहे. समाजात घडणाऱ्या अशा असंख्य घटनांनी कवीचे मन दुःखीकष्टी झाल्याचे - परंतु अविनाश ओगले एक आशावादही व्यक्त .जाणवते .करतात शब्दांचे दिवे तेवते ठेवूया असे सांगतात.

"आपण बोलूया एकमेकांशी
शब्दानं शब्द वाढू दे.
आपण लिहूया एकमेकाला
आपण वाचूया एकमेकाला
शिष्ट शांततेच्या कोशातून
आपण बाहेर येऊया..
.....आपण शब्दांचे दिवे तेवते ठेवूया."[१०]

शब्दच असे आहेत की ते समाजातील सगळी दरी मिटवू शकतातया .आपण एकमेकांशी बोलूया . एवढेच .बोलण्याने एकमेकांची मने सांधली जातात आणि ,वाचूया ,लिहूया नाही तर आपण एकमेकाला जमलचं तर शिष्टपणाच्या नावाखाली निर्माण झालेली शांतता भेदून आपण बाहेर येऊयाहा समाज स्नेहाच्या . मनातला अंधार ,प्रकाशात आनंदी रहायचा असेल तर मिटवायचा असेल तर आपण शब्दांचे दिवे तेवत ठेवले हा .पाहिजेत आशादायी विचार अविनाश ओगले यांच्या कवितेत आढळतो.

**३-चिंतनपर कविता .**

अविनाश ओगले यांच्या कवितांमधून त्यांची वैचारिक शक्ती अफाट असलेली दिसतेनवा विषय . .नव्या आशयाने मांडण्याचे सूत्र त्यांच्या कवितेत आहे वैचारिक ,सामाजिक कवितांमध्येही त्यांच्या चिंतनशील त्यांच्या .बुद्धीची क्रियाशीलता ठळकपणे दिसते चिंतनपर कवितेमधला गूढार्थ तसा समजण्यास सहज सोपा आहे पण त्यातून निर्माण झालेली वक्रोक्ती लक्षात यायला हवी .

'काजवा' या कवितासंग्रहातील 'वृक्ष असे एकाएकी' या कवितेत आयुष्याच्या शेवटी मनुष्याची मनोवस्था, त्याचे असह्य असे दुःख ओगले यांनी 'वृक्ष' या प्रतिमेचा योग्य वापर करून मांडले आहे. ते म्हणतात,

"वृक्ष असे एकाएकी उन्मळून पडत नसतात
मुळे तोडतात आधी नाते जमिनीशी.
पाने वाळतात,गळून पडतात ,
नवीन पाने शोषत राहतात
वृक्षाचा उरला सुरला जीवनरस ".११

वृक्षाचे उन्मळून पडणे हे एकाएकी किंवा अचानक नसतेरूजलेली मुळे जमिनीशी नाते त्याआधी जमिनीत . हळूहळू त्या ,तोडतातझाडाची पाने वाळत जाऊन गळून पडतातआणि त्याजागी आलेली नवीन पाने , सुरला जीवनरस शोषून घेतात हे दुःख जे -वृक्षाचा उरला पण गूढार्थ .फक्त त्यामधला वाच्यार्थ झाला .वृक्षाचे आहे .वेगळाच आहे

माणूस आयुष्यात जेव्हा खचून जातो तेव्हा त्याची स्थिती या उन्मळून पडणाऱ्या वृक्षापेक्षा वेगळी नसते . असाच तोही खंगत खंगत जीवनरस संपलेल्या आणि शेवटी हे सारे ,वृक्षासारखा जीर्ण होत जातो या त्याच्या .असह्य झाल्यावर पूर्ण उन्मळून पडतो .उन्मळून पडण्याची कारणे केवळ निमित्त होतात

अविनाश ओगले यांचे निरीक्षण खूप बारीक असलेले दिसते आजुबाजूला .घडणाऱ्या लहान सहान गोष्टीही ते फार तीक्ष्ण नजरेने न्याहाळताना दिसतात . त्यावर चिंतन करताना दिसतात. या त्यांच्या निरीक्षण स्वभावातून त्यांनी आपल्या कवितेत काही प्रश्नही उपस्थित केलेले आहेत. 'ज्ञानोबा' याही कवितेत त्यांनी असाच प्रश्न केला आहेपरंतु हा प्रश्न साहित्य क्षेत्रात . .वाढलेल्या अनाठायी प्रकाराबद्दल भाष्य करणारा आहे ,या कवितेत ते म्हणतात

"ज्ञानोबा, तुमचा ज्ञानेश्वरी हा कवितासंग्रह सातशे
वर्षे कसा काय टिकला?
तो सरकारी अनुदानातून प्रकाशित झालेला नव्हता
हे आता संशोधकांनीही मान्य केलय
तेव्हा वृत्तपत्रे नव्हतीत्यामुळे मराठीच्या ,
प्राध्यापकांनी केलेली
याची समीक्षाही छापून आलीच नसणार
मग तुमचा कवितासंग्रह सातशे वर्षे कसा काय
टिकला "?१२

अभिजात साहित्याचे वैशिष्ट्य हेच आहे की ती कलाकृती चिरंतन टिकून राहतेव्या १२ ज्ञानेश्वरांची . .शतकात लिहिलेली ज्ञानेश्वरी सातशे वर्षे टिकून आहे त्याकाळी आजच्या सारखी सुधारित आणि सोयीची कसलीच साधने उपलब्ध नव्हतीवृत्तपत्रे नसल्याने . आजच्याप्रमाणे मराठी प्राध्यापकांनी केलेल्या समीक्षाही छापून आलेल्या नव्हत्या तरीही ज्ञानेश्वरी हा कवितासंग्रह सातशे वर्षे टिकून आहेअलीकडच्या . .काळात कवी आणि कवितांचा नुसता सुकाळ झालाय उदंड माजलेल्या कविता संग्रहांची संख्या वाढली पण म्हणून कवी लोक .गुणात्मक पातळी खालावली आहे मोठा -त्यांना एखादा छोटा ,आपले कवितासंग्रह खपावेत पुरस्कार मिळावा यासाठी नानाविध क्लृप्त्या लढवतात . ज्ञानेश्वरांनी असे .ते काहीही करायला तयार होतात कुठलेच कृत्य केले नसताना देखिल सातशे वर्षे ज्ञानेश्वरी .टिकून राहिली आहे'ज्ञानपीठ' सारखा सर्वोच्च पुरस्कार मिळविण्यासाठी कवी किंवा साहित्यिकाला काय काय करावे लागते यावर खोचकपणे भाष्य ओगले यांनी या कवितेत केले आहे.

अविनाश ओगलेंची चिंतनपर कविता गर्भित अर्थाची आहे आणि हा गर्भित अर्थ त्यांच्या 'अर्थहीन' या कवितेतही आढळतोदिवस आणि रात्रीच्या मधला . हा अर्थ .अर्थहीन अर्थ ते शोधण्याचा प्रयत्न करतात अर्थहीन दिवस .त्यांच्या जगण्यातला आहेरात्रीच्या सरकणाऱ्या काळाचा हा अर्थ आहे म्हणून ते म्हणतात,

"जन्म हातात नाही, जगणं अपरिहार्य
पण म्हणून,
जन्म मृत्यूमधलं अर्थहीन अंतर
एवढाच का अर्थ उरावा आयुष्याचा "?१३

अर्थहीन दिवस रात्रीचा अर्थ शोधता शोधता ते जन्म मृत्यूच्या कालावधीमधल्या आयुष्याचा अर्थ-लावण्याचा प्रयत्न करतातमृत्यूमध-जन्म .लं अर्थहीन अंतर एवढाच आयुष्याचा अर्थ उरावा काअसा प्रश्न ?

करून यानंतरच्या उत्तरासाठी वाचकाला ते प्रवृत्त .करतात हीच किमया अविनाश ओगले यांनी 'थेंब टपोरे' मधील शोधतो आहेरंग मनाचे या ,शोधतोच आहे , बघणार.व्ही.संग्रहातील टि ी रोबो इ. कवितांमध्ये साधली आहे.

**४. शैक्षणिक-वैज्ञानिक कविता-**

शिक्षण आणि विज्ञानाशी संबंधित अविनाश ओगले यांच्या कवितांचा आढावा घेताना बदलते ज्ञान हा कवितांचा केंद्रबिंदू असल्याचे पहायला मिळतेआधुनिक . तंत्रज्ञानामुळे मनुष्याचे जीवन अगदी सहज सुखमय झालेआहेअशा सुखी जगात समाधान मात्र कुठेच . ही जी भयाण अवस्था निर्माण झाली आहे त्यातून .नाही तरणोपाय व्हायचा असेल तर ग्रंथासारखा दुसरा मित्र नाही असे ते सांगतात.

वाचन संस्कृती नष्ट होते की काय अशी भीती आजकाल व्यक्त केली जातेवाचनाचे महत्त्व पटवून . देताना अविनाशओगले म्हणतात ,

"जगण्याचे जर भान पाहिजे वाच पुस्तके
जगती जर सन्मान पाहिजे वाच पुस्तके.
ग्रंथावाचून अर्थहीन हे अवघे जीवन,
जिंदगीत जर जान पाहिजे वाच पुस्तके.
संस्कारांनी घडतो माणूस मोठा होतो,
मानाचे जर पान पाहिजे वाच पुस्तके".१४

पुस्तके आपल्याला जगण्याचे भान आणतात . .विद्वान सर्वत्र पूज्यते असा एक वाक्प्रचार प्रचलित आहे -म्हणून अविनाश ओगले म्हणतात की या जगात मान माणसाला शहाणं .सन्मान हवा असेल तर पुस्तके वाचा ज्ञानाचे भांडार .करण्याएवढी क्षमता ग्रंथात असते .असलेली पुस्तके वाचावीत असे कवी सांगतो

अविनाश ओगले जसे या कवितेतून पुस्तके वाचण्याचा संदेश सांगतात तसे त्यांनी आपल्या हयातीत वाचन संस्कृती रुजवण्यासाठी प्रयत्न देखिल केले आहेत . संस्कारक्षम पुस्तके अल्पदरात घराघरात अशी संकल्पना मांडून अत्यंत अल्पदरात त्यांनी वाचकांना पुस्तके हे त्यांचे कार .उपलब्ध करून दिली होती्य कौतुकास्पद तर आहेच.पण प्रेरणादायी सुद्धा आहे , ते स्वतः पुस्तके घेऊन खेड्यापाड्यातील सर्व संमेलनात जा व विकत.

अविनाश ओगले यांच्यावर आधुनिक तंत्रज्ञानाचा फार मोठा प्रभाव असलेला दिसतोम्हणून त्यांच्या . व्ही .टि ,रोबो ,मोबाईल ,बहुतेक कवितांमध्ये संगणक असेतंत्रज्ञानाशी निगडीत अनेक शब्द आलेले आहेतया . तंत्रज्ञानाचा अतिरेक झालेला पाहून ओगले यांचे मन विदीर्ण होते' .रोबो,या कवितेतून कवी म्हणतो '

"आईच्या कुशीची ऊब हा रोबो मला देईल?
बाबांसारखी शाबासकी हा रोबो मला देईल?
माझ्यासाठी याचं काळीज कधीतरी तुटेल?
माझ्यासाठी एखादा हुंदका या रोबोलाही
फुटेल"?१५

मध्यमवर्गीय श्रीमंतांच्या घरी रोबो हा आता एक कुटुंबाचा सदस्यच बनला आहे .सगळी कामे तो करतो . असे असले तरी आईच्या कुशीत जी ऊब आहे ती ऊब किंवा कौतुकाने बाबा पाठीवर ?रोबो देईल का शाबासकीची थाप देतात तशी रोबो देईल क ाही ? कितीही केले तरी रोबो हे यंत्र आहे हे .मोठी शंकाच आहे म्हणून कवी .विसरून चालणार नाही पुढे म्हणतो की , ?माझ्यासाठी कधीतरी या रोबोचे काळीज तुटेल का भावनाहीन असलेला रोबोचा माझ्यासाठी एखादा असा खडा सवाल ते उपस्थित ?हुंदका फुटेल का .करतात

शिक्षणाने खूप मोठी प्रगती साधली आहे. नवनवे संशोधन शिक्षणामुळे होत आहे परंतु माणसासारख्या भावना, संवेदना तयार करणे कधीच शक्य झालेले नाही. रोबोसारख्या किंवा संगणकासारख्या यंत्रामुळे माणूस आळशी बनत चाललेला आहे यावर ते ताशेरे ओढतात. 'घरात भरल्या घुसले उंदीर' या ही कवितेत ते म्हणतात,

"गणक ऋषींच्या नव्या पिढीचे
उंदीर हेची बाप जाहले,
माणूसघाणे बधीर रोबो
घराघरातून जन्मा आले ' ".१६

संगणक युगात कवीने संगणकाला ऋषीची उपमा दिली आहेमाऊस हा संगणकाचा एक महत्त्वाचा भाग . म्हणून .त्याशिवाय संगणकावर कार्य होत नाही .आहे संगणक य ,कवी म्हणतो की ुगातल्या नव्या पिढीचे उंदीर (माऊस) बाप झाले आहेत. त्यांच्या मर्जीशिवाय संगणक चालूच शकत नाही. उंदीर जो आदेश देईल तसे संगणक आज्ञा पाळून कार्यरत होतो. माणूसपण नसलेले माणूसघाणे बधीर रोबो आज घराघरातून जन्माला आले आहेत.

शिक्षणाच्या विकासातील तंत्रज्ञान हा एक महत्त्वाचा टप्पा असला तरी त्याची दुसरी बाजू तपासून पाहणे अत्यंत गरजेचे आहेही जी दुसरी बाजू आहे ती . बाजू अविनाश ओगले यांच्या काव्यातून वेळोवेळी प्रकट झालेली आहे.

**५-कौटुंबिक कविता .**

काव्य प्रांतात समरस होऊन रमलेले अविनाश ओगले यांना कवितेसाठी विषयांची आयात कुठूनही करावी लागली नाही तर त्यांच्या ज्या अनुभवांची अनुभूती आली ते ते विषय त्यांनी हाताळले आहेतव्यक्त . होण्यासाठी त्यांनी घेतलेला शब्दांचा आधार आणि शब्दांनी कसलेच आढेवेढे न घेता त्यांना दिलेली साथ हे अस्सल प्रतिभेचं लक्षण म्हणावे लागेल.

ओगले यांना या त्यांच्या साहित्य प्रवासात कुटुंबाची फार मोलाची साथ मिळालेली आहे. कुटुंबाविषयी असलेले प्रेम त्यांच्या कवितांमधून व्यक्त याबद्दल ते ?घर कसे असावे .झालेले पहायला मिळते ,घर या कवितेत म्हणतात

"या घराच्या दारावरती
अतिथ्याचे तोरण व्हावे
रांगोळीने उंबरठ्यावर
स्वागताचे गान गावे ".१७

अशा प्रसन्न घराचे घरपण अबाधित ठेवण्याचे परम कार्य करीत असलेल्या आईला कवी विसरत नाही . जे जे ?लेकरांसाठी काय नाही करत ,आई घरासाठी .शक्य आहे आणि शक्य नाही असेही सगळेच ती करते कधी त्याच .कधी हातांचा पाळणा करून जोजवते मुलांना अभिमान, करूणा देतेकवीने आईला . तूच .शिवबांच्या थोर जिजाईची उपमा दिलेली आहे आई म्हणजे .माझी जिजाई असल्याचे ते सांगतात माझ्यासाठी काय काय आहे हे त्यांनी पुढे सांगितले आहे.

"चरण आईचे हीच पंढरी, हवी कशाला वारी
इथेच माझा विठ्ठल आणि.इथेच गे रखुमाई ,
तुझी थोरवी आई त्याग ,महती ,तुझा लिहिण्याला
गगनाचा मी कागद केला ".सागर झाले शाई ,१८

माझ्या आईचे चरण म्हणजेच माझी पंढरी आहे . .त्यासाठी पंढरीची वारी करायची आवश्यकता नाही माझी ,आईच्या चरणाला स्पर्श केला की माझा विठ्ठल कवीने आईला परमेश्वर .रखुमाई मला इथेच भेटतात मह ,आईची थोरवी .मानले आहेती इतकी अफाट आहे की तिचा त्याग लिहिण्याला मी गगनाचा कागद आणि अथांग सागराची शाई केली तरी तिचे महत्त्व लिहून संपणार नाही असे आईबद्दलचे प्रेम ममता ओगलेंच्या कवितेतून अवतरली आहे.

अविनाश ओगले यांनी आईबद्दल भरभरून लिहिले आहेचपरंतु त्यांनी केवळ आईविषयी लिहिलेले , नसून कुटुंबातल्या सगळयाच नाते संबंधांवर लिहिले आहेजसे . पत्नी यांच्या बद्दलच्याही-पती ,पत्नी ,मुलगा ,आजी जुन्या आचार विचारांच्या .त्यांच्या कविता आहेत आजीला आताच्या बायकांचे वागणे फारसे काही ,आजीच्या काळी असलेला कष्टाळूपणा .आवडत नाही सहनशीलता आता उरलेलीनाही हे पाहून म्हातारी आजी ताप करून घेण्याव्यतिरिक्त काहीच करू शकत नाहीहे आजीचं दुखणं .देखील अविनाश ओगले यांनी 'आजी' या कवितेत मांडले आहे .

संसार म्हटला की अनेक सुखसंकटे ही ,दुःखे- आर्थिक चणचण असणाऱ्या संसाराची .ओघाने आलीच वाताहत आणि सगळयाच बाबतीत चाललेलीत्यांची ऍडजेस्टमेंट तर सांगायलाच नकोप्रामुख्याने . शहरातल्या चाळीमध्ये दाटीवाटीने रहात असलेल्या .नोकरदारांची करूण अवस्था न पाहण्यासारखी आहे अविनाश ओगले सुद्धा अशा चाळीमधल्या एका खोलीमध्ये राहणाऱ्या राजा आणि राणीची कहाणी .सांगतात

"त्या राजाची खोली होती, तिसऱ्या मजल्यावरती
जिने मोडकेअंधारातून उंदीर झुरळे फिरती ,
लवकर उठतीआणिक भरती खालून वरती पाणी ,
त्यांच्या तिथल्या संसाराची ऐका एक कहाणी ".१९

'ऐका एक कहाणी' ही त्यांची विडंबन कविता आहे. मंगेश पाडगावकर याच्या भातुकलीच्या खेळामधली कवितेचे अविनाश राजा आणि राणी या प्रसिद्ध भाव मूळ कवितेची .ओगले यांनी उत्तमपणे विडंबन केले आहे थट्टा न करता विडंबन करणे तसे सोपे नाही परंतु ओगले विडंबन करण्यात वाकबगार होतेअनेक विडंब .ने त्यांनी उत्कृष्ट केली आहेत. या कवितेत चाळींमध्ये राहणाऱ्या असंख्य राजाराणींची कहाणी मांडतानाच जीवनाशी चाललेला त्यांचा तो संघर्षच कवीने या विडंबनातून मांडला आहे.

एकीकडे दोघांनी मिळून संकटांवर मात करण्याचे दृश्य तर दुसरीकडे एकमेकांशी पटेनासं झाल्याने नवरा बायकोचे नाते संपुष्टात आल्याचे दृश्य अविनाश ओगले चित्रित करतात .'कंट्रोल झेड' या कवितेतून आधी ऑनलाईन वर ओळख झालेल्या आणि नंतर लग्नात रूपांतर झालेल्या आजच्या तरूण जोडप्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांवर गंभीरतेने कवीने प्रकाश टाकला आहे .

अविनाश ओगले यांच्या कवितेचे स्वतःचे असे एक वेगळे स्थान आहे. आजूबाजूच्या परिस्थितीचे बारकावे त्यांची गंभीर कविता टिपते. निरीक्षणाला चिंतनाची जोड आणि त्याकडे पाहण्याची कवीची संवेदनशील वृत्ती हेच या गंभीर कवितेचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. ओगले यांच्या कवितेचे आणखीन एक वेगळेपण म्हणजे संगणकतंत्रज्ञानाशी निगडीत- इंग्रजी संज्ञांचा वापर त्यांनी पुष्कळदा केला आहे पण कुठेही त्यामुळे दुर्बोधता आलेली नाहीउलट त्या संज्ञामुळे कवितेला एक माधुर्य . .प्राप्त झाले आहे

**संदर्भसूची :**

१. अविनाश ओगले - अर्पणपत्रिका, 'काजवा', बुद्धिग्राम प्रकाशन, बेळगाव, द्वितीय आवृत्ती, २१ मार्च २००४, पृ. ३.

२. डॉ. विनोद गायकवाड - संपा. 'हास्याक्षरे' अविनाश ओगले यांच्या विडंबन आणि हास्य कविता, बुद्धिग्राम प्रकाशन, बेळगाव, प्रथम आवृत्ती, पृ. १७

३. अविनाश ओगले - थेंब टपोरे, 'थेंब टपोरे', निलाक्षी प्रकाशन, बेळगाव, प्रथम आवृत्ती, जानेवारी १९९४, पृ. १९

४. अविनाश ओगले - त्यांच्या कवितेतला पाऊस, 'थेंब टपोरे', निलाक्षी प्रकाशन, बेळगाव, प्रथम आवृत्ती, जानेवारी १९९४, पृ. ०६

५. अविनाश ओगले - झाड, 'काजवा', बुद्धिग्राम प्रकाशन, बेळगाव, द्वितीय आवृत्ती, २१ मार्च २००४, पृ. ४१.

६. डॉ चंद्रकांत पोतदार, संपा. निःशब्द शब्द, अविनाश ओगले यांची कविता, ओमेगा पब्लिकेशन्स, बेळगाव, प्रथम आवृत्ती, २०२२, पृ. २१

७. अविनाश ओगले - माणसांचे अभयारण्य, 'काजवा', बुद्धिग्राम प्रकाशन, बेळगाव, द्वितीय आवृत्ती, २१ मार्च २००४, पृ. २८.

८. अविनाश ओगले - जग किती जवळ येत चाललंय, 'काजवा', बुद्धिग्राम प्रकाशन, बेळगाव, द्वितीय आवृत्ती, २१ मार्च २००४, पृ. ३.

९. अविनाश ओगले - अभाव नाही, 'रंग मनाचे', बुद्धिग्राम प्रकाशन, बेळगाव, प्रथम आवृत्ती, १ ऑक्टोबर २०१३, पृ. ७२.

१०. अविनाश ओगले - आपण शब्दांचे दिवे तेवते ठेवूया, 'काजवा', बुद्धिग्राम प्रकाशन, बेळगाव, द्वितीय आवृत्ती, २१ मार्च २००४, पृ. ६२.

११. अविनाश ओगले - वृक्ष असे एकाएकी, 'काजवा', बुद्धिग्राम प्रकाशन, बेळगाव, द्वितीय आवृत्ती, २१ मार्च २००४, पृ. ८९.

१२. अविनाश ओगले - ज्ञानोबा, 'काजवा', बुद्धिग्राम प्रकाशन, बेळगाव, द्वितीय आवृत्ती, २१ मार्च २००४, पृ. ५७.

१३. अविनाश ओगले - अर्थहीन, 'थेंब टपोरे', निलाक्षी प्रकाशन, बेळगाव, प्रथम आवृत्ती, जानेवारी १९९४, पृ. २७.

१४. अविनाश ओगले - पुस्तके, 'थेंब टपोरे', निलाक्षी प्रकाशन, बेळगाव, प्रथम आवृत्ती, जानेवारी १९९४, पृ. १९

१५. अविनाश ओगले - रोबो, 'रंग मनाचे', बुद्धिग्राम प्रकाशन, बेळगाव, प्रथम आवृत्ती, १ ऑक्टोबर २०१३, पृ. १०७.

१६. अविनाश ओगले - घरात भरल्या घुसले उंदीर, 'काजवा', बुद्धिग्राम प्रकाशन, बेळगाव, द्वितीय आवृत्ती, २१ मार्च २००४, पृ. ६३.

१७. अविनाश ओगले - घर, 'रंग मनाचे', बुद्धिग्राम प्रकाशन, बेळगाव, प्रथम आवृत्ती, १ ऑक्टोबर २०१३, पृ. ७२.

१८. अविनाश ओगले - आई, 'रंग मनाचे', बुद्धिग्राम प्रकाशन, बेळगाव, प्रथम आवृत्ती, १ ऑक्टोबर २०१३, पृ. ७८.

१९. अविनाश ओगले - ऐका एक कहाणी, 'रंग मनाचे', बुद्धिग्राम प्रकाशन, बेळगाव, प्रथम आवृत्ती, १ ऑक्टोबर २०१३, पृ. २४.

# जागतिक स्तरावर कोविड-१९ मुळे संक्रमित मानवाची आणि मानवी मृत्यूची स्थिती (विशेष संदर्भ- डिसेंबर२०१९ ते जानेवारी२०२२)

**प्रा. डॉ. तायनाथ व्ही.पी.**

अर्थशास्त्र विभाग ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, परभणी

**प्रस्तावना :** Covid-19 या रोगास जागतिक महामारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. जागतिक साथीचा रोग हा आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून तो जगभर सर्वत्र मोठ्या प्रमाणावर पसरतो आणि त्याचे रुग्ण जगभरात आढळतात. केवळ विस्तृत विभागावर पसरला आहे किंवा त्याच्यामुळे अनेक लोक मृत्यू पावलेले आहेत म्हणून एखादा रोग साथीचा ठरत नाही.तर तो संपर्कजन्य व संसर्गजन्य ही असावा लागतो. जसे कर्करोग हा अनेक लोकांच्या मृत्युशी जबाबदार आहे परंतु तो साथीचा रोग मानला जात नाही. कारण तो संपर्कजन्य व संसर्गजन्य नाही. कोविड-19 मात्र सर्वत्र जगभर पसरलेला असल्यामुळे आणि संपर्कजन्य व संसर्गजन्य असल्याने तो साथीचा रोग म्हणून ओळखला जात आहे. यापूर्वी अनेक साथीचे रोग सर्व देशभर किंवा खंडभर आढळून आले आहेत. त्यामध्ये सन 1347 मध्ये म्हणजे 14 व्या शतकात युरोप खंडामध्ये 'ब्लॅक डेथ' या रोगामुळे 200 दशलक्ष लोकांचा मृत्यू झाला आहे. सतराव्या शतकामध्ये लंडनमध्ये 'ग्रेट प्लेग' या साथीच्या रोगांमुळे अनेकांचा मृत्यू झाला आहे. एकोणिसाव्या शतकात 'कोलेरा' मुळे 1.5 दशलक्ष लोकांचा मृत्यू झाला आहे. तर सन 2010 मध्ये दोन लाख लोकांचा मृत्यू झाला आहे. सन 2019 मध्ये covid-19 मुळे 22 जानेवारी 2021 पर्यंत संपूर्ण जगात 2.14 दशलक्ष लोकांचा मृत्यू झाल्याचे दिसून येते. तसेच इतर देशात तसेच भारतातील काही राज्यांमध्ये या साथीच्या रोगाचा संसर्ग चालूच असल्याचे आपल्याला दिसून येत आहे.

**Covid-19 महामारी असे नाव का देण्यात आले?**

Covid-19 हा साथीचा रोग म्हणून ओळखला जात आहे covid-19 हा कोरोनाविषाणू संसर्गजन्य रोग आहे. या विषाणूची लागण झालेल्या पहिल्या रुग्णांची नोंद ही डिसेंबर 2019 मध्ये झाली असल्यामुळे त्याला covid-19 असे नाव देण्यात आले आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे:-** या संबंधित विषयाचा अभ्यास करत असताना काही उद्दिष्टे समोर ठेवून हा अभ्यास केला गेला आहे ती उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) या महामारी covid-19 असे नाव का देण्यात आले आहे हे समजावून घेणे.

२) यापूर्वी आलेल्या महामारीच्या रोगाविषयी आढावा घेणे.

३) जागतिक स्तरावर covid-19 या महामारीमुळे देश निहाय झालेली मानवी मृत्यूची संख्या ज्ञात करणे.

४) भारतातील covid-19 मुळे झालेल्या मानवी मृत्यूची संख्या माहिती करणे.

**ग्रहीतके:-** संबंधित लेख लिहित असताना पुढील गृहितके घेऊन लेख लिहला गेलेला आहे. ती ग्रहीतके पुढील प्रमाणे आहेत.

१) covid-19 या लेखाचा अभ्यास करत असताना अभ्यासाची मर्यादा म्हणून डिसेंबर 19 जानेवारी 2022 या कालावधीमधील covid-19 अभ्यास केला गेला आहे.

२) भारतापेक्षा देशाचा covid-19 मुळे असणारा मृत्यू दर अधिक आहे.

३) covid-19 चाचण्यांचे प्रमाण अल्प विकसित देशांपेक्षा विकसित देशामध्ये अधिक आहे.

४) covid-19 चा लसीकरणाचे प्रमाण अल्पविकसित देशापेक्षा विकसित देशांचे अधिक आहे.

**अभ्यासाची संशोधन पद्धती:-** Covid-19 एक को महामारी या लेखाचे संशोधन करत असताना दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आला आहे. सदरील माहिती विविध साप्ताहिके, वर्तमानपत्रे, संकेतस्थळ अशा विविध साधनाद्वारे माहिती संकलित करण्यात आली आहे. या दुय्यम माहितीच्या आधारे प्रस्तुत अभ्यासाचे विश्लेषण केले गेले आहे.

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, June 2022, Volume-14, Issue-6

**जागतिक स्तरावर भारतासह इतर देशातील covid-19 स्थिती – डिसेंबर २०१९ ते जानेवारी २०२२**

| अ.क्र. | देश | covid-19 संक्रमित व्यक्तीची संख्या | देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी संक्रमित व्यक्तीचे प्रमाण | व्यक्तीची मृत्यूची संख्या | मृत्युदर | सद्यस्थितीत संक्रमित व्यक्तीची संख्या | एकूण लोकसंख्येपैकी covid-19 चाचणीचे प्रमाण | लोकसंख्या (कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | USA | 25196086 | 7.59 | 420285 | 1.67 | 9674810 | 88.40 | 33.20 |
| 2 | India | 10626200 | 0.77 | 153067 | 1.44 | 189425 | 13.77 | 138.75 |
| 3 | Brazil | 8699814 | 4.08 | 214228 | 2.46 | 904845 | 13.04 | 21.34 |
| 4 | Russia | 3655839 | 2.50 | 67832 | 1.86 | 533789 | 67.17 | 14.59 |
| 5 | Uk | 3543646 | 5.20 | 94580 | 2.69 | 1862359 | 97.86 | 6.80 |
| 6 | France | 2987965 | 4.57 | 71998 | 2.41 | 2701429 | 62.61 | 6.53 |
| 7 | Spain | 2560587 | 5.48 | 55041 | 2.15 | N/A | 64.59 | 4.67 |
| 8 | Italy | 2428221 | 4.02 | 84202 | 3.47 | 576568 | 49.94 | 6.04 |
| 9 | Mexico | 1711283 | 1.32 | 146174 | 8.54 | 287131 | 3.32 | 12.96 |
| 10 | Belgium | 644256 | 5.89 | 20572 | 3.00 | 616169 | 66.55 | 1.16 |
| 11 | Bangladesh | 530271 | 0.32 | 7966 | 1.50 | 475074 | 2.12 | 16.56 |
| 12 | Pakistan | 228891 | 0.23 | 11204 | 2.11 | 34916 | 3.39 | 22.32 |
| 13 | Switzarland | 507123 | 5.84 | 8971 | 1.77 | 180552 | 47.79 | 0.86 |
| 14 | Japan | 345221 | 0.77 | 4743 | 1.37 | 67291 | 4.87 | 12.62 |
| 15 | Nepal | 268646 | 0.09 | 1979 | 0.74 | 3799 | 6.91 | 2.94 |
| 16 | China | 88804 | 0.06 | 4635 | 5.21 | 1674 | 11.12 | 14.39 |
| 17 | Shri Lanka | 56076 | 0.26 | 2076 | 0.49 | 2613 | - | 2.14 |
| 18 | Timor Leste | 53 | - | - | 00.00 | 04 | - | 0.13 |
| 19 | Laas | 41 | - | Nil | 00.00 | 00 | - | 0.73 |
| World | | 98089877 | 1.29 | 2100404 | 2.14 | 25521501 | - | 757.71 |

वरील तक्त्यामध्ये जागतिक स्तरावर भारतासह इतर देशातील ची स्थिती 19-covid तक्त्यामध्ये जगातील देशनिहाय .दर्शवलेली आहे देशातील एकूण ,संक्रमित व्यक्तीची संख्या 19-covid 19-covid ,लोकसंख्येपैकी संक्रमित व्यक्तीचे प्रमाण मुळे मानवी मृत्यूंची संख्यादेशात एकूण ,मृत्युदर , चाचणीचे प 19-covid लोकसंख्येपैकीर्‌माण इत्यादी बाबी दर्शविलेल्या आहेतया सर्व बाबीवरून . .पुढील काही निष्कर्ष आपल्यासमोर येतात

**निष्कर्ष:-**

१) Covid-19 जागतिक महामारी मध्ये एकूण संक्रमित व्यक्तींची संख्या 9.80 कोटी एवढी

२)असून ती जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी संक्रमण झालेल्याव्यक्तीची संख्या 1.29 प्रतिशत प्रमाणात आहे. एकूण जगाच्या संक्रमित लोकसंख्येपैकी 21लक्ष व्यक्तींचा मृत्यू झालेला असून ते संक्रमित व्यक्तीच्या 2.14 प्रतिशत प्रमाण आहे. म्हणजेच मृत्यू दर हा 2.14 टक्के आहे सद्यस्थितीत जगामध्ये covid-19 संक्रमित व्यक्तीची संख्या ही 2.55 कोटी आहे.

३)जगातील सर्वाधिक covid-19 चे संक्रमण हे अमेरिकेतील लोकसंख्येत झाले असून ते अमेरिकेच्या एकूण लोकसंख्येपैकी 7.59 प्रतिशत लोकांना झाले आहे. जगातील एकूण संक्रमित लोकसंख्येपैकी 25.69 टक्के लोक हे अमेरिकेतील आहेत. म्हणजेच जगात सर्वाधिक covid-19 चे संक्रमण हे अमेरिकेतील

लोकांना झाले आहे. भारताचे हेच प्रमाण दहा 10.83 प्रतिशत आहे.

४)भारतातील एकूण लोकसंख्येच्या फक्त 0.77 प्रतिशत एवढ्याच लोकांना कोविल-19 ने संक्रमित झाल्याचे दिसून येते.

५)Covid-19 च्या बाबतीत आश्चर्याची बाब म्हणजे ज्या देशातून covid-19 च्या प्रादुर्भावास सुरुवात झाली या चीन देशात मात्र त्यांच्या एकूण लोकसंख्येच्या 0.06 प्रतिशत लोकांनाच covid-19 चे संक्रमण झाल्याचे दिसून येते.

६)Covid-19 मुळे जगातील सर्वाधिक मृत्यू दर हा मेक्सिको त्यानंतर चीन, इटली, बेल्जियम, रशिया, युके, ब्राझिल, स्पेन, पाकिस्तान, स्विझरलँड आणि भारत असा उतरता क्रम लागतो.

७)देशातील एकूण लोकसंख्येपैकी covid-19 चाचणीचे प्रमाण जगात सर्वाधिक चाचण्या करण्यामध्ये UK चे आसून ते त्यांच्या एकूण लोकसंख्येपैकी 97.86 प्रतिशत चाचण्या केल्या असून त्यानंतर अमेरिकेने 88. 40 प्रतिशत एवढ्या केल्या आहेत. तर भारतामध्ये हे प्रमाण खूप कमी असून ते फक्त 13.70 प्रतिसाद एवढे आहे. यावरून असे स्पष्ट होते की विकसित राष्ट्रांमध्ये covid-19 चाचण्यांचे प्रमाण सर्वाधिक झाल्याचे दिसून येते.

**Sources:**

1. Novel Coronavirus (2019-nCoV) situation reports - World Health Organization (WHO)
2. 2019 Novel Coronavirus (2019-nCoV) in the US - US Centers for Disease Control and Prevention (CDC)
3. Outbreak Notification - National Health Commission (NHC) of the People's Republic of China
4. Novel coronavirus (2019-nCoV) - Australian Government Department of Health
5. Novel coronavirus 2019-nCoV early estimation of epidemiological parameters and epidemic prediction - Jonathan M Read et al. Jan 23,2020.
6. Early Transmissibility Assessment of a Novel Coronavirus in Wuhan, China - Maimuna Majumder and Kenneth D. Mandl. Harvard University - Computational Health Informatics Program - Posted 24 Jan 20201revised 27 Jan 2020
7. Report 3 Transmissibility of 2019-nCoV - 25 January 2020 - Imperial College London
8. Case fatality risk of influenza A(H1N1 pdm09) a systematic review - Epidemiology Nov 24, 2013
9. A novel coronavirus outbreak of global health concern - Chen Want et al. The Lancet January 24, 2020
10. Symptoms of Novel Coronavirus (2019-nCoV) - CDC
11. China's National Health Commission news conference on coronavirus - Al Jazeera January 26, 2020
12. Wuhan lockdown 'unprecedented', shows commitment to contain virus WHO representative in China - Reuters January 23, 2020
13. Statement on the meeting of the International Health Regulations (2005) Emergency Committee regarding the outbreak of novel coronavirus (2019-nCoV) - WHO. January 23, 2020
14. International Health Regulations Emergency Committee on novel coronavirus in China - WHO. January 30, 2020
15. Human-to-human transmission of Wuhan virus outside of China, confirmed in Germany, Japan and Vietnam - The Online Citizen. Jan. 29, 2020
16. Who "Live from Geneva on the new #coronavirus outbreak"
17. CDC Confirms Person-to-Person Spread of New Coronavirus in the United States - CDC Press Release. Jan 30, 2020
18. CMO confirms cases of coronavirus in England - CMO, UK, Jan 31, 2020
19. Coronavirus in France what you need to know - The Local France. Jan 31. 2020
20. First two persons infected with coronavirus identified in Russia - Tass, Jan 31, 2020
21. Updated understanding of the outbreak of 2019 novel coronavirus (2019nCoV) in Wuhan, China - Journal of Medical Virology. Jan 29, 2020
22. Estimating the effective reproduction number of the 2019-nCoV in China - Zhidong Cao et al. Jan 29, 2020
23. Preliminary estimation of the basic reproduction number of novel coronavirus (2019-nCoV) in China, from 2019 to 2020 A data-driven analysis in the early phase of the outbreak - Jan 30, 2020
24. Coronavirus Window of opportunity to act. World Health Organization says - BBC. Feb. 4. 2020
25. Clinical Charactenstics of 138 Hospitalized Patients with 2019 Novel Coronavirus-Infected Pneumonia in Wuhan, China - Wang et al. JAMA, Feb 7, 2020.

# भारतीय विधीगीतातील स्त्रीचित्रण

**प्रा.डॉ.दत्तात्रय लक्ष्मण फलके**

ताहाराबाद महाविद्यालय, ताहाराबाद,जि. नाशिक

**प्रास्ताविक :** प्राचीन काळापासून भारतात स्त्रियांचा सहभाग धार्मिक विधीशी सातत्याने राहिलेला आहे.मध्ययुगीन काळातही स्त्री धार्मिक विधीमध्ये गुंतलेली दिसून येते. अर्वाचीन कालखंडामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात लोकपरंपरेने आलेले विधीगीतातील स्त्री चित्रण स्वातंत्र्योत्तर भारतात विधी गीतातील स्त्री चित्रण तसेच परंपरेने पुढे चालत राहिले. आज एकविसाव्या शतकात जीवन जगत असताना विविध प्रसारमाध्यमे ,आंतरजाल आले तरी समाजात आजही विधीगीतातील स्त्रीचित्रण टिकून आहे. परंपरेबरोबर त्यात आधुनिकता समाविष्ट होऊन व पारंपारिकता घेऊन विधी गीतातील स्त्रीचित्रण टिकून आहे. मौखिक परंपरेने चालत आलेले ज्याचा कर्ता अज्ञात आहे अशा साहित्यास लोकसाहित्य असे म्हणतात. आजच्या बदलत्या काळात लोकसंस्कृतीचे असे अनेक आविष्कार नष्ट होत आहेत किंवा त्यावर आधुनिकतेचे संस्कार होत आहेत. म्हणून मौखिक परंपरेतील या विधीगीतांचा अभ्यास करणे नितांत गरजेचे आहे. लोकसाहित्यातील विधीगीते ही केवळ काव्य म्हणून निर्माण झालेली नसतात कोणत्यातरी क्रियेशी संबंधित असतात. ऋतुप्राप्ती, लग्न ,पुत्रजन्म ,पाचवी ,बारसे ,गर्भारपण, गौरीपूजा, मर्तिक चालले असताना ही गाणी म्हटली जातात. Rationale of the study: संपूर्ण महाराष्ट्र विधी गीतात कोणत्या ना कोणत्या नात्याने गुंतलेला आहे. ज्यावेळेस हे नाते आपण उलगडून काढण्याचा प्रयत्न करतो. त्यावेळेस त्याचा समाजशास्त्र मानसशास्त्र धर्मशास्त्र नीतिशास्त्र इत्यादी शास्त्रांची संबंध असलेला दिसून येतो. त्या विधीगीतातून अशा स्वरूपाचे आंतरशाखीय संबंध दिसून येतात.

**उद्दिष्ट्ये**

१ गीताच्या अभ्यासातून भारतातील चालीरीती लक्षात घेणे

२ भारतीय विधीमीताकडे पाहण्याचा दृष्टीकोन स्पष्ट करणे.

३ विधीगीतातील अनुभव विश्वाचा वेध घेणे.

४ विधी गीतातून येणारे लोक जीवन लोकसंस्कृती समजावून घेणे.

५ या अभ्यासातून तत्कालीन व समकाल

**संशोधन पद्धती :**

संदर्भ ग्रंथांचा अभ्यास करून प्रस्तुत शोधनिबंधात विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब केलेला आहे व संदर्भ इत्यादी तंत्राचा वापर करून प्रस्तुत शोधनिबंधाची लेखन केले आहे.

**भारतीय विधीगीतातील स्त्रीचित्रणाचे विश्लेषण**

लोकसाहित्यातील विधीगीते ही केवळ काव्य म्हणून निर्माण झालेली नसतात. कोणत्यातरी क्रियेशी ती संबंधीत असतात. ऋतूप्राप्ती, लग्न, पुत्रजन्म, पाचवी, बारसे, गर्भारण, गौरीपूजा, मर्तिक चालले असताना ही गाणी म्हटली जातात. लग्नाच्या सोहळ्यातील प्रत्येक विधीला गाण्याची जोड दिलेली असते. झालीचे गाणे महाराष्ट्रातील सर्व भागात प्रचलित असलेले दिसून येते. "झुण झुण वाजंत्री वाजती पुढे काळ वातनी नाचती

नवरा आला शिवेपाशी शिव नारळ देईन, नवरी जिंतून नेईन॥" या गाण्यांमुळे लग्नातील चालीरिती एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत अखंडपणे चालते. विधीगीते ही काव्यदृष्ट्या सामान्य असतात. सामान्यतः ती गद्यप्राय असतात. डोहाळे हा एक सोळा संस्कारापैकी एक संस्कार, गर्भसंभव झाल्यावर शक्यतो मुलाची अपेक्षा केली जाते. त्यानिमित्ताने जो विधी केला जातो. तो आदिवासींमध्ये दिसून येत नाही. डोहाळ्यांच्या गीतात नऊ महिन्यातील सोपस्काराचे वर्णन केलेले असते.

पहिले मासी सासरा पुसे, सुन तुमची ढवळे कसे
आमचे ढवळे पुरवा सासरा, चंदन तोडूनी बांधा बसाया
दुसरे मासी सासू ती पुसे, सुन तुमचे ढवळे कसे, आमुचे
ढवळे पुरवी सासू हाटा जाऊन आणा ऊस"

एक नणंद, दीर, भाऊ, भाऊजी, बापू, आई, दासी हे सर्व नातेवाईक डोहाळ्याची आणि हिरवी चोळी, खीर, लाह्या अशा वस्तूची गर्भिण मागते. ही गाणी ब्राम्हणात अधिक प्रचलित आहेत. डोहाळ्यागीताप्रमाणेच पाळणे लोकप्रिय आहेत. हे पाळण्याचे गीत पुत्रप्राप्तीनंतर पाळण्यात घालताना म्हटले जाते.पाळणा 'जो जो रे जो जो असे पालुपद असते. महाराष्ट्रात पाळणागीताचे दोन प्रकार पडतात. पहिल्या प्रकारात मूल जन्माला आले की, दिवसांचे वर्णन येते, हे वर्णन सर्वसाधारण कुठल्याही बाळाला लागू पडेल असे साचेबंद असते. विशेषतः राम, कृष्ण यांच्या नावाचे किंवा शिवाजीसारख्या ऐतिहासिक पुरुषाच्या नावाचे असते. दुसरा प्रकार अंगाई गीतांचा मुलाला झोपविण्यासाठी अंगाईगीते म्हणतात.

हत्तरंग हलवी जया, करूनि मृदूरवा
ब्रम्हसगुण बाळरूप रमत अंतरी तथा ॥

मृदुरखाने रमविणे बाळाला झोपविणे | एवढचाच हेतूने प्रत्येक माता गात असते. अंगाईगीताचा वापर ठरावीक व निश्चित कार्यासाठी होत असल्याने कार्यगीते म्हणून त्यांचा समावेश लोकसाहित्याच्या उपदालनात होतो. शिवाय प्रामुख्याने ही स्त्रीगीते असल्याने त्यांना अपौरूषेय वाङ्मय म्हणता येईल. रचनाकार वा रचनानिर्मितीचा काळ सारेच अज्ञान असल्याने एक अनाम, अनौपचारिक साहित्य व युगायुगांची मौखिक परंपरा म्हणून त्यांचे चिरंतन महत्त्व आहे. मुलीला मागणी घालण्यास आल्यावर त्याप्रसंगी म्हटली जाणारी गाणी तारा परांजपे यांनी मिळविली आहेत.

नवरी पाहो आले। बसले अंगनी नवरी शुक्राची चांदणी
नवरी पाहो आले ढालजी थोपले चंद्रज्यातीला दिपले

ही गाणी ओवी छंदात दिसून येतात. लग्नाच्या निमित्ताने जे वेगवेगळे विधी केले जातात त्या विधीच्या निमित्ताने गाणी म्हणण्याची प्रथा आहे. लग्नाच्यावेळी मुहूर्तमेढ रोवली जाते. सुवासिनींना बोलावून मुहूर्त करतात. घरातील जाते, उखळ, मुसळ, केरसुणी, सूप यांची पूजा केली जाते. मुहूर्तमेढीला हळकुंड बांधले जाते. 'लगन काढीले पाचा दिशी करा कुक्काची सायासी करा तिकशाची सायासी मुहूर्तासाठी वेगवेगळ्या देवदेवतांना मूळ धाडा असे वर्णन आलेले आढळते.

'आधी मूळ धाडा। घुंगराची गाडी
शालजोडीची वऱ्हाड़ी। ज्योतिबाशी

असे आवाहन मूळाच्या गाण्यातून केलेले असते. मांडव घालणे हा लग्नातला एक महत्त्वाचा विधी असतो.

'मांडव घातीला चारी कोन ग साधून
उमा कबर बांधून गनराज।।'

तेलन पाडतानाच पोखण्याचाही विधी खानदेशात होत असतो. या पोखण्यातून वधू-वरांच्या गळयात कच्च्या सूताच्या लडी पिवळया करून घालतात. त्यांना पोयतं असे म्हणतात. नवरदेव नवरीला पोयतं करताना पुढील लोकगीत संपूर्ण खानदेशात खूपच लोकप्रिय आहे. प्रत्येक लग्नात शक्यतो हे लोकगीत गायले जाते.

गंगा जमुना दोन्ही खेते । तठे काय देव पौळाना रोपे तठे काय सिताबाई काते तठे काय परभू घाले ताना तठ काय आंबियाना घाना। इसनू किसनू कांड्या भरे राइरूखमनी पोयतं करे। तठलं पोयातं कोनले आनं नवरदेवना दादा भाऊले आनं। नवरदेवना बाप घोडे ऊना नवरीकडेही याच पध्दतीने लोकगीत म्हटले जाते.

नवरीना बाप घोडे ऊना। बासिंग मोती जड़े उना
बासिंग मोती चौदा चौदा कळी लेती नवरीनी कुयी

गंगा यमुना या नद्यांच्या दोन्ही तीरावर मोठ मोठ्या कापसांची बोंडे आहेत. देव पौला नावाच्या जातींची ती रोपे आहेत. सीता देवी कापूस कातते, विष्णू देव, कृष्णदेव त्या कापसाने रीळ तयार करताहेत. त्या दोऱ्याने दादाभाऊ नावाच्या नवरदेवाच्या गळयात पोयतं तयार केले जात आहे. अशी कल्पना केली आहे. नवरीची आत्या चौदा कळी बाशिंग यांच्यासाठी खरेदी करते. या भावनेतही इहलौकिक श्रीमंतीचा दर्प आहे. शिवाय आत्यानेच बाशिंग खरेदी करणे हे लोकपरंपरा आहे. लग्नात मांडवाला देवक बांधले जाते. त्यावेळी सुवासिनी गाणी गातात. असे केल्याने भूतबाधा होत नाही अशी समजूत आहे.

"दही भाताची शिदोरी। दववया चालला डोंगरी। त्याच्या खांद्यावर कुऱ्हाडी त्यानं तोडली सौदंडी। वाळयाघरची सुपारी। बुरडा घरची दुरडी। खाल्या घरची कुऱ्हाडी त्यानं तोडीला शमदडी का आनला हनमंताच्या पारा। आनला वाजत गाजत । चारी गल्ल्या की मिरवत ।

प्रस्तुत गीतात देवकाच्या प्रथेचे वर्णन आलेले आहे. हळद लावण्याच्या प्रसंगी म्हणावयाची विपुल लोकगीते सर्वत्र प्रचलित आहेत. हळद दळताना किंवा कांडताना घाणा करण्याची पध्दत आहे. विवाहमुहूर्त निश्चित झाला की आदल्या दिवशी घरातले जाते, उखळ, मुसळ रंगवलेल्या पांढ-या चिंधीने बांधले जाते. या चिंधीमध्ये सुपारी आणि लेकुरवाळे हळकुंड असते. लेकुरवाळे हळकुंड म्हणजे एका मोठ्या हळकुंडाला छोटे छोटे फाटे फुटलेले असतात. अशा पध्दतीने चिंधी बांधल्यानंतर जात्यामध्ये मुहूर्ताचे दळण दळले जाते. ही क्रिया सुरू असताना सुवासिनी वधू-वरासह जात्या मुसळाला हात लावून लोकगीते गातात

तुयशी बिंद्रावनले कोन घाले बट्टा। नि कोणता भाईना बेटा।।धृ।।
तुयशी बिंद्रावनले मोहन घाले वट्टा नि आन्ना भाईना बेटी ।
तुयशी बिंद्रावनले कौन लाये माटी नि कोनता भाईनी बेटी ।
तुयशी बिंद्रावनले सारजा लाये माटी। नि तात्याभाई जी बेटी

थोडक्यात तुळशीच्या लग्नानंतर वधू-वरांचे लग्न करणे ही लोकरूढी आहे. या अगोदर आलेले लग्न सुखी राहत नाहीत असा लोकसमज आहे. लौकिक वैवाहिक आयुष्य सुखी जावे या ऐहिक दृष्टीने अशा पध्दतीने लोकसमज पाळले जातात. खणत्या आणि खणतीच्या हातानेच अगोदर नवरदेवाला हळद चढते. ही हळद तीन, पाच, सात, नऊ अशा दिवसांची असते. लग्नानंतर तितक्याच दिवसांनी ती हळत उतरते. त्यांच्यामध्ये देवीगुण अवतरतो अशी लोकश्रध्दा आहे. खणत्याच्या हाताने हळद लावल्यानंतर एक लोकगीत खानदेशात विशेष प्रचलित आहे.

खनखन कुदाई माती । खनखन कुदाई लखलख माती ती माती... ती माती कुंभारघरी ती माती कुंभारघरी कुंभार

भाऊनि दामँडा घडी दामेंडा घडी ना सरी ना चरी नवरी गयी तिना मामानी आई। नवरी गयी लिना मामानी आई माँ मामाजी मामोजी आंदन काई। मामांजी मामांजी आंदन काई ल्हेसू व भाशाबाई जांभोया गायी। जांभोया गायी नि हंडा निगुंडा इथलं ल्हेशी वं दैवानी नारी इथलं ल्हेशी नि परघर जाशी

कुदळीने (टिकावासारखे हत्यार) खनखन आवाज करीत माती खोदली जाते. त्या उत्कृष्ट मातीचा दामेंडा (माठ) चांगल्या पध्दतीने घडवला जातो. नवरीने मामाकडे आंदन (सप्रेम भेट) मागण्याची लोक रीत आहे. लग्नानंतर नवरा नवरीची वरात काढली जाते. त्यावेळी वरातीच्या भागे स्त्रीया गाणी गातात. नवरा नवरीला जितून (जिंकून) नेत आहे असे वर्णन वरातीच्या गीतात असते. वधू सासरी जाऊ लागली की पाठवणी करताना गीत म्हटली जाते.

केली सारी वाढविली जाई सारी फुलविली नवरदेवांनी चोरूनी नेली घाव घाव नवरीचे आई।'

लग्नाच्या निमित्ताने होणारे वेगवेगळे समारंभ, जगणारे पाहुणे रावळे, त्यांचे रूसवे फुगवे, आहेर-माहेर, करवली. मेहुणी, इन इवाई यांची वर्णने त्यांच्यातील परस्परसंबंध यांचे वर्णन या लोकगीतातून आलेले असते.

ऋतूप्राप्ती होण्याअगोदर मुलीचे लग्न व्हायला पाहिजे असा दंडक धर्माने घालून दिलेला होता. अनेक जमातीत आजही ह्या प्रथेनुसार मुलींचे लग्न केले जाते. ऋतूप्राप्ती झाल्यावर सोळा दिवस मखरात बसवून मुलीचे कौतुक करण्याची प्रथा प्रचलित होती. या विधीला सर्वच वन्य जमातींमध्ये विशेष महत्त्व असलेले दिसते. स्त्रीच्या मातृत्वशक्तीचा गौरव करण्याची भावना या विधीमागे असावी. हा सुफलीकरणाचा विधी असतो.

'काळी चंद्रकला । नका देऊन राघेला
आली न्हाणाच्या पदाला

अशा तऱ्हेचे वर्णन असणारी ही गाणी असतात. हिरव्या बांगड्या, हिरवी साडी चोळी नेसवून लेकुरवाळ्या हळकुंडाने तिची ओटी भरली जाते. या साऱ्या वस्तू सूचक आणि प्रतीकात्मक असतात. ही सारी प्रतिके सुफलीकरणाशी निगडित आहेत. विवाहित असलेल्या मुलीचे अभिष्टचिंतन करताना ओटी मांगल्य बहाल केलेले आहे. मातृत्वाची एका अर्थाने पूजा केलेली आहे आपल्या संस्कृतीने.

याशिवाय गौरी गणपती, नवरात्र, कोजागिरी, मकरसंक्रांत, होळी, नारळी पौर्णिमा इत्यादी प्रसंगी विधी केला जातो. विधीच्या निमित्ताने लोकगीते म्हटली जातात. मर्तिकाच्यावेळीही अशी विधीगीते म्हणण्याची प्रथा अस्तित्वात असलेली दिसते. जीवनाच्या सर्व अंगांना व्यापून उरणारा, धर्म, कला, शिल्प, चित्र आदी कलांमध्येही स्थान असलेल्या स्वतःला दिव्य व गूढ शक्तीने देवतारूप पावलेला आदिम काळापासून साऱ्या भारतभर पूजला गेलेला व अनेक लोककथा-दंतकथांना जीवनरस पूरविणारा नागराज नागर नि ग्रामीण अशा दोन्ही संस्कृतींनी स्वीकारलेले एकमेव उदाहरण असावे. जल नि भूमि यांच्याशी निगडित असल्याने कृषी संस्कृतीला तर तो अधिकच पूजनीय वाटतो. म्हणूनच खेडूतांच्या घरात आढयावर, भितीवर आधारासाठी घातलेल्या काठीवर, कपाळीच्या गोंदणावर, काच-खड्यांनी काढलेल्या चित्रावरही नागदेवता आजही विराजमान झालेली दिसते. लोकगीतातून पंचमीचे आलेले चित्रण -

सणामंदी सण नागपंचमी खेळायची
वाट पहाते बोलायाची
एकादस पारणं बहीण घरते भावाचं
नगोबादेवाचं काय होईल जिवाचं
पंचमीच्या दिशी नागोबाला पऊतं
सोड कुणब्या आऊत
पंचमीचा सणनागाला दूधलाहया
आऊक्ष मागू या भाऊराया
पंचमीच्या दिशी नाग काठीला भिंतीशी
बहीण भावाची उपाशी

मंगळागौर ही एक देवी आहे. हिचे देऊळ काशीत आहे. हिची पूजा नवविवाहित मूली लग्न झाल्यावर ओळीने पाच वर्षे करतात. हिची पूजा श्रवण महिन्यात प्रत्येक मंगळवारी असते. हे एक सुवासिनीचे सौभाग्यव्रत आहे. या व्रताच्या निमित्ताने मुली सूप दोन्ही हातात धरून नाचतात. सूप नाचवणारी गाणे गात मध्ये असते व तिच्या भोवती मुलींचा फेर असतो.

या गावचा त्या गावचा माळी नाही आला वेणी नाही मला कशी मी नाचू ? बाकीच्या मुली तिला सांगतात

नाच ग घुमा
या गावचा त्या गावचा सोनार नाही आला
पाटल्या नाही मला। कशी मी नाचू ?
बाकीच्या मुली तिला सांगतात
नाच ग घुमा
या गावचा त्या गावचा कासार नाही आला
बांगड्या नाही मला | कशी मी नाचू ?

याप्रमाणे विविध कारणे गाण्यात सांगून ती नाचायला नकार देते खरी पण तरी सुध्दा सगळया मुली तिला नाचायला सांगतात. यातून तत्कालीन समाजजीवनाचा परिचय लोकसाहित्याच्या अशा लोकगीतातून होत असतो हे. नक्कीच, गौरीपूजन हा महाराष्ट्रातील सण आहे. यास

भुक्ति से छोटी इकाई विषय थी जो विषयपति के नियंत्रण में थी। विषयपति विषय परिषद की सहायता से शासन करता था जिसके सदस्य नगर श्रेष्ठी, सार्थवाह, प्रथम कुलिक, एवं प्रथम कायस्थ होते थे। विषयों को वीथियों में विभाजित किया गया था। वीथि की समिति में भूस्वामियों एवं सैनिक कार्यो से संबंधित व्यक्तियों को रखा जाता था। वीथि से छोटी इकाई पैठ थी जो विभिन्न गाँवो का समूह था और सबसे छोटी इकाई गाँव थी जिसका प्रधान ग्रामपति कहलाता था। नगरों का प्रशासन नगरपति या पुरपाल नगर सभा की सहायता से करता था। इस प्रशासन में व्यापारी एवं शिल्पी संघ प्रमुख भी भाग लेते थे( गुप्त काल के संदर्भ में)। दक्षिण भारत में चोलों की स्थानीय शासन व्यवस्था में पंचायतों व ग्राम सभाओं की महत्वपूर्ण भूमिका रही है। चोलों की स्थानीय शासन व्यवस्था पूरी तरह से जनकल्याण पर आधारित थी।

**भारत में राजनीति का विकासक्रम**

भारतीय राजनीति और शासन की कुछ विशेषताएं प्रारंभिक कबीलाई जनजातीय समाज में स्पष्ट रूप से देखी जा सकती है। सिन्धु घाटी सभ्यता, वैदिक सभ्यता, छठीं शताब्दी ईसा पूर्व महाजनपद कालीन, मौर्य कालीन, कुषाण कालीन, गुप्त कालीन, हर्ष कालीन व पूर्व मध्यकालीन (राजपूत कालीन) राजव्यवस्था में प्राचीन भारतीय राजनीति व शासन की विशेषताएं निरंतर परिवर्तन के साथ देखी जा सकती है। जिसकी जानकारी के स्त्रोत तत्कालीन साहित्य, शिलालेख, सिक्के, अनुदान पत्र और विदेशी यात्रियों के विवरण आदि हैं।

**सिंधु सभ्यता से महाजनपद काल तक (2350-600 ईसा पूर्व)**

भारतीय इतिहास में राजनीति और शासन की प्रारंभिक विशेषताएं प्रागैतिहासिक काल के नवपाषाण काल में कबीलाई समाज के अस्तित्व में आने पर दिखाई देती है। उस समय के लिखित विवरण चाहे न हो। इसके पश्चात सिन्धु सभ्यता में भी इसके दर्शन होते हैं। लिखित प्रमाण वैदिक काल में स्पष्ट रूप से दिखाई देने लगते हैं। वैदिक सभ्यता मुख्यतः ग्रामीण ढांचे, पशुपालन और कृषि पर आधारित पितृ सत्तात्मक एवं कबीलाई समाज के रूप में संगठित थी। छठीं शताब्दी ईसा पूर्व आर्यों की राजनीतिक गतिविधियों का केंद्र सिन्धु नदी के भौगोलिक क्षेत्र से हटकर गंगा नदी घाटी (उ. प्र., बिहार) था। लौहे एवं अग्नि के प्रयोग, साम्राज्यवादी युद्ध, कृषि एवं व्यापार के बढ़ते महत्व ने विशाल गंगा घाटी की राजनीति पर आर्यों को अधिकार करने के लिए प्रेरित किया। वैदिकोत्तर काल की कई राजनीतिक घटनाओं और विचारों ने भारत के इतिहास एवं भूगोल दोनों में परिवर्तन लाने में अपना योगदान दिया। बड़े बड़े राज्यों का निर्माण, नगरीकरण, सिक्कों का प्रारंभ, व्यापार एवं उद्योगों की स्थापना, विदेशी हमले, बौद्धिक क्रांतिया धार्मिक आंदोलन ऐसे ही तत्व थे जिनसे उस समय के नये भारत का निर्माण हुआ।

वैदिक कालीन राजनीतिक गतिविधियों के पश्चात संगठित एवं विशाल साम्राज्य का उदय छठीं शताब्दी में राजनीतिक गतिविधियां मगध के हर्यक वंश के शासक बिम्बिसार के नेतृत्व में प्रारंभ हुई जो शिशुनाग वंश एवं नन्द वंश के नेतृत्व में विस्तार हुआ तथा अंततः चाणक्य एवं चन्द्रगुप्त मौर्य की जोड़ी ने इसे विशाल साम्राज्य में बदल दिया। बौद्ध ग्रंथ अगुत्तर निकाय व जैन ग्रंथ भगवती सूत्र में सोलह (16) महाजनपदों की सूची मिलती हैं। इसी के साथ बुद्ध के समय दस (10) गणराज्य भी अस्तित्व में थे। गणतंत्रों की शासन व्यवस्था में गण यानि राजा प्रमुख होते थे। अनेक छोटे गणों के प्रमुख राजा मिलकर गणतंत्र का निर्माण करते थे। ये सभी गणतंत्र वर्तमान लोकतान्त्रिक चुनाव पद्दित के आधार पर अपने मे से

एक गणतंत्र के प्रमुख राजा का चुनाव करते थे। गणतंत्र साम्राज्य जनकल्याणकारी अवधारणा पर कार्य करते थे। 16 महाजनपद काल में विभिन्न शक्तियों के मध्य परस्पर राजनीतिक संघर्ष (200) वर्षों तक जारी रहा। मगध, काशी, कोशल, अवन्ती, वत्स, गंधार आदि संघर्षरत राज्य थे। अंत में मगध (क्रमशः हर्यक, शिशुनाग एवं नन्द वंश) के द्वारा सभी राज्यों को जीत कर विशाल साम्राज्य का निर्माण किया। नन्द वंश के अंतिम शासक घनानन्द को हराकर चन्द्रगुप्त मौर्य ने भारत में सबसे बड़े मौर्य साम्राज्य का निर्माण (322 ईसा पूर्व) किया। जिसे युनानी साहित्यिक स्रोतों में 'सैंड्रोकोट्स' एवं 'एन्ड्रोकोट्स' कहा गया है।

**ईरानी व यूनानी आक्रमण**

भारत में सर्वप्रथम विदेशी आक्रमण ईरानियों (फारसियों) के शासक कूरूष ने 558- 540 ईसा पूर्व में किया था। सर्वप्रथम फारसी शासक 'डेरियस' ने सिन्धु के तटवर्ती भागों पर विजय प्राप्त की थी। भारत में ईरानी शासन की 'क्षत्रप प्रणाली' का विकास इस सफल आक्रमण के पश्चात हुआ। ईरानी आक्रमण की सफलता के बाद दूसरा विदेशी सफल आक्रमण यूनान के शासक 'सिकन्दर' ने 326 ईसा पूर्व में किया था। सिकन्दर ने व्यास नदी तक के भारतीय क्षेत्रों पर अपना अधिकार जमा लिया था। सिकन्दर के इस सफल अभियान ने भारत के संघर्षरत राज्यों को अप्रत्यक्ष रूप से राजनीतिक एकता स्थापित करने के लिए प्रेरित किया, और विशाल मगध साम्राज्य की स्थापना मौर्य वंश ने कर इसे चरितार्थ भी किया।

**मौर्य काल**

भारत में सर्वप्रथम सबसे बड़े साम्राज्य का निर्माता तथा इसे राजनीतिक एकता एवं प्रशासनिक व्यवस्था की एकरूपता में बाँधने का श्रेय चन्द्रगुप्त मौर्य को ही दिया जा सकता है। मौर्य वंश के शासकों क्रमशः चन्द्रगुप्त मौर्य, बिन्दुसार, अशोक आदि के कुशल नेतृत्व में पहली बार वास्तविक अर्थों में राजनीतिक एकता को स्थापित किया गया था। इसलिए 'चन्द्रगुप्त मौर्य' को भारत का प्रथम सम्राट तथा 'अशोक' को राष्ट्रीय शासक की संज्ञा (प्रजा के प्रति समानता की नीति अपनाने के कारण) दी जाती है। मौर्य काल में सर्वप्रथम चंद्रगुप्त मौर्य व मौर्य सम्राट अशोक ने अनेक जन कल्याणकारी कार्य किये और भारत में आदर्श शासक की अवधारणा को वास्तविक रूप में चरितार्थ किया जिसकी जानकारी का स्रोत चाणक्य की पुस्तक 'अर्थशास्त्र' और मेगस्थनीज की 'इंडिका' है।

**मौर्योत्तर काल**

मौर्य वंश के पतन के पश्चात के काल को मौर्योत्तर काल कहा जाता है जो कि गुप्तकाल तक चलता है। मौर्योत्तर काल राजनीतिक दृष्टि से क्षेत्रीय शक्तियों एवं विदेशी शक्तियों के हमलों का काल था। इतिहासकार इस काल को अंधकार युग कहते हैं, लेकिन आज आर्थिक विकास, धार्मिक, साहित्यिक प्रगति, नगरीकरण में वृद्धि आदि के आधार पर इसे 'स्वर्ण युग' तक की संज्ञा देते है। इस काल के प्रमुख राजवंशों में उत्तर भारत में शुंगों ने तथा दक्षिण भारत में सातवाहनों (मातृसत्तात्मक) ने विशाल राज्य स्थापित किए। विदेशी ग्रीक शासकों में मिनांडर लोकप्रिय हुआ। कुषाण वंश में कनिष्क महानतम हुआ। दोनों ने भारतीय बौद्ध धर्म, संस्कृति को अपनाकर संरक्षण दिया। इस समय विभिन्न क्षेत्रीय एवं विदेशी शक्तियों (इंडोग्रीक, शक, पहलव, कुषाण) के बीच सत्ता संघर्ष का काल था। इसी समय दक्षिण भारत में संगम युग (साहित्य के सम्मेलन/परिषद् के कारण) में चोल, चेर, पाण्डय वंशों की राजनीतिक शक्तियों का शासन था।

**गुप्त काल**

मौर्योत्तरकाल में भारतीय क्षेत्रीय शक्तियों के उदय और विदेशी आक्रमणकारियों की सफलताओं ने गुप्त (275-550 ईस्वी ) के नेतृत्व में फिर से भारत में राजनीतिक एवं प्रशासनिक एकता स्थापित हुई। गुप्त वंश (श्रीगुप्त संस्थापक) का उदय राजनीतिक, प्रशासनिक, सांस्कृतिक एकीकरण और समृद्धि की दृष्टि से महत्वपूर्ण है। बहुत लम्बे समय पश्चात छोटे छोटे राज्यों पर विजय प्राप्त कर समुद्रगुप्त (भारतीय नेपोलियन) द्वारा विशाल गुप्त साम्राज्य का निर्माण किया गया। शक शासक (पश्चिमी भारत सौराष्ट्र) पर विजय प्राप्त करने के कारण चन्द्रगुप्त द्वितीय (विक्रमादित्य) गुप्त वंश का राजनीतिक महत्व बढ़ गया। गुप्त वंश को ही सबसे अधिक अभिलेख जारी करने एवं सबसे अधिक स्वर्ण सिक्के चलाने का श्रेय भी जाता है। गुप्तों के नेतृत्व में भारत के सांस्कृतिक एवं आर्थिक विकास के कारण ही इस काल को प्राचीन भारतीय इतिहास का स्वर्णकाल कहा जाता है। गुप्त शासकों की सहिष्णुता एवं उदारता से बहुपक्षीय जीवन का विकास हुआ, गुप्त शासन काल में भी गुप्त शासको ने जनकल्याणकारी कार्य को प्राथमिकता दी थी ! किन्तु दास प्रथा (15 प्रकार के दास), जातिप्रथा व अस्पृश्यता में वृद्धि, सामंती ढांचे का विकास,

विशेषाधिकार युक्त समाज ने गुप्तकाल की राजनीतिक व सांस्कृतिक प्रगति को रोक दिया था। लगभग 550 ईस्वी तक गुप्त साम्राज्य का पतन हो गया था। गुप्त वंश का अंतिम शासक कुमारगुप्त तृतीय था। साम्राज्य के पतन से जिस राजनीतिक शक्ति शून्यता ने जन्म लिया उसे भरने के लिए छोटे- बड़े गुप्त सामंती राजाओं के बहुकोणीय संघर्ष से भारतीय राजनीतिक एकता प्रभावित हुई (छिन्न भिन्न हो गई)। इस विकेन्द्रीकरण व आपसी संघर्ष से आर्थिक एवं सांस्कृतिक विकास भी प्रभावित हुआ। लेकिन इस काल में बड़े पैमाने पर मंदिरों का निर्माण रोचक घटना माना जाता है। राजनीतिक स्तर पर क्षेत्रीय शक्तियों का उदय तथा इनके बीच आपसी संघर्ष (युद्ध) इस काल में आम बात थी।

**हर्षवर्धन का काल**

सातवीं शताब्दी के प्रारंभ में पुष्यभूति वंश के शासक हर्षवर्धन के नेतृत्व में एक बड़े साम्राज्य का निर्माण राजनीतिक एकता एवं विकास के दृष्टिकोण से महत्वपूर्ण माना जा सकता हैं। सम्राट हर्ष एक प्रजा हितेषी शासक था। उसका पूरा ध्यान जनता के नैतिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास पर था। हर्ष के समय उत्तर भारत में अनेक सामंती शक्तियों का उदय हुआ तथा दक्षिण भारत में चालुक्य वंश के पुलकेशिन द्वितीय के नेतृत्व में शक्तिशाली राज्य की स्थापना हुई। दक्षिण में नर्मदा नदी के तट पर चालुक्य शासक पुलकेशिन द्वितीय से हर्षवर्धन पराजित हुआ। सम्राट हर्षवर्धन की मृत्यु के पश्चात भारत में फिर से राजनीतिक विकेंद्रीकरण के युग की शुरुआत हुई।

**राजपूत काल**

फिर से भारतीय राजनीति में आपसी संघर्ष, छोटे-छोटे स्थानीय राजपूत राज्यों की स्थापना, आत्मसम्मान, आन, बान, शान और वचन निभाने के लिए प्राणों की बलि देने की भावनाऐं, शत्रु की पीठ पर वार नहीं करना, निशस्त्र और भागते हुए दुश्मन पर आक्रमण नहीं करना आदि सिद्धातों ने भारत के गौरव में चार चाँद लगाये थे। सम्राट हर्षवर्धन की मृत्यु के पश्चात कन्नौज भारत की विभिन्न शासन शक्तियों के आकर्षण का केन्द्र बन गया था। अब कन्नौज को वहीं स्थान प्राप्त हो गया जो गुप्तकाल तक मगध साम्राज्य की राजधानी पाटलिपुत्र को राजनीतिक रूप से प्राप्त था। उत्तर भारत का चक्रवर्ती शासक बनने के लिए कन्नौज पर अधिकार करना अब आवश्यक समझा जाने लगा था। उस समय गंगा-यमुना के मध्य स्थित दोआब एवं व्यापारिक दृष्टि से कन्नौज को महत्वपूर्ण स्थान प्राप्त हो चुका था। आठवीं शताब्दी में कन्नौज पर राजनीतिक अधिकार करने के लिए उस समय की तीन प्रमुख बड़ी शक्तियां - गुर्जर प्रतिहार, राष्ट्रकूट तथा पाल आपस में संघर्षरत हो गई थी। उस समय कन्नौज पर शक्तिहीन आयुध वंशीय शासक शासन कर रहे थे। लगभग दो सौ (200) वर्षों तक चले इस आपसी संघर्ष में अंतिम रूप से विजय गुर्जर प्रतिहार वंश के शासकों की हुई। समस्त राजपूत शासको ने जन कल्याणकारी कार्यों पर बहुत अधिक बल दिया जैसे बावड़ियों, तालाबों, मंदिरों आदि का निर्माण करवाना।

इस्लाम की स्थापना के पश्चात पश्चिमोत्तर भारत की सीमाओं की मुस्लिम आक्रमणों से सुरक्षा और रक्षा की जिम्मेदारी राजपूतों (गुर्जर प्रतिहार, परमार, चालुक्य, चौहान, चन्देल आदि) ने प्रमुख रूप से निभाई थी। पश्चिमोत्तर भारत जब विदेशी मुस्लिम आक्रमणों का सामना कर रहा था उसी समय दक्षिण भारत में सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, चोल, पाण्डय, चोल आदि राजवंश अपनी राजनीतिक शक्ति एवं सांस्कृतिक उपलब्धियों का एक नया अध्याय लिख रहे थे तथा दक्षिण भारतीय समाज को दृढ़ता और स्थायित्व बनाये रखने का कार्य कर रहे थे।

इस्लाम धर्म के महान सिद्धातों (एकेश्वरवाद, समानता और आपसी भाईचारे) पर आधारित मुस्लिम राज्य का उदय एवं विकास हुआ। जिसका प्रभाव खलीफा उमर (636 ईस्वी) के समय से ही भारत पर पड़ना शुरू हुए जो क्रमशः 712 ईस्वी में मुहम्मद बिन कासिम, 1000-1027 ईस्वी तक महमूद गजनवी 17 (सत्रह आक्रमण भारत पर लगातार सफलतापूर्वक किये) तथा 1175-1206 ईस्वी के मध्य मुहम्मद गोरी के द्वारा आक्रमण निरंतर किये जाते रहे। इतिहासकार 1192 ईस्वी में हुए तराइन के द्वितीय युद्ध में पृथ्वीराज चौहान तृतीय की पराजय और मुहम्मद गोरी की विजय से भारत में मध्यकालीन इतिहास ( इस्लामिक राजनीतिक इतिहास) की शुरुआत मानते हैं।

**प्राचीन भारत के प्रमुख राजवंश, सस्थापक शासक और अंतिम शासक**

| राजवंश व समय | संस्थापक शासक | अंतिम शासक |
|---|---|---|
| हर्यक वंश (544-412 ईसा पूर्व) | बिम्बिसार (544-492 ईसा पूर्व) | नागदशक |

| | | |
|---|---|---|
| शिशुनाग वंश (412-344 ईसा पूर्व) | शिशुनाग (412-394 ईसा पूर्व) | नंदिवर्द्धन |
| नंद वंश (344- 323 ईसा पूर्व) | महापदमनंद ( उग्रसेन) | घनानन्द |
| मौर्य वंश ( 323-184 ईसा पूर्व) | चन्द्रगुप्त मौर्य (323-298 ईसा पूर्व | बृहद्रथ |
| शुंग वंश (185-75 ईसा पूर्व) | पुष्यमित्र शुंग (184-151 ईसा पूर्व) | देवभूति |
| सातवाहन वंश | सिमुक | यज्ञश्री सातकर्णी |
| कण्व वंश (75-30 ईसा पूर्व) | वासुदेव | सुशर्मा |
| कुषाण वंश | कुजुल कैडफिसस या कैडफिसस प्रथम | वासुदेव |
| गुप्त वंश (275-550 ईस्वी) | श्री गुप्त (275-300 ईस्वी) | विष्णु गुप्त |
| पुष्यभूति वंश | पुष्यभूति | हर्षवर्धन (606-647 ईस्वी) |
| | | |

**सारांश**

अत: हम निष्कर्ष रूप में कह सकते हैं कि प्राचीन भारतीय राजनीतिक प्रशासनिक व्यवस्था में केन्द्रीकरण, विकेन्द्रीकरण, जनकल्याण, सहिष्णुता, त्याग, बलिदान, समर्पण, निष्पक्षता, ईमानदारी, योग्यता, दक्षता, कार्य विभाजन, वचनबद्धता, युद्ध में वीरता और धीरता, भागते और शस्त्रहीन शत्रु पर वार नहीं करना, धर्म- कर्म का महत्व आदि उपरोक्त गुण स्पष्ट रूप से उसमें चार चाँद लगाते हुए दिखाई देते हैं, लेकिन वर्ण व्यवस्था, जाति व अस्पृश्य व्यवस्था, (इससे भारतीय समाज की अधिकांश प्रजा युद्ध कौशल और सांस्कृतिक कार्यो से वंचित रह गयी) छल-प्रपंच, षडयंत्र, वंशानुगतता, आपसी संघर्ष, उत्तराधिकार के लिए संघर्ष, अयोग्य उत्तराधिकारियों को दायित्व देना, विदेशी आक्रमणकारी शक्तियों को भारतीय राजाओं द्वारा सहयोग और साथ देना आदि ऐसे कारण थे जिन्होंने भारत को विदेशी शक्तियों का गुलाम बना दिया। इन सबके होते हुए भी भारतीय राजनीतिक प्रशासनिक व्यवस्था प्रगतिशील रही है। इसके गुणों को अपना कर हम एक नये विश्वगुरु भारत का निर्माण कर सकते हैं। जो आत्मनिर्भरता की नई कहानी लिखने के लिए तैयार है, बस हमें उन दुर्गुणों और बुराईयों से भारत के नागरिकों को बचाकर रखना है जो विभिन्नता, कट्टरता, धर्मांधता, साम्प्रदायिकता, जातिवाद आदि को बढ़ावा देकर भारत की राजनीतिक एकता का रास्ता रोकती रहती है। भारत को हमें फिर से सोने की चिड़िया और दूध की नदियों वाला देश बनाने के लिए समता, स्वतंत्रता, न्याय, कर्मठता, निष्पक्षता, पारदर्शिता, सत्यनिष्ठा, जवाबदेही जैसे नैतिक गुणों का विकास नागरिकों में करना होगा।

**सन्दर्भ**

1. जैन, रनीश, 2012, इतिहास, सिविल सेवा (मुख्य) परीक्षा, अरिहंत पब्लिकेशन् (इण्डिया) लिमिटेड मेरठ।
2. झा, डी.एन. एवं श्रीमाली के. सी., प्राचीन भारत का इतिहास।
3. श्रीवास्तव, के. सी., प्राचीन भारत का सामाजिक- सांस्कृतिक इतिहास।
4. सिंह, एस. एन., 2013, राजनीति विज्ञान शब्दकोश, रावत पब्लिकेशन्स, जयपुर।
5. www.hi.m.wikipedia.org ।
6. https//www.civilhindipedia.com ।

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, June 2022, Volume-14, Issue-6

# पुनर्वसनाचे शासनाचे धोरण व शिवना टाकळी प्रकाल्पग्रस्तांचे वास्तव

**प्रा. नंदकुमार कुकलारे**
सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख, श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय,
देवगाव रंगारी, ता. कन्नड जिल्हा. औरंगाबाद-४३१११५

**सारांश:** देशाचा विकास व सार्वजनिक हित साधण्यासाठी लोकांच्या मर्जीविरुद्ध सक्तीने प्रकल्पासाठी जमीनी संपादित करण्यात येतात . तेव्हा त्या प्रकल्पग्रस्तांना पूर्वीपेक्षा अधिक सुस्थितीत जीवन जगता यावे म्हणून शासनाने १९८६ पासून ते आतापर्यंत प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनासाठी धोरण आखलेले आहेत. तसेच त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणल्या आहेत. वेगवेगळया समित्यांनी केलेल्या शिफारशी शासनाचे विविध शासन निर्णय अन्वये प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनासाठी धोरण आखलेले आहे. त्यात प्रामुख्याने प्रकल्पग्रसतांना पर्यायी जमीन देण्याची तरतूद, पुनर्वसित गावात कुटुंबातील संख्येनुसार भूखंड व त्यावर घर बाधण्यासाठी दहा हजार रु अनुदान शेतकरी कुटुंबाला गोठा बांधण्यासाठी अनुदान, छोटे व्यापारी किंवा ग्रामीण कास्तकार यांना शेड बांधण्यासाठी अनुदान, जमीनीचा ताबा घेतल्यापासून तर मोबदला मिळेपर्यंत दरमहा निर्वाह भत्ता राज्यशानाच्या आस्थापनामध्ये वर्ग ३ व ४ च्या पदावर सेवेत नियुक्ती, विविध सार्वजनिक उपक्रमे व महामंडळात स्वंयरोजगारासाठी प्रशिक्षण देणे, प्रकल्पग्रस्तांचे प्रमाणपत्र देणे उर्वरित शेतजमीनीला सिंचनासाठी प्रकल्पातून पाणी उपसा करण्याची परवानगी, अनुसूचित जाती/जमातीसाठी अधिकच्या सवलती, नवीन पुनर्वसित गावात जाण्यासाठी डांबरी रस्ता, अंतर्गत रस्ते, शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी रस्ते तयार करून देणे, पुनर्वसित गावात आरोग्य केंद्र, शाळा, डाकघर, बाजारतळ, बसस्टँण्ड, बाजार भरण्यासाठी जागा, खळवाळी, खेळासाठी मैदाने, दहनभूमी किंवा दफनभूमी, गटारे, पाणी पुरवठासाठी विहिर, पाईपलाईन नळे, वैयक्तिक व सार्वजनिक शौचकूप, वीजपुरवठा व अंतर्गत रस्त्यावर पथदिवे, ग्रामपंचायत कार्यालय व समाजमंदिर इत्यादी सुख सुविधा प्रकल्पग्रसतांना देण्याचे शासनाचे धोरण आहे. शिवना टाकळी प्रकल्पग्रस्तांना प्रत्यक्षात यातील फारच कमी सुविधा मिळालेल्या आहेत. सर्वसाधारणपणे पुनर्वसित गावात भूखंड, भूखंडावरील अनुदान व गावातील काही प्रमाणात नागरी सुविधा पुरविलेल्या आहेत. बाकी सर्व सुख सुविधापासून प्रकल्पग्रस्त वंचित आहेत.

**प्रस्तावना**:

सिंचन प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी महाराष्ट्र प्रकल्प विस्थापितांचे पुनर्वसन अधिनियम १९७६ राज्यात लागू करण्यात आला आहे. त्यामुळे सिंचन प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनाबाबत कायदेशीर हक्क प्राप्त झाला आहे. यापूर्वी राज्यामध्ये पुनर्वसनासाठी कायदा अस्तित्वात नव्हता. या अधिनियामाची अंमलबजावणी करतांना त्यात अनेक त्रूटी असल्याचे निदर्शनास आले आहे. त्या त्रूटी दूर करण्यासाठी श्री. अनंतराव थोपटे राज्यमंत्री (पुनर्वसन) यांच्या अध्यक्षतेखाली १९८२ मध्ये समिती स्थापन करण्यात आली. या समितीच्या अहवालातील सूचनेनुसार १९७६ च्या कायद्याच्या जागी नवीन महाराष्ट्र प्रकल्पबाधित पुनर्वसन अधिनियम १९८६ तयार करण्यात आला व त्याची अंमलबजावणी १९९० पासून सुरु करण्यात आली.

महाराष्ट्रातील विविध प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या लोकांच्या पुनर्वसनाशी संबंधित कायद्यांचे एकत्रीकरण करणे, त्यात सुधारणा करणे यासाठी महाराष्ट्र शासनाने हा अधिनियम पास केलेला आहे . याबाबत कलम १ मध्ये म्हटले आहे की, या अधिनियमास महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ असे समजले जाईल. कलम १ (४) अ नुसार, ज्या पाटबंधारे प्रकल्पाचे बाधित परिमंडळ क्षेत्र ५० हेक्टर असेल किंवा कार्यक्षेत्र २०० हेक्टर किंवा एखादे गावठाण बाधित होत असेल तर हा नियम लागू होतो. तसेच तो बहुसंख्य पाटबंधारे प्रकल्पांना अपोआपच लागू होता. इतर प्रकल्पाच्या बाबतीतही काही विशिष्ट प्रयोजनासाठी शासनाची परवानगी घेऊन या कायद्याच्या तरतूदी लावता येतात.

सदरील कायद्यातील कलम २ नुसार, शेतजमीनीतील संबंधित गावाच्या अभिलेखातील नोंद, अविभक्त हिंदू कुटुंबातील कर्ता पुरुष किंवा व्यवस्थापक म्हणून कोणत्याही एका भावाच्या नावाने केलेली असेल तेथे प्रत्येक भावाला त्या जमिनीत भाग (हिस्सा) राहील पण त्याचे नाव अशा गावाच्या अभिलेखात नोंदविलेले असो अथवा नसो त्याला प्रकल्पबाधित व्यक्ती म्हणून मानण्यात येईल. कुळवहिवाट कायद्यान्वये बाधित परीमंडळातील

जमिनीचा प्रत्यक्ष कब्जा, जमिनीच्या संपादनाच्या वेळी जिच्याकडे जमीन असेल त्याचा राहील. तसेच शेतमजूर असलेली व्यक्ती, लाभधारक परिमंडळातील ज्या भोगवटाधारकांची जमीन पाटबंधारे प्रकल्पातील कालवे व त्यांचे किनारेचे बांधकाम किंवा विकास करण्यासाठी किंवा बाधित विस्तार सुधारणा परीमंडळातील व्यक्तीच्या पुनर्वसनासाठी नवीन गावठाणासाठी संपादित केली असेल.

भोगवाटाधारक नसलेली अ, ब, क, ड मध्ये उल्लेख न करण्यात आलेली परंतु जी व्यक्ती भूमी-संपादन अधिनियम १८९४ च्या कलम १ खालील अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपूर्वीच्या सलग ५ वर्षापेक्षा कमी नाही. इतक्या अखंड कालावधीसाठी बाधित गावात राहत असेल, व्यापार-व्यवसाय, मजूरी, उपजिविका कार्य करत असेल अशी व्यक्तीही प्रकल्पबाधित समजली जाईल. असा शेतमजूर म्हणजे बाधित परिमंडळात कोणतीही जमीन धारण न करणारी परंतू ती जमीन ज्यात आहे कलम १३ अन्वये असे क्षेत्र बाधित परीमंडळ म्हणून घोषित केले जाण्याच्या लगतपूर्वी पाच वर्षापेक्षा कमी नसेल इतकी वर्ष त्या शेत जमीनीवर मुख्यतः शारीरिक कष्ट करून याद्वारे आपली व कुटुंबियांची उपजिविका करत असेल परंतु आपला उदरनिर्वाह चालवण्यापासून जीला मुकावे लागेल अशी व्यक्ती.

प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या भाग एकमधील सुरुवातीलाच या अधिनियमाचे संक्षिप्त नाव त्याची व्याप्ती, कार्यक्षेत्र या संदर्भात सविस्तर माहिती दिलेली आहे. इतर प्रकल्पातही हा अधिनियम कशाप्रकारे लागू होईल याचे सविस्तर विवेचन पहिल्या कलमात करण्यात आलेले आहे. कलम २ मध्ये बाधित झालेल्या परिमंडळाचे क्षेत्र कलम १३ नुसार त्यांची व्याख्या केली आहे. प्रकल्पबाधित व्यक्ती कोणास समजावे या संदर्भात व्याख्या स्पष्ट करण्यात आली आहे. केवळ शेतमालकीची जमीन प्रकल्पात गेली अशांचाच विचार न करता भोगवटादार म्हणून असलेली जमीन म्हणजे भोगवटादार किंवा कुळ म्हणून किंवा त्या दोन्ही नात्याची एखाद्या व्यक्तीने धारण केलेली एकूण जमीन तसेच त्या जमीनीवरील राहते घर, गोठा, विहिर, कृषीयोग्य नसलेली जमीन, पोट खराबा कालव्यासाठी ज्यांची जमीन वापरली ती जमीन किंवा कालवा बांधकाम यामुळे कसण्यास योग्य न राहिलेली जमीन अशा स्वरूपाच्या जमिनीचाही यात समावेश राहिल. तसेच हिंदू संयुक्त कुटुंबातील प्रकल्पबाधित व्यक्तीची जमीन कोणत्याही कुटुंब प्रमुखाच्या नावावर असलेली व इतराच्या नावावर नसली तरीही त्या कुटुंबातील सर्व बहिणी, भाऊ किंवा मृत भावाचा किंवा बहिणीचा मुलगा किंवा मुलगी अशा सर्वांना प्रकल्पबाधित म्हणून समजले जाईल. भूमिहीन असलेल्या परंतु बाधित परिमंडळात राहून उपजिविका करणाऱ्या, व्यावसायिक व्यापारी, विशेष म्हणजे जमीन स्वतःच्या नावावर नसलेला पण त्या जमिनीवर शारीरिक कष्ट करणारा, आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवणारा मजूरदेखील या अधिनियमात प्रकल्पबाधित म्हणून विचार करण्यात आलेला आहे. उपरोक्त बाबी या शासनाच्या धोरणात असल्या तरी शिवना टाकळी प्रकल्प बाधितांना मोठ्या भावाच्या नावावर जमिन असून लहान भावाला प्रकल्पग्रस्त म्हणून समाविष्ट केलेले नाही. त्यामुळे त्यांना पुनर्वसनाच्या सुविधा मिळालेल्या नाहीत. तसेच अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील विहिरी, पाईपलाईन, फळझाडे यांची नोंद न झाल्याने त्यांना मोबदला मिळालेला नाही. जे शेतमजूर म्हणून उपजिविका करत होते. त्यांनाही पुनर्वसनाचा लाभ मिळालेला नाही.

महाराष्ट्र शासनाद्वारे सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्रकल्प अधिकारी म्हणून पदनिर्देशित केलेले असेल किंवा प्रकल्प अधिकारी म्हणून ज्यांच्याकडे संपूर्ण प्रकल्पांची अंमलबजावणी करण्याचे अधिकार कार्ये सोपवले आहेत. अशा अधिकाऱ्यांचा समावेश असेल त्यांच्या जबाबदारी कलम २ उपकलम ११ मध्ये निश्चित केलेली आहे. तसेच कलम ३० मध्ये प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन लवकर करण्यात यावे. त्यांना कोणताही त्रास होणार नाही. यासाठी विविध अधिकाऱ्यांची पुनर्वसनाच्या कार्यातील कामाची जबाबदारी व कर्तव्ये निश्चित करण्यात आलेली आहेत. त्यामुळे कोणताही अधिकारी आपली जबाबदारी टाळू शकत नाही. आयुक्तांपासून ते स्थानिक अधिका-यापर्यंत प्रत्येकाची जबाबदारी व कर्तव्य कलमाच्या विविध तरतुदीद्वारे निश्चित केलेल्या आहेत. पुनर्वसनासाठी लागणारा आवश्यक निधीचे नियोजन करण्याची जबाबदारी कलम ४ नुसार आयुक्तावर तर कलम ६ नुसार प्रकल्पाधिकारी यांच्यावर सोपविलेली आहे. त्या संबंधीचा अहवाल वेळोवेळी राज्य शासनाकडे सोविण्याची जबाबदारीही आयुक्तांचीच आहे.

शिवना टाकळी प्रकल्पासाठी निधीची कमतरता असल्यामुळे प्रकल्प पूर्ण होण्यास अधिक कालावधी लागला. पर्यायाने पुनर्वसनासाठी सुध्दा अधिकचा

काळ लागलेला आहे व प्रकल्पग्रस्तांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागलेले आहेत.

पुनर्वसनाबाबत निष्काजीपणा होऊ नये म्हणून कलम ९ नुसार प्रशासकीय लालफितशाही निर्माण होऊ नये म्हणून पुनर्वसन कार्यात अधिकाऱ्यांना निर्णय घेण्यासाठी मदत व्हावी म्हणून सल्लागार समित्या स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. विस्थापितांच्या मूलभूत समस्या कोणत्या आहेत? समस्या सोडविण्यास मदत व्हावी यासाठी त्यांच्यातील व्यक्तीला सल्लागार समितीवर घेण्याची तरतूद असून तिच्या कामकाजाचे नियम, समितीची रचना व भत्ते याबाबतही तरतूद करण्यात आली आहे.

विकास प्रकल्पामुळे विस्थापितांचे नियोजनबद्ध व व्यवस्थित असं करणे ही शासनाची जबाबदारी आहे. परंतु शिवना टाकळी मध्यम प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनाचे प्रश्न आजही सुटलेले नाहीत.

प्रस्तुत संशोधन पेपरसाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

1 पुनर्वसनाचा संबंधी शासनाच्या धोरणांचा अभ्यास करणे.

2 पुनर्वसनाच्या समस्येविषयी ज्ञान मिळविणे.

3 शासनाच्या धोरणांची अंमलबजावणी कितपत झाली याचा अभ्यास करणे.

4 प्रकल्पग्रस्तांच्या समस्या वर उपाय योजना सुचविणे.

प्रस्तुत संशोधन पेपर साठी पुढील गृहीतके निश्चित करण्यात आली आहे.

1 शासनाच्या धोरणांची अंमलबजावणी झालेली नाही.

2 प्रकल्पग्रस्तांना शासकीय योजनांची माहिती नाही.

3 पुनर्वसन संबंधीच्या योजनांचा प्रकल्पग्रस्तांना लाभ मिळालेला नाही.

संशोधन पद्धती प्रस्तुत संशोधनासाठी शास्त्रीय पद्धतीने तथ्यसंकलन करण्यासाठी निवड केलेल्या 100 नमुना निवड करण्यात आली. नमुन्यात समाविष्ट असलेल्या उत्तर दात्याकडून वस्तुनिष्ठ तथ्य संकलित करण्यात आली तसेच सिंचन आयोगाचे अहवाल, प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन अधिनियम, भूसंपादन कायदा व इतर शासन निर्णय, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता यांची टिपणी तसेच प्रकाशित, अप्रकाशित संशोधन प्रबंध, नियतकालिके, मासिके व साप्ताहिके इत्यादीचा संशोधनासाठी आधार घेतलेला आहे.

**पुनर्वसित गावात पुरविण्यात येणाऱ्या नागरी सुविधा:**

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या अंतर्गत प्रकरण तीन मधील कलम १० मध्ये नवीन पुनर्वसित गावात पुरविण्यात येणाऱ्या नागरी सुविधांचे विश्लेषण केलेले आहे.

या अधिनियमाचे कलम १४ किंवा या अधिनियमातील किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यातील कोणत्याही तरतूदी त्यामधील कोणत्याही गोष्टीमुळे राज्य शासनास, या अधिनियमाद्वारे किंवा तरतूदीनुसार ज्यांचे पुनर्वसन करावयाचे राहिले आहे अशा अन्य कोणत्याही प्रकल्पामुळे मग त्या प्रकल्पाला या अधिनियमाच्या तरतूदी लागू असेल अथवा नसेल तसेच अन्य पाटबंधारे प्रकल्पामुळे बाधित झालेल्या परिमंडळातील शक्य तितक्या बाधित व्यक्तीचे पुरार्वसन कशा प्रकारे झाले? व त्यांना नागरी सुविधा कशाप्रकारे दिल्या गेल्या ते पुढील विवेचनावरून सांगता येते.

अ) कोणत्याही पाटबंधारे प्रकल्पामुळे लाभ झालेल्या परिमंडळातील जमिनीवर किंवा यथास्थिती, कलम १४ च्या तरतूदीनुसार जमीन संपादन करून त्याद्वारे इतर गावातील किंवा क्षेत्रातील जमीनीवर

ब) भू - संचयातील अन्य कोणत्याही जमिनीवर पुनर्वसन करण्यास प्रतिबंध होणार नाही.

क) राज्यशासन बाधित व्यक्तीचे पुनर्वसन प्रयोजनार्थ स्थापन केलेल्या नवीन गावठाणात किंवा कोणत्याही विद्यमान गावठाणाच्या विस्तारीत भागात विहित प्रमाण व पद्धतीनुसार नागरी सुविधांची तरतूद करील आणि अशा सुविधांमध्ये पुढील गोष्टीचा अंतर्भाव असेल.

अ) लोकसंख्येच्या प्रमाणात खुल्या जागा, विहिरी, इंधन विहिरी, कुपनलिका, नळाद्वारे पाण्याचा पुरवठा करण्याची योजना किंवा अन्य कोणत्याही प्रकारे पिण्याच्या पाण्याची कायमची तरतूद.

ब) शिक्षण विभागाने ठरवून दिल्याप्रमाणे प्रसाधन गृहांची सोय असलेली योग्य दर्जाची शाळा व खुले मैदान.

क) ग्रामपंचायतीचे कार्यालय यांचे बांधकाम, चावडी किंवा समाज मंदिर

ड) एक डांबरी पोच मार्ग व योग्य दर्जाचे अंतर्गत खडीचे मार्ग

इ)आवश्यकतेनुसार बाधित व्यक्तीच्या शेत जमिनीकडे जाणारा पोच मार्ग.

फ) रस्त्यावरील दिव्यांसह वीजपुरवठा आणि आवश्यक असेल तेथे थ्री फेज कनेक्शन.

ग) छप्पर, चबुतरा, वीजपुरवठा, पाणीपुरवठा असेलेली दहनभूमी आणि आवश्यक असल्यास दफनभूमी पोच मार्गासह

ह) बांधलेली उघडी गटारे, आर्थिक सहाय दिलेले व्यक्तीगत शौचकूप आणि आवश्यक तेथे सार्वजनिक शौचकूप.

ज) पाण्याच्या हौदासहीत गुरांच्या तळासाठी जमीन

के) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बस सेवेकरिता बस थांब्यासह जमीन

ल) आवश्यक असेल तेथे मळणीसाठी जमीन, म्हणजेच खळवाडी (खळे)

म) गायरान जमीन (सरकारी जमीन असल्यास)

न) बाजारासाठी विकसित जमीन.

ओ) गावठाणाच्या भावी विस्तारासाठी जमीन

पी) नवीन गावठाणातील लोकसंख्येच्या प्रमाणात माध्यमिक शाळा, दवाखाने, बँक, डाकघर, मुलांसाठी बगीचा इत्यादीसाठी जमीन

क्यू) सार्वजनिक प्रयोजनासाठी नोंदणी झालेल्या संस्थासाठी जमीन

आर) क्रिडांगणासाठी जमीन

उपरोक्त यादीतील सुविधाशिवाय जुन्या गावठाणामध्ये असतील अशा उच्च दर्जाच्या अन्य सर्व सुविधा देखील राज्य शासन पुरवील.

सार्वजनिक प्रार्थनास्थळे शासनाद्वारे बांधली जाणार नाही. तथापि जुन्या गावातील सार्वजनिक प्रार्थना स्थळांची नुकसान भरपाई त्यांच्या विश्वस्त मंडळाकडे दिल्या जाईल. तेथे असे विश्वस्त मंडळ नसेल तर महाराष्ट्र धार्मिक दाननिधी अधिनियम १९७० मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रार्थना स्थळे बांधण्यात येतील.

ड) उपरोक्त खंड (३) व (४) मधील सर्व सुख सोयीसाठी लागणारा खर्च हा त्या प्रकल्पांच्या खर्चाचा एक भाग मानण्यात येईल.

शिवना टाकळी सिंचन प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या अलापूर, अंतापूर, केसापूर, जैतापूर व वैसपूर या पाचही गावांचे नवीन गावठाणात पुनर्वसन झालेले आहे. या नवीन पुनर्वसित गावात ग्रामपंचायत कार्यालय, समाजमंदिर, गावात जाण्यासाठी डांबरी मार्ग, वीजपुरवठा, शाळा इत्यादी सुविधा पूर्ण केलेल्या आहेत. परंतु अद्यापही दहनभूमी, जनावरासाठी पाण्याच्या हौदासह जमीन, बाजारासाठी जमीन क्रिंडागणासाठी जमीन विकसित केलेल्या नाही. पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन केलेली आहे. परंतु या गावाना नियमित पाणी पुरवठा होत नाही. पुनर्वसित गावातील अंतर्गत रस्ते अपूर्ण आहेत. शेत जमिनीकडे जाणारे रस्ते तयार केलेले नाहीत.

थोडक्यात, काही नागरी सुविधा पूर्ण केलेल्या आहे , तर अद्याप पर्यंत बऱ्याच सुविधा दिलेल्या नाही.

राज्यशासनाकडून अनुरूप भाग, अंशदान, इत्यादि स्वरुपात सहाय्य मिळणाऱ्या लाभधारक व्यक्ती, संस्था, कंपन्या, कारखाने, साखर कारखाने, सुत गिरण्यामधील वर्ग ३, वर्ग ४ किंवा आंतरिक कर्मचारी वर्ग यामध्येही बाधित व्यक्तीच्या नामनिर्देशितासाठी रोजगाराकरिता ५ टक्के जागा राखीव प्राधान्य कोटा असेल. सदरील प्राधान्यक्रम हा खुल्या व विभिन्न आरक्षण प्रवर्गामधील यथाप्रमाण पसंतीक्रम समजला जाईल.

जिल्हाधिकारी जिल्ह्यातील सेवा प्रवेशाच्या स्थिती दर्शविणारी नोंद वही ठेवील व प्रकल्पग्रस्तांच्या भरतीमधील अनुषेश दूर केला जात असल्याची खात्री करून घेईल अशी संख्या ५० टक्के पेक्षा जास्त नसेल. शिवना टाकळी मध्यम प्रकल्पबाधितापैकी फक्त ४ टक्के प्रकल्पग्रस्तांना वर्ग ३ व वर्ग ४ मध्ये नोकरी मिळालेली आहे. अजून ९६ टक्के प्रकल्पबाधित रोजगाराच्या प्रतिक्षेत आहेत.

कलम ११ नुसार आयुक्त अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून मोठ्या पाटबंधारे प्रकल्पाबाबत तीन वर्षापेक्षा उशीरा नाही आणि इतर प्रकल्पांच्या बाबतीत एक वर्षापेक्षा उशीरा नाही. अशा वेळी राजपत्रातील अधिसूचनेद्वारे कलम ११ मधील पोटकलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे अधिसूचना प्रसिद्ध करून पुढील बाबी घोषित करेल.

अ) प्रकल्पबाधित परिमंडळातील क्षेत्रात समाविष्ठ क्षेत्राची व्याप्ती

ब) पाटबंधारे प्रकल्प असेल तर लाभधारक परिमंडळ क्षेत्राची व्याप्ती

क) अनुसूचिच्या भाग दोनमध्ये उल्लेख केलेल्या टप्प्यांपैकी कोणता टप्पा, लाभधारक परीमंडळातील जमीनीच्या संपादनाच्या प्रयोजनासाठी अशा प्रकल्पास लागू असेल ते परंतु त्यासाठी आयुक्तांची अधिसूचना विधिसंमत आहे. कलम ११ नुसार प्रकल्प अधिकारी अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या

दिनांकापासून एका वर्षाच्या आत मोठ्या प्रकल्पाबाबत किमान २५ टक्के क्षेत्राचा आणि इतर प्रकल्पांबाबत १०० टक्के क्षेत्राचा तपशिलवार नकाशा जिल्हाधिका-यास सादर करेल. तसेच प्रकल्प अंमलबजावणीच्या काळात कोणत्यावेळी पोटकलम (३) खालील अधिसूचनेत नमूद केलेल्या क्षेत्रात बदल करणे, प्रकल्पाधिकाऱ्यास आवश्यक वाटेल त्यांची कारणे, योजना यांचा तपशील ते जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत आयुक्तास कळविणे. पोटकलम ५ नुसार कळविलेली माहिती प्रकल्पाधिकारी व जिल्हाधिकारी यांच्या अहवालानंतर त्याची कारणे विचारात घेवून ती चौकशीअंती योग्य वाटली तर पोटकलम १, २, व ३ नुसार बदल करेल. कलम १४ नुसार आयुक्त किंवा जिल्हाधिका-यास या अधिनियमाचे प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक असलेली कोणतेही जमीन खरेदी किंवा अदलाबदल करता येईल. अशा जमीनी भूसंपादन अधिनियम १८९४ च्या दुरुस्तीनुसार सार्वजनिक प्रयोजना अंतर्गत सक्तीनेही संपादीत करता येईल. आयुक्तास योग्य वाटेल तेथवर बाधित परिमंडळातील गावठाणात समाविष्ठ केलेल्या जमीनी संपादित करता येईल. कलम १६ नुसार प्रकल्पामुळे बाधित झालेल्या व्यक्ती प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात जमीन देण्याच्या बाबतीतची तरतुद पुढीलप्रमाणे आहे.

| अनु.क्र. | प्रकल्पबाधित जमिनीचे संपादित क्षेत्र | प्रकल्पबाधित व्यक्तीला मंजूर करावयाचे केलेले जमीनीचे क्षेत्र लाभक्षेत्रातील जमीनीचे क्षेत्र |
|---|---|---|
| १ | ८० आर पेक्षा अधिक नसलेले | ४० आर पेक्षा कमी नसलेले, परंतू ८० आर पेक्षा अधिक नसलेले |
| २ | ८० आर पेक्षा अधिक, परंतु २ हेक्टर पेक्षा कमी | ८० आर पेक्षा कमी नाही, परंतू १ हेक्टर २० आर पेक्षा जास्त नाही |
| ३ | २ हेक्टर पेक्षा अधिक, परंतू ३ हेक्टर २० आर पेक्षा कमी नाही | १ हेक्टर २० आर पेक्षा कमी नाही परंतु १ हेक्टर ६० आर पेक्षा अधिक नाही |
| ४ | ३ हेक्टर २० आर पेक्षा अधिक | १ हेक्टर व ६० आर पेक्षा कमी नाही |

परंतू प्रकल्पबाधित व्यक्तच्या कुटुंबातील व्यक्तीची संख्या पाचहून अधिक असेल तर त्याबाबतीत २ हेक्टर व ८० आर क्षेत्राच्या कमाल मर्यादेस अधीन राहून तीन जादा व्यक्तीसाठी ४० आर इतकी जमीन जादा जमीन देता येईल.

परंतु असे की, लाभधारक परिमंडळा व्यतिरिक्त इतर ठिकाणची कोरडवाहू (जिराईत) जमीन देण्यात आली असेल त्याबाबतीत १ हेक्टर ६० आर पेक्षा कमी असणार नाही परंतु आणखी असे की, बाधित परिमंडळातील भूमिहीन शेतमजूर लाभधारक परिमंडळातील ४० आर जमीनीचा हक्कदार असेल.

लाभक्षेत्रात जमीन मिळण्यासाठी प्रकल्पबाधित पात्र व्यक्तीने विहित नमुन्यात जिल्हाधिकाऱ्याकडे ४५ दिवसांच्या आत अर्ज करावा व त्यांच्या प्रकल्पात संपादित जमिनीचा मोबदल्याची रक्कम किंवा त्या व्यक्तीला मंजूर करण्यात येणाऱ्या जमिनीची संभाव्य किंमत यापैकी जी रक्कम कमी असेल त्या रक्कमेच्या ६५ टक्के इतकी रक्कम जमिनीच्या भोगवट्याची किंमत जिल्हाधिकाऱ्याकडे जमा करावी लागेल.

शिवना टाकळी सिंचन प्रकल्पातील एकाही प्रकल्पबाधित व्यक्तीला लाभ क्षेत्रात जमिन मिळालेली नाही. बहुसंख्य प्रकल्पग्रस्तांना लाभ क्षेत्रात जमीन मिळते हेच माहित नाही व ज्यांना माहित आहे त्यांनी अर्ज केला नाही. काहींनी लाभक्षेत्रात जमीन मिळावी म्हणून अर्ज केला, परंतु त्यांनाही जमीन मिळालेली नाही हे वास्तव आहे.

प्रकल्पबाधित कुटुंबास पुनर्वसित नवीन गावठाणात भूखंड देण्याची तरतूद आहे. शेतकरी व बिगर शेतकरी कुटुंबातील व्यक्तींची संख्या विचारात घेवून त्या कुटुंबास पुनर्वसन अधिनियमानुसार निश्चित केलेल्या आकारमानाचा भूखंड देण्यात येतो.

१) शेतकरी कुटुंबातील व्यक्तीची संख्या पाच हून कमी असेल तर ३७० चौरस मीटरचा भूखंड देण्यात येतो व शेतकरी कुटुंबातील पाच पेक्षा अधिक व्यक्ती असेल तर ७४० चौरस मीटर एवढ्या कमाल मर्यादेस अधिन राहून प्रत्येक ज्यादा तीन व्यक्तीसाठी १८५ चौरस मीटर एवढे ज्यादा क्षेत्र देण्यात येते.

२) बिगर शेतकरी कुटुंबातील व्यक्तीची संख्या पाच हून कमी असेल तर १८५ चौरस मीटर व पाचपेक्षा जास्त असेल तर ३७० चौरस मीटर कमाल मर्यादेस अधीन राहून प्रत्येक जादा तीन व्यक्तिसाठी ९२.५ चौरस मीटर एवढ्या क्षेत्रफळाचे भूखंड देण्यात येईल. नवीन पुनर्वसित गावात शेतकरी व बिगर

शेतकरी कुटुंबास मंजूर करण्यात आलेल्या भूखंडावर घर बांधण्यासाठी रु.१०,०००/- इतके एक रकमी अनुदान देण्यात येते.

शिवना टाकळी प्रकल्पातील जवळपास सर्वच प्रकल्प बाधित कुटुंबाला पुनर्वसित गावात भूखंड मंजूर करण्यात आले असून त्यावर त्यांनी घरही बांधलेले आहे. तसेच बहुतांशी प्रकल्पग्रस्तांना १००००/- रु. अनुदान मिळालेले आहे. काही प्रकल्पग्रस्तांना भूखंड मिळाला परंतु तांत्रिक अडचणीमुळे १०,०००/- रु. अनुदान मिळालेले नाही.

उपरोक्त सुविधे शिवाय शेतकरी प्रकल्प बाधित व्यक्तिस संपादित जमीन व घर यांचा प्रत्यक्ष ताबा घेते वेळी किमान दोन किंवा त्यापेक्ष जास्त जनावरे बाळगणाऱ्या प्रकल्पग्रस्त कुटुंबास जनावरांसाठी गोठा बांधण्याकरिता रुपये ३०००/- अनुदान मिळण्यास प्रकल्पग्रस्त कुटुंब पात्र राहिल.

प्रकल्पग्रस्त कुटुंबापैकी जी कुटुंबे ग्रामीण कारागीर / छोटे व्यापारी / स्वत: चा व्यवसाय करणारी आहेत. त्यांना पुनर्वसित गावात दुकाने/शेड बांधण्यासाठी एकरकमी रु. १०,०००/- अनुदान मिळण्यास प्रकल्पग्रस्त कुटुंब पात्र राहिल. छोटे - छोटे स्वतःचे व्यवसाय करून स्वयंरोजगार मिळविण्यासाठी शासन निर्णय क्र. आरपीए २००१/ प्र.क्र ९०/९ दि. १४ मार्च २००२ नुसार लाभ मिळण्यास प्रकल्पग्रस्त पात्र असतील.

शिवना टाकळी प्रकल्पग्रस्तांना गोठा बांधण्यासाठीचे अनुदान, शेड/दुकान बांधकामासाठीचे अनुदान मिळालेले नाही. तसेच स्वयंरोजगार करण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये २० टक्के प्रकल्पग्रस्तांना प्रशिक्षणासाठी राखीव जागाचा लाभ झालेला नाही.

**प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र:**

प्रकल्पग्रस्ताची जमीन/घर भूसंपादन अधिनियमानुसार सार्वजनिक प्रयोजनासाठी १०० टक्के संपादित असेल व संपादनानंतर त्याच्या मालकीची राज्यात व इतर राज्यात काहीही जमीन नसेल असे प्रतिज्ञापत्र त्याने दिल्यानंतर अशा प्रकल्पग्रस्त कुटुंबातील एका व्यक्तिच्या नावे सामान्य प्रशासन निर्णय क्र. एईएस १०५०/३५/१६-अ दि. २१ जानेवारी १९८० नुसार नोकरीसाठीचे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देय असेल व अशा प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राचा राज्यशासनाच्या वर्ग ३ व ४ च्या आस्थापनेवरील सेवा प्रवेश नियमानुसार ५ टक्के प्राधान्याने नियुक्ती मिळण्यास पात्र असतील. तसेच इतर लाभ घेण्यासही प्रमाणपत्राचा उपयोग होईल.

शिवना टाकळी प्रकल्पातील एकूण प्रकल्पग्रस्तांपैकी ३४ टक्के प्रकल्पग्रस्तांनी प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र काढलेले आहे. ६६ टक्के प्रकल्पग्रस्तांनी प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र काढलेले नाही. त्यांनीही १६.८ प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र मिळते हे माहित नाही तर ४७.२ टक्के प्रकल्पग्रस्तांनी प्रमाणपत्राची आवश्यकता वाटली नाही.

**उदरनिर्वाह भत्ता:**

भूसंपादन अधिनियमानुसार जमीन संपादन करून जमीनीवर प्रत्यक्ष ताबा घेतल्यापासून तर त्या जमिनीचा मोबदला मिळेपर्यंतच्या कालावधीपर्यंत प्रकल्पग्रस्त कुटुंबाचे उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नसते म्हणून महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियमानुसार प्रकल्पबाधित कुटुंबाचे उदरनिर्वाहासाठी जुन्या नियमान्वये ४००/- रुपये प्रतिमहिना व नवीन नियमानुसार ३०००/- प्रतिमहिना इतका उदरनिर्वाह भत्ता प्रकल्पग्रस्त कुटुंबास देण्याची तरतूद आहे.

परंतु शिवना टाकळी प्रकल्पातील एकाही प्रकल्पग्रस्त कुटुंबास उदरनिर्वाह भत्ता मिळालेला नाही. बहुतांशी प्रकल्पग्रसत निरक्षर असल्याने त्यांना उदरनिर्वाह भत्ता मिळतो हे माहित नाही.

**आधी पुनर्वसन मग धरण/प्रकल्प:**

पुनर्वसनाच्या कामाचा संबंध महसूल व पाटबंधारे या दोन्ही खात्यांशी येतो. या दोन्ही खात्यांशी वेगवेगळा संपर्क करण्यात त्या लोकांची ओढाताण होते . घरांच्या मिळालेल्या किंमतीतून नवीन घर बांधण्याची असमर्थता, नुकसान भरपाई मिळण्यास लागणारा उशीर प्रत्यक्षातील नोकऱ्यांची दुर्मिळता, पुनर्वासित गावातील नागरी सुविधामधील उणीवा यामुळे आधी पुनर्वसन व मग धरण अशी मागणी प्रकल्पग्रस्तांकडून व स्वयंसेवी संस्थाकडून जोर धरू लागली. पाटबंधारे विभागाकडून विविध सिंचन प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यात आल्यानंतर सदरहू प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील जमीन संपादनासाठी तसेच प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रामध्ये ज्यांच्या जमिनी गेलेल्या आहेत . अशा प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याच्या अनुषंगाने त्या प्रकल्पास महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियमांतर्गत कलम १ (१) व १३ (१) च्या अधिसूचना लागू करून पुनर्वसनाचे काम टप्याटप्याने करण्यात येते. याबाबतीत असे दिसून आले आहे की, प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामासाठी तसेच पुनर्वसनाच्या कामासाठी आवश्यक असणारा निधी नियोजित कालावधीसाठी उपलब्ध होत नसल्यामुळे पुनर्वसनाची कामे खोळंबून राहतात. तसेच

प्रकल्पामुळे बाधित झालेल्या व्यक्तींच्या पुनर्वसनाच्या संपूर्ण कामाचा एकत्रित आराखडा तयार करण्यात येत नाही. त्यामुळे पुनर्वसनाच्या कामामध्ये सातत्य राहत नाही. पुनर्वसन अधिनियमाची कलम ११ (१) ची अधिसूचना प्रसिद्ध झाल्यावर प्रकल्पाच्या बुडीत व लाभक्षेत्र येणाऱ्या संभाव्य गावातील जमिनीच्या खरेदी-विक्री हस्तांतर आदी व्यवहारांवर निर्बंध लागू होतात. वन जमिनीचे प्रश्न, निधीची कमरता इत्यादी कारणांमुळे प्रकल्पाचे काम रखडल्याने सदरहू निर्बंध वर्षानुवर्षे चालू राहतात. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना अधिक अडचणींना तोंड द्यावे लागते व प्रकल्पग्रस्तामध्ये असंतोष निर्माण होतो. सबब पुनर्वसनाच्या कामामध्ये सातत्य येऊन ते निहित मुदतीत पूर्ण व्हावे यासाठी कार्यपद्धती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तसेच राज्यामध्ये महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ व हा दि. १ एप्रिल २००२ पासून अंमलात आलेला आहे. सदर अधिनियमाच्या कलम (११) (१) ची अधिसूचना प्रसिद्ध करण्याची जबाबदारी विभागीय आयुक्तांवर सोपविण्यात आलेली आहे. या बाबी विचारत घेऊन 'आधी पुनर्वसन मग धरण/प्रकल्प' या तत्त्वाच्या पालनासाठी शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एस ३०/प्र. क ३५/र-१ दि. १४/०९/२००४ अन्वये पुनर्वसनाची प्रशासकीय कार्यपद्धती निहित करण्यात आलेली आहे. संदर्भाधीन शासन निर्णयान्वये कार्यपद्धती विहित करण्यात आलेली आहे. ती यापुढेही कायम राहील. तसेच केंद्र शासनाचे फेब्रुवारी २००४ मध्ये विविध विकास प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासंदर्भात जाहीर केलेल्या 'राष्ट्रीय पुनर्वसन धोरण २००३' च्या अनुषंगाने राज्याच्या पुनर्वसन धोरणामध्ये आनुषंगिक सुसंगत बदल करण्याच्या हेतूने व आधी पुनर्वसन मग धरण/प्रकल्प हे तत्त्व प्रत्यक्षात येणाऱ्या अनुषंगाने शासनाचे पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

आधी पुनर्वसन मग धरण/प्रकल्प हे तत्त्व प्रत्यक्षात राबविण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**अ) प्रकल्प हाती घेणाऱ्या संस्थानी घ्यावयाची दक्षता:**

प्रकल्प संस्थांनी कोणताही विकास प्रकल्प हाती घेण्यापूर्वी पुढील दक्षता घेणे आवश्यक आहे.

१) हाती घेण्यात येणाऱ्या प्रकल्पामुळे विस्थापित होणारे कुटुंबे, गावे, आदिवासी पाडे, वनसंपदा व बुडिताखाली जाणारी कमीत कमी असावी याची खात्री करून घ्यावी. प्रकल्पाचे ठिकाण निश्चित करताना कमीत कमी विस्थापन होणारे पर्याय प्रथम विचारात घ्यावेत.

२) प्रकल्पाचे ठिकाण निश्चित करताना कमीत कमी विस्थापन होणारे पर्याय प्रथम विचारात घ्यावेत.

३) पुनर्वसनाचे काम सुरु करण्यापूर्वी प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या व्यक्तींच्या पुनर्वसनाच्या कामासाठी लागणारा निधी निश्चित कालावधीसाठी उपलब्ध होणार आहे याची खातरजमा करावी.

**ब) पाटबंधारे प्रकल्पांच्या बाबतीत घ्यावयाची दक्षता:**

१) पाटबंधारे प्रकल्पाचे काम करण्यापूर्वी पुनर्वसनाच्या गावनिहाय संपूर्ण आराखडा आधारभूत सर्व्हेक्षणाच्या आधारे कलम ११ (१) ची अधिसूचना लागू झाल्यानंतर लगेचच तयार करण्यात यावा. त्यामध्ये पुनर्वसित करावयाच्या गावासाठी नवीन गावठाणे कोठे वसावयाची आहेत. त्याचा उल्लेख असावा. जेथे ही गावे नव्याने वसावयाची आहेत. तेथे गावठाणासाठी जमीन तसेच देय असल्यास पर्यायी जमीन उपलब्ध आहे याची खात्री करून घेतली पाहिजे.

२) प्रथम बुडीताखाली जाणाऱ्या गावाच्या पुनर्वसन व स्थलांतराचे प्राध्यान्याने नियोजन असले पाहिजे.

३) वरीलप्रमाणे कार्यवाही पूर्ण झाली आहे. पुनर्वसन करण्यात येणाऱ्या प्रकल्पग्रस्त कुटुंबात स्थलांतर करण्यात कोणतीही अडचण असणार नाही याची खात्री झाल्यानंतरच संबंधित अधिकाऱ्यांनी पुनर्वसन अधिनियमाच्या कलम १३ (१) ची अधिसूचना काढावी.

४) ११ (१) ची अधिसूचना काढल्यानंतर भूसंपादन प्रक्रिया सुरु करण्यास हरकत नाही. परंतु १३ (१) ची अधिसूचना काढल्याशिवाय भूसंपादन अधिनियमाच्या कलम ४ (१) च्या अधिसूचनेनंतरची कार्यवाही भूसंपादन अधिकाऱ्यांनी करू नये.

५) प्रकल्पाच्या घळभरणीपूर्वी (धार दाबणे ) बुडिताखाली जाणाच्या बाधित सर्व गावांचे बाबतीत संपादित जमिनीचा संपूर्ण मोबदला दिलेला आहे. नवीन गावठाणात पुनर्वसनाची कामे पूर्ण झालेली आहेत. प्रकल्पग्रस्तांचे स्थलांतरण पूर्ण झाले आहे. पर्यायी जमीन वाटप करण्यात आली आहे. अशा आशयाचे प्रमाणपत्र पुनर्वसन प्राधिकरणाच्या यंत्रणेने

दिल्यानंतरच जलसंपदा विभागाने प्रकल्पाच्या घळभरतीचे कामाचे नियोजन करावे.

**क) राष्ट्रीय उद्यान, अभयारण्य यांचे बाबतीत घ्यावयाची दक्षता:**

राष्ट्रीय उद्यान, अभयारण्य अशा प्रकल्पामुळे बाधित झालेल्या सर्व गावांचे पुनर्वसन वरील ब) (५) प्रमाणे पूर्ण झालेले आहे. असे प्रमाणपत्र पुनर्वसन प्राधिकरणाच्या संयणेने दिल्यानंतरच राष्ट्रीय उद्याने, अभयारणे घोषित करण्याबाबतची अंतिम अधिसूचना संबंधित विभाग प्रसिद्ध करेल. पुनर्वसन प्राधिकरणाच्या अशा प्रमाणपत्राशिवाय संबंधित विभागास अशी अधिसूचना अंतिम प्रसिद्ध करता येणार नाही.

**ड) अन्य प्रकल्पांच्या बाबतीत घ्यावयाची दक्षता:**

अन्य प्रकल्पाच्या बाबतीत ज्या प्रकल्पाच्या प्रकल्पसंस्था या स्थानिक स्वराज्य संस्था/शासकीय निमशासकीय विभाग तथा अशा अन्य संस्था ज्यांच्या प्रकल्पामुळे बाधित झालेल्या व्यक्तीच्या पुनर्वसनाची जबाबदारी पुनर्वसन प्राधिकरणाकडे घेण्यात आलेली आहे. त्या प्रकल्पांचे प्रत्यक्ष काम सुरु होण्यापूर्वी प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाची वरीलप्रमाणे सर्व संबंधित मुद्यावरील कार्यवाही पूर्ण झालेली आहे असे प्रमाणपत्र राज्य पुनर्वसन प्राधिकरणाच्या यंत्रणेने दिल्यानंतरच प्रकल्पांचे काम सुरु करता येईल.

उपरोक्त बाबींची पूर्तता झाली नसल्याचे पुनर्वसन प्राधिकरण यंत्रणेच्या निदर्शनास आल्यास त्या प्रकल्पाचे काम कोणत्याही टप्प्यानंतर थांबविण्याचे आदेश देण्याचे अधिकार पूनर्वसन प्राधिकरणास असतील.

**राष्ट्रीय पुनर्वसन धोरण – २००३:**

केंद्र शासनाने राष्ट्रीय पुनर्वसन धोरण २००३ लागू केलेले आहे. या धोरणानुसार प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी स्वतंत्र पुनर्वसन यंत्रणा निर्माण करणे, पुनर्वसनासाठीचा निधी या यंत्रणेकडे सोपवून पुनर्वसनाचे प्रत्यक्ष काम या यंत्रणेमार्फत पार पाडणे. पुनर्वसनाच्या प्रत्यक्ष कामामध्ये प्रकल्पग्रस्तांचा सहभाग वाढविणे तसेच पुनर्वसनाच्या एकंदरीत कामामध्ये सुसूत्रता आणून पुनर्वसनाच्या कामाची कार्यक्षम रीतीने अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. त्यामुळे राज्य शासनाचे पुनर्वसन धोरण केंद्राने जाहीर केलेल्या पुनर्वसन धोरणाशी सुसंगत असण्याच्या उद्देशाने राज्याच्या पुनर्वसन धोरणात आवश्यक ते बदल करुन अंमलबजावणी करण्याकरीता महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण निर्माण करयात आले आहे.

शासनाच्या महसूल, पुनर्वसन, जलसंपदा, वित्त, उद्योग, ऊर्जा व वने या खात्याचे 14 मंत्री, प्रधान सचिव व प्रत्येक विभागाचा सचिव यांचा समावेश जबाबदार व्यक्तिची समिती स्थापन केली. याशिवाय पुनर्वसनासाठीचा आवश्यक निधी स्वतंत्र लेखाशिर्षकाअंतर्गत प्रकल्प खर्चाच्या तरतूदीमध्ये प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन असे उपशीर्ष दर्शवून मंजूर करून घ्यावा व पुनर्वसनात सातत्य व गती देण्याचे काम शासनाचे काम केले आहे. त्याचप्रमाणे स्वतंत्र पुनर्वसन यंत्रणेचे अधिकार व कर्तव्य नमूद करून मंत्रालय स्तर, क्षेत्रीय स्तर, महसूल विभाग, जिल्हा स्तरावर वेळोवेळी बैठका घेणे संवाद घडवून आणणे त्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या समस्या शासनाने सोडवण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रकल्पग्रस्तांच्या समस्या मांडण्यासाठी व त्यावर उपाययोजना करण्याबाबत सल्ला देण्यासाठी महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण अशासकीय नियंत्रित सदस्य म्हणून प्रत्येक महसूली विभागात एका प्रकल्पग्रस्त प्रतिनिधीची नियुक्ती करणे व अशाच प्रतिनिधीची नियुक्त, जिल्हा, तालुका व विभाग स्तरावर करून त्यांना बैठकीत व चर्चेत सहभागी करून घेण्याची तरतूद करण्यात आली. तसेच प्रकल्पग्रस्तांना भेडसावणाऱ्या समस्याचे निराकरण करण्यासाठी गऱ्हाणे निराकण यंत्रणा स्थापन करण्यात आल्या आहेत. पुणे नागपूर व औरंगाबाद येथे गाऱ्हाणे निराकरण यंत्रणा स्थापन करण्यासाठी आवश्यक ते कार्यालयीन साहित्य व कर्मचारी हे जलसंपदा विभागाकडून उपलब्ध करून देण्यात येईल.

**सारांश:**

देशाचा विकास व सार्वजनिक हित साधण्यासाठी लोकांच्या मर्जीविरुद्ध सक्तीने प्रकल्पासाठी जमीनी संपादित करण्यात येतात . तेव्हा त्या प्रकल्पग्रस्तांना पूर्वीपेक्षा अधिक सुस्थितीत जीवन जगता यावे म्हणून शासनाने १९८६ पासून ते आतापर्यंत प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनासाठी धोरण आखलेले आहेत. तसेच त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणल्या आहेत. वेगवेगळया समित्यांनी केलेल्या शिफारशी शासनाचे विविध शासन निर्णय अन्वये प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनासाठी धोरण आखलेले आहे.

त्यात प्रामुख्याने प्रकल्पग्रसतांना पर्यायी जमीन देण्याची तरतूद, पुनर्वसित गावात कुटुंबातील संख्येनुसार भूखंड व त्यावर घर बाधण्यासाठी दहा हजार रु अनुदान शेतकरी कुटुंबाला गोठा बांधण्यासाठी अनुदान, छोटे व्यापारी किंवा ग्रामीण

कास्तकार यांना शेड बांधण्यासाठी अनुदान, जमीनीचा ताबा घेतल्यापासून तर मोबदला मिळेपर्यंत दरमहा निर्वाह भत्ता राज्यशानाच्या आस्थापनामध्ये वर्ग ३ व ४ च्या पदावर सेवेत नियुक्ती, विविध सार्वजनिक उपक्रमे व महामंडळात स्वंयरोजगारासाठी प्रशिक्षण देणे, प्रकल्पग्रस्तांचे प्रमाणपत्र देणे उर्वरित शेतजमीनीला सिंचनासाठी प्रकल्पातून पाणी उपसा करण्याची परवानगी, अनुसूचित जाती/जमातीसाठी अधिकच्या सवलती, नवीन पुनर्वसित गावात जाण्यासाठी डांबरी रस्ता, अंतर्गत रस्ते, शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी रस्ते तयार करून देणे, पुनर्वसित गावात आरोग्य केंद्र, शाळा, डाकघर, बाजारतळ, बसस्टँण्ड, बाजार भरण्यासाठी जागा, खळवाळी, खेळासाठी मैदाने, दहनभूमी किंवा दफनभूमी, गटारे, पाणी पुरवठासाठी विहिर, पाईपलाईन नळे, वैयक्तिक व सार्वजनिक शौचकूप, वीजपुरवठा व अंतर्गत रस्त्यावर पथदिवे, ग्रामपंचायत कार्यालय व समाजमंदिर इत्यादी सुख सुविधा प्रकल्पग्रसतांना देण्याचे शासनाचे धोरण आहे. शिवना टाकळी प्रकल्पग्रस्तांना प्रत्यक्षात यातील फारच कमी सुविधा मिळालेल्या आहेत. सर्वसाधारणपणे पुनर्वसित गावात भूखंड, भूखंडावरील अनुदान व गावातील काही प्रमाणात नागरी सुविधा पुरविलेल्या आहेत. बाकी सर्व सुख सुविधापासून प्रकल्पग्रस्त वंचित आहेत.

**संदर्भ:**

१ The Maharashtra Project Affected Person Rehabilitation Act 1986.
२ Joshi B.L. Displacement and Rehabilitation, Parimal Prakashan, Aurangabad.
३ महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम 1999,चौधरी लॉ पब्लिशर्स.
४ सबनीस श्री. जी. भूमी संपादन अधिनियम 1894, मुकुंद प्रकाशन, ठाणे.
५ कार्यकारी अभियंता (2000) परिनिरीक्षण टिपणी, शिवना टाकळी मध्यम प्रकल्प, लघुपाटबंधारे विभाग क्रमांक १, औरंगाबाद.
६ दामले आशा, (2004) पुनर्वसनाचे प्रश्न, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.
७ सिंचन विकास, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे 1
८ मोरे दि.मा. (2011), सिंचन साधना, महाराष्ट्र सिंचन सहयोग, औरंगाबाद.
९ महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक 14 मार्च 2002.
१० महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दि. 21/01/1980.
११ महाराष्ट्र शासन, प्रकल्प बाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम 1999.
१२ महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय 17 मार्च 2006.
१३ महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक 10/03/2000
१४ महाराष्ट्र शासन, प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम 1999.
१५ महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक 15 डिसेंबर 1980.

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, June 2022, Volume-14, Issue-6

# लोकमान्य टिळकांचे राष्ट्रीय शिक्षणविषयक विचार

**डॉ. रमाकांत शिवाजीराव शातलवार**
रा. वसमत जि. हिंगोली

**प्रस्तावना :** स्वदेशी, स्वराज्य बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण ही आधुनिक भारताच्या इंग्रज सरकारला दिलेले आव्हान होते. ब्रिटिश शिक्षणपद्धती त्रिसत्व ध्येयशुन्य होते. ती फक्त कारकुन तयार करते असे लोकमान्य टिळकांचे मत होते. भारतातील शिक्षण पद्धती लॉर्ड मेकॉलेने सुरु केली होती व ती भारतीयाच्या हिताची आणि विचारांशी सुसंगत नव्हती. म्हणुन इंग्रजी शिक्षणाबद्दल लोकमान्य टिळक हे अत्यंत जहाल शब्दांत टिका करतात. जयसिंगराव पवार यांच्या मते, 'इंग्रजी राज्यात हिंदी लोकांना मिळणारे शिक्षण हे त्यांना शेळपट बनवणारे व कारकुनी करण्यासच फक्त लायक बनवणारे, असल्याबद्दल लोकमान्य टिळकांना खात्री होती.'[१] या विचारांचा हेतु भारतीय लोकांत देशभावना ही सशक्त करणे हा होता. राष्ट्रीय शिक्षणाच्या माध्यमातुन शाळा, महाविद्यालये उघडण्याची योजना होती. त्या शाळा व महाविद्याल्यातुन भारतीय संस्कृतीशी व मुल्यांशी सुसंगत असे शिक्षण देण्यात द्यावे. असा उद्देश होता. राष्ट्रीय शिक्षणातुन राजकीय व सामाजिक जाणीव निर्माण झाली पाहिजे. स्वत:च्या पायावर उभा राहणारा देशाभिमानी तरुण निर्माण झाला पाहिजे.

**विषय निवडणेचा हेतु**

प्रस्तुत विषय निवडणेचा हेतु हा लोकमान्य टिळकांच्या शैक्षणिक विचारांचा अभ्यास करणे.

**गृहितके**

१) लोकमान्य टिळकांच्या शैक्षणिक विचाराचा शोध घेणे.

२) लोकमान्य टिळकांनी हिंदुस्थानातील ब्रिटिशांच्या शैक्षणिक धोरणावर लोकमान्य टिळकांनी केलेल्या समिक्षेचा आढावा घेणे.

३) लोकमान्य टिळकांच्या शैक्षणिक विचारांची मांडणी करणे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोध निबंध करिता, ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा अवलंब केला गेलेला आहे. प्राथमिक आणि दुय्यम साधनांच्या आधारांचा उपयोग केलेला आहे. तसेच,इंटरनेटचा ही शोधनिबंध लिहिण्यासाठी उपयोग केलेला आहे.

**१) कलकत्ता कॉंग्रेसचे अधिवेशन**

'तिलक ही पहला व्यक्ति था जिसने स्वराज्य की मांग स्पष्ट रुप से की उनके शब्दों 'स्वराज्य मेरा जन्मसिद्ध अधिकार है और में उसे लेकर रहुंगा। ने देश के कोंने-कोंने में उतेजना की एक नई लहर उत्पन्न कर दी यह इन्ही के इनके सहयोगियो के प्रयत्नों का फल था कि १९०६ के कलकत्ता कॉंग्रेस अधिवेशन में स्वशासन, बहिष्कार और राष्ट्रीय शिक्षा की मांग का प्रस्ताव पारित किया गया'[२] हिंदी लोकांनी संशोधक बनावे, शास्त्रज्ञ बनावे, तत्वज्ञ बनावे, उद्योगपती व कारखानदार बनावे हीच राष्ट्रीय शिक्षणाची त्यांची अजोड इच्छा होती. परंतु इंग्रजी शिक्षणात त्यांना ही कारकुनी शिक्षणापुरते मर्यादीत दिसु लागले. त्याच्यातील हिंदी राष्ट्रवादाचे खरे समर्थक दिसते. प्राचीन भारतीय वैदिक संस्कृती सनातन हिंदु धर्म ग्रंथ आणि भारताचा गौरवशाली इतिहास आणि परंपरा हे हिंदु राष्ट्रवादाचे प्रमुख आधार होते. इ. स. १९०६ साली कलकत्ता राष्ट्रीय सभेत संप दादाभाई नारोजी यांचे भाषण हे स्वराज्य हेच ध्येय व स्वावलंबन हेच त्याच साधन वगैरे सुप्रसिद्ध चतुसुत्रीचा त्यांनी उच्चार केला.'[३]

**२) राष्ट्रीय शिक्षणांचा हेतु**

'लोकमान्य टिळकांनी शिक्षण विषयावर आपले विचार आपल्या विविध लेखांमधुन, भाषणामधुन व्यक्त केली हे विचार 'राष्ट्रीय शिक्षण' या शिर्षकाखाली मांडण्यात आले.'[४] ' १५ ऑगस्ट १९०६ पासुन कलकत्ता येथील राष्ट्रीय कॉलेज व शाळा सुरु करण्यात येऊन राष्ट्रीय शिक्षण मंडळा तर्फे परिक्षा घेतल्या जाऊ पदव्या वगैरे घेतील असे जाहीर झाले.'[५] तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लोकमान्य टिळक यांच्या कार्याविषयी म्हणतात 'राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ लोकमान्य टिळक यांच्या नेतृत्वाखाली देशात सुरु झाली प्रत्येक पुढारलेल्या स्वतंत्र देशातील सरकार आपल्या नागरिकांस ज्याप्रकारचे शिक्षण देऊन समर्थ नागरिक निर्माण करते तशा प्रकारचे शिक्षण देणाऱ्या राष्ट्रीय शिक्षणसंस्था निर्माण करणे हा या चळवळीचा हेतु होता.'[६]

**३) स्वतंत्र देशात जे शिक्षण देतात तसले शिक्षण आम्हाला पाहिजे.**

लोकमान्य टिळक यांना देशात स्वातंत्र भारतातील शिक्षणाची ओढ होती. '४ सप्टेंबर १९०७ रोजी पुण्याला सीताराम केशव दामले यांचे 'राष्ट्रीय शिक्षण' या विषयावर व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी लोकमान्य टिळक होते. या प्रसंगी 'राष्ट्रीय शिक्षणावर लोकमान्य टिळकांनी आपले विचार व्यक्त केले.'

व्यापार, उद्योगधंदे, शास्त्रे यांचे शिक्षण सरकार देत नाही म्हणुन आम्हाला राष्ट्रीय शिक्षण पाहिजे.'[७] यावरुन भारतातील तरुण पिढीकडे विशेषत: विद्यार्थी वर्गाकडे किती ओढ असे हे सुप्रसिद्ध आहे. लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीय शिक्षण स्वतंत्र देशात जे शिक्षण देतात तसले शिक्षण आम्हाला पाहिजे. राष्ट्रीय शिक्षणाची व्याख्या लोकमान्य टिळक यांनी केली. 'राष्ट्रीय मनोवृती ज्याने निर्माण होईल ते राष्ट्रीय शिक्षण अशी व्यापक व्याख्या केली.'[८] अशा प्रकारचे शिक्षण कुठे ही कशाही पद्धतीने मिळणे अशी भुमिका मांडतात.

**४) शिक्षण संस्था राजकीय चळवळीपासुन आलिप्त**

'शिक्षण संस्था या राजकीय चळवळीपासुन आलिप्त असाव्या हे खरे विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष राजकारणात भाग घेऊ नये. पण तरुण पिढीस राजकीय चळवळीचा परिचयही असु नये असे म्हणणे अयोग्य ठरते तसेच खाजगी शिक्षण संस्था मधील शिक्षकांनी राजकीय चळवळीत भाग घेऊ नये. हा विचार लोकमान्य टिळकांना मान्य नव्हता खाजगी शिक्षणावरील सरकारची करडी नजर' या लेखामधुन लोकमान्य टिळकांनी आपले विचार मांडले.'[९] शिक्षणाचा जास्तीत जास्त प्रसार हा स्वस्त शिक्षणाच्या माध्यमातुन होतो. राष्ट्रातील लोकास जर खरे शिक्षण द्यावयाचे असेल तर स्वतंत्र लोकांनी स्वतंत्र खाजगी शाळेत दिले पाहिजे यासाठी सतत दौरे करुन लोकजागृती केली.

**५) विद्यार्थ्यांच्या मतस्वातंत्र्याला महत्व**

'विद्यार्थ्यांच्या मत स्वातंत्र्याला धक्का लागु नये, हे लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रीय शिक्षण चळवळीतील मर्म होते. पण लॉर्ड कर्झन यांच्या काळात विद्यार्थ्यांच्या निसर्गसिध्द हक्कांवर गदा आल्याकारणाने बंगाल, महाराष्ट्रात राष्ट्रीय शिक्षण सुरु झाली.'[१०] संपुर्ण मानवी कल्याणाकरीता असलेले शिक्षण घेऊन संपुर्ण सर्वांगिण विकास मानवाचा झाला पाहिजे. हीच त्याची भुमिका राष्ट्रीय शिक्षणाची होती इंग्रजी शिक्षण हे संकुचित भावनेने भारतीय लोकांना दिले जाते. हे त्यांना समजले म्हणुन राष्ट्रीय शिक्षणाचा आवाज उठवला.

**६) राष्ट्रीय शिक्षणातुन आत्मविश्वास वृध्दी**

'राष्ट्रीय शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढेल. स्वाभिमान जागृत होईल, असे विद्यार्थ्री सरकारी नौकरीवर अवलंबुन राहणार नाहीत. ते स्वावलंबी बनतिल, असा लोकमान्य टिळकांचा विश्वास होता.'[११] राष्ट्रीय शिक्षणातुन विद्यार्थ्यांच्या अंगी शिस्त जोपासणा होईल ही भुमिका लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रीय शिक्ष्णातुन मांडलेली आहे. लोकमान्य टिळकांनी जपान आणि भारत यांच्या शिक्षण पध्दतीची तुलना केली आहे. जपान सारखा देश शिक्षणामुळे नेत्रदिपक प्रगती केली. कारण तेथील शिक्षण पध्दती स्वतंत्र होती. जपान विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान शिक्षण दिले जाते.

**निष्कर्ष**

लोकमान्य टिळकांना राष्ट्रीय शिक्षण हे पोट भरण्याचे सामर्थ्य असले पाहिजे ही त्याची विचारातुन भुमिका स्पष्ट जाणवते. हिंदुस्थानच्या सामाजिक राजकीय आर्थिक इ. परिस्थितीचे व ती स्थिती सुधारण्यासाठी ठरलेल्या प्रमाणे लहान मुलांना शिक्षण देणे हे अपेक्षीत अत्यंत आवश्यक आहे. शिक्षणाचा झरा राष्ट्राच्या ताब्यात हवा होता. विद्यार्थ्यांना देशस्थिती समजली पाहिजे. शिक्षण विद्यार्थ्यांना स्वाभिमानी व तेजस्वी बनावेत. राष्ट्रीय शिक्षणातुन त्यांनी राष्ट्रोध्दाराचे भुमिका स्पष्ट बजावली आहे. विध्दवान व कर्तबगार लोक सतत निर्माण झाले तर सतत राष्ट्रोध्दर होत राहिली. ही भुमिका त्याचया राष्ट्रीय शिक्षणातुन मांडलेले आहे. गुरु हेच शिष्याचे हित पाहणारे त्यांनी राष्ट्रीय शिक्षण मांडलेले आहे.

**संदर्भ**

१) डॉ. जयसिंगराव पवार (२०१२), हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पु. १३०
२) बी.एल. ग्रोवर, यशपाल (२००३), आधुनिक भारत का इतिहास, एस चन्द, नई दिल्ली, पु. ३३१
३) न.चि. केळकर (१९८८), लोकमान्य टिळक यांचे चरित्र, वरदा बुक्स, द्वितीय आवृत्ती, पुणे, पु. ७८
४) प्रा. पु.द. कोडोलीकर (२०१३) महाराष्ट्राचे शिल्पकार: लोकमान्य टिळक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई, पु. ४३
५) न.चि. केळकर (१९८८) लोकमान्य टिळक यांचे चरित्र, वरद बुक्स पुणे, पु. भाग ५, ८
६) डॉ. जयसिंगराव पवार (२०१२) हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास फडके प्रकाशन, कोल्हापुर, पु. १३०
७) प्रा. प्रभाकर श्रावण चौधरी (१९८८) लोकमान्य टिळक यांचे शैक्षणिक विचार कार्य, पुणे विद्यापीठ, पु. २५५
८) न.चि. केळकर (१९८८) लोकमान्य टिळक यांचे चरित्र, वरद बुक्स, द्वितीय आवृती, पुणे, पु. भाग ५, ९

९) पु. द. कोंडोलीकर (२०१३) महाराष्ट्राचे शिल्पकार: लोकमान्य टिळक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, प्रथम आवृती, मुंबई, पु. ४४

१०) न.चि. केळकर (१९८८) लोकमान्य टिळक यांचे चरित्र, वरद बुक्स, द्वितीय आवृती, पुणे, पु. भाग ५, १०

११) पु. द. कोंडोलीकर (२०१३) महाराष्ट्राचे शिल्पकार: लोकमान्य टिळक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, प्रथम आवृती, मुंबई, पु. ४५

# हवामान बदलाचा महाराष्ट्रातील कापूस उत्पादनावर होणारा परिणाम

**डॉ. दिलीप फोके**

गोदावरी कनिष्ठ वरीष्ठ कला महाविद्यालय, अंबड, जि.जालना.

**प्रस्तावना :** भारताच्या भौगोलिक दृष्टीकोणातून विचार केला तर भारतात शेतीला अनुकूल असे हवामान, पर्जन्यमान वात ही विभीत्र प्रदेशानूसार भिन्नता आढळून येते. भारतात अनेक क्षेत्र प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या शेतीवर अवलंबून आहे. भारत देश हा कृषी प्रधान देश असल्यामूळे कृषी भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात भारताचा शेतीचा विकास मोठया प्रमाणात करता आला नाही परंतु 1965 नंतर संपूर्ण भारतामध्ये शेतीच्या क्षेत्रात क्रांती घडवून आणली ती म्हणजे हरितक्रांती होय. हरितक्रांती याचा अर्थ शेतीमध्ये उत्पादनाच्या बाबतीत झालेला अमूलाग्र बदल होय. हा बदल शेतीविषयक संशोधन केंद्रे, रासायनिक खते, संकरित बि-बियाने, आधुनिक शेती अवजाने , आधुनिक पिक पध्दती, किटकनाशके, तृणनाशके इत्यादीच्या साहयाने करण्यात आला. त्यामूळे सर्व पिकांच्या उत्पादनामध्ये वाढ इ पाली. ज्या पिकाच्या उत्पादनातून आर्थिक फायदा प्राप्त होईल अशी पीके घेण्याकडे शेतकयाचा कल वाढला.

कापूस हे पीक खरीप हंगामातील उशीरा येणारे व उत्पन्नाच्या दृष्टीकोणातून महत्वाचे समजले जाणारे पीक आहे. या पीकाच्या वाढीसाठी उबदार दमट हवामान, मध्यम स्वरुपाचा पाऊस, काळी सुपीक रेगुर मृदा आवश्यक असते. या घटकाची अनुकुलता महाराष्ट्रात मोठया प्रमाणात आहे. त्यामूळे भारतात गुजरात नंतर महाराष्ट्राचा कापूस उत्पादनात व्दितीय क्रमांक लागतो. महाराष्ट्रातील बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, नागपूर, अकोला, वर्धा, परभणी, नांदेड, जळगाव, व औरंगाबाद इत्यादी जिल्हयामध्ये कापसाचे उत्पादन मोठया प्रमाणावर घेतले जाते.

**विषयाची निवड :**

प्रस्तुत विषय हा संध्या महाराष्ट्रातील कापूस उत्पादनावर आधारीत आहे. कापूस हे महाराष्ट्रातील महात्वाचे पीक आहे, कापूस उत्पादनाची महाराष्ट्राच्या विकासात महत्वाची भूमिका आहे. परंतू हवामान बदलाचा परिणाम कापूस उत्पादनावर होउन कापूस लोगवडीखालील क्षेत्र दिवसेनदिवस वाढले तरी उत्पादनात मात्र म्हणावी तशी वाढ होताना दिसत नाही. हे उत्पादन का घटले याचा अभ्यास करण्याठी हा विषय निवडण्यात आला आहे.

**अभ्यास क्षेत्र:**

प्रस्तूत विषयाचे अभ्यासक्षेत्र महाराष्ट्र आहे. महाराष्ट्राचा अक्षवृत्तीय विस्तार 15.44 उत्तर ते 22.6 मिनट उत्तर आणि रंखावृत्तीय विस्तार 72.36 ते 80.54 या दरम्यान आहे. महाराष्ट्र राज्याचे एकूण क्षेजफळ 3,07713 चौ. कि.मी. आहे. पश्चिम घाटातून उगम पावणाया अनेक नदयांच्या संचयन कार्यामुळे मोठया प्रमाणावर सुपीक मृदेची निर्मीती झाली आहे. ही मृदा कापूस उत्पादनासाठी अनुकूल समजली जाते म्हणून तिला काळी कापसाची मृदा म्हणूनही ओळखतात.

**संशोधन पध्दती :** प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम स्त्रोताचा उपयोग करण्यात आला आहे. यात विविध पुस्तके, वर्तमानपत्रे व मासिकातील संदर्भ घेण्यात आला आहे.

**उदिष्टे:**

1. हवामान बदलाचा महाराष्ट्रातील कापूस उत्पादनावर होणारा परिणाम अभ्यासणे.
2. एकपीक पध्दती व कापूस उत्पादन यांचा उत्पादनावर होणारा परिणाम अभ्यासणे.
3. कृषी विकासातील काही महत्वपूर्ण उपाय सुचविणे.
4. महाराष्ट्रातील कृषी उत्पन्नावर कापूस उत्पादनाचा परिणाम अभ्यासणे.

**गृहितके:**

1. हवामान बदलाचा कापूस उत्पनावर परिणाम होत आहे.
2. एकपिक पध्दतीमूळे उत्पनात घट होत आहे.

**विषय विवेचन:**

वाढती लोकसंख्या, वाढत्या गरजा, मानवाच्या अती महत्वकांसेपोटी मानवाने नैसर्गिक साधनसंपत्तीचा बेसुमार वापर केला आहे. या अतिवापरामूळे हवाप्रदूषण, जलप्रदूषण, मृदाप्रदूषण, ध्वनीप्रदूषण यासारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत. या समस्याचा परिणाम हवामान बदलावर झालेला आढळतो. हवामान बदलास तापमान वाढ, अतिपर्जन्य,

उनेतापमान, दुष्काळ यासारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत. या सर्वाच परिणाम कृषी उत्पनावर होताना दिसून येतो. महाराष्ट्रातील महत्वपूर्ण नगदी पीकात कापसाचा समावेश केला जातो.

हवामान बदलाचा प्रभाव कापूस उत्पनावर अधिक झालेला आढळतो. हरितक्रांतीनंतर साधारणता 2017 पर्यंत कापूस लागवडीचा आलेख महाराष्ट्रात चढता आहे. परंतू उत्पनाचा विचार केला तर तो मात्र उतरता आलेख दिसून येतो.

**महाराष्ट्रातील मागील दहा वर्षातील कापूस लागवड क्षेत्र**

| अ.क्र. | वर्षे | लागवड क्षेत्र (लाख हेक्टर मध्ये) |
|---|---|---|
| 1 | 2010-11 | 31.95 |
| 2 | 2011-12 | 31.42 |
| 3 | 2012-13 | 35.03 |
| 4 | 2013-14 | 39.32 |
| 5 | 2014-15 | 41.25 |
| 6 | 2015-16 | 41.46 |
| 7 | 2016-17 | 41.92 |
| 8 | 2018-19 | 41.30 |
| 9 | 2019-20 | 38.27 |
| 10 | 2020-21 | 38.06 |

वरिल आकडेवारीचा विचार केला तर कापूस लागवडीखालील क्षेत्रात वाढ होताना दिसून येते. मात्र प्रत्यक्ष उत्पादनात मात्र घट झालेली आहे. शेती क्षेत्रात दिवसेनदिवस हवामान बदलामूळे येणाऱ्या समस्याचा विचार करुन वेगवेळया किड व रोगांचा प्रार्दुभाव वाढत असलेल लक्षात येतो. हे लक्षात घेवूनच 26 मार्च 2002 रोजी बी. टी. कॉटन ही कापसाची नवीन प्रजाती निर्माण करण्यात आली. कपासीच्या बीयामध्ये सुडी नावाचा जीन आकला जातो. जो कपासी पीकाचे बोंडअळीपासून संरक्षण करतो. भारत सरकारने. बी. टी. प्रजातीला मंजूरी देतांना ज्या प्रदेशात उत्पादन घेतले जाणार आहे अशा प्रदेशात बी. टी. कपासीच्या बाहय क्षेत्रात इतर पिकाचे उत्पादन घेण्याच्या करारावर मान्यता देण्यात आली होती.

सन 2002 नंतर कपाशी लागवडीच्या क्षेत्रात झपाटयाने वाढ झाली पण लागवड क्षेत्रात वाढ झाली असली तरी 2016 पर्यंत उत्पादन वाढ मर्यादित होती. 2016 मध्ये एकटया यवतमाळ जिल्हयात 3.8 लाख हेक्टर कापूस लागवड क्षेत्र होते. 2017 मध्ये या क्षेत्रात वाढ होउन हे क्षेत्र 5 लाख हेक्टर झाले. परंतू पर्जन्यात असमानता, एक पीक पध्दती याचा यवतमाळ जिल्हयातील लागवड क्षेत्रावर परिणाम होउन लालबोंड अळीने लाखो हेक्टर क्षेत्रावरील कपासीचे नुकसान झाले. 2016 च्या तुलनेत 2017 मध्ये लागवडीखालील क्षेत्र वाढलेले असतांना देखील उत्पादनात मात्र कमालीची घट झाली आहे.

**उपाययोजना :**

1. हवामान बदल लक्षात घेवून पीक पध्दतीत बदल करावा.
2. एक पीक पध्दतीचा अवलंब सर्व शेतकऱ्याने करु नये.
3. एक पीक पध्दतीचा अवलंब केला तरी शेतीच्या बाहय भागात इतर पिकाच्या पटयाची लागवड करावी .
4. कपाशीची शेती दिर्धकालीन करू नये.
5. रासायनिक शेती ऐवजी जैविक शेतीला प्राधान्य द्यावे.

**संदर्भग्रंध :**

1. कृषी भूषण- मासीक -जूलै- सप्टे 2016
2. महाराष्ट्राचा भूगोल 5 प्रा.जयकूमार मगर
3. भारताचा भूगोल- संपूर्ण मार्गदर्शन- एच के डोईफोडे पेपर क्र. 2

# डॉ. आंबेडकरांचे राष्ट्रीय जलधोरणातील योगदान

**अमरदिप दामोधर रामटेके**
**Dr. Madhukarrao Wasnik PWS Arts and Commerce College, Nagpur**
Email- ramtekeamardip@gmail.com

**गोषवारा** डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि जल व्यवस्थापन याचा काही संबंध आहे, असे कुणी सांगितले तर त्यावर फारसा विश्वास बसणार नाही. पण, स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळात बाबासाहेबांनी जल व्यवस्थानाच्या संदर्भात विविध विचार व्यक्त केले आहेत. किंबहूना पाण्याने स्त्रोत टिकवून ठेवने आणि व्यक्तिगत वापर लक्षात घेऊन पाण्याच्या स्त्रोतांचे आणि वापराचेही नियोजन करण्याचे त्यांनी सांगितले. बाबासाहेबांचा हा एक महत्वपूर्ण पैलू समाजाच्या नजरेआड राहीला आहे. पण काळाच्या ओघात वाढत्या जल समस्येतून बाबासाहेबांच्या विचारांची आणि त्यांनी मांडलेल्या जल व्यवस्थापन विषयक धोरणांची गरज भासू लागली आहे. सदर संशोधत लेखात डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या जल विषयक भूमिकेवर प्रकाश टाकला आहे आणि भारतातील लोकप्रिय बहुउद्देशिय नदी विकास, पूर नियंत्रन, जल सिंचन, जलवाहतूक आणि जलविद्युत निर्मिती, दामोदर, महानदी विकास आणि बांधकाम याबद्दल जागरूकता आणने हा आहे.
**शब्दसंकेत** जल, सिंचन, नदी, प्रकल्प, धरण, पूर, विज, केंद्रिय जल आयोग

**प्रस्तावना**

पाणी हे एक नैसर्गिक संसाधन आहे. संपर्ण मानवी जीवन, सभ्यता आणि संस्कृती यांच्याशी जलसंपत्तीचा अगदीच जवळचा संबंध आहे. पाणी हे मानवी जीवणासाठी अत्यंत आवश्यक आणि पवित्र मानले जाते. त्यामुळेच राष्ट्रीय स्तरावर जलस्रोतांचे नियोजन, विकास, अंमलबजावणी आणि व्यवस्थापनाची गरज आहे. राष्ट्रीय जलनीती हे स्पष्ट करते की पाणी हे दुर्मिळ आणि पवित्र राष्ट्रीय संसाधन आहे. त्याचा प्रचार, प्रगती आणि संघटन करणे आवश्यक आहे. जलस्रोत प्रकल्प हे पिण्याचे पाणी, सिंचन, जलविद्युत निर्मिती, पूर नियंत्रण, जलवाहतूक आणि उद्योग यासारख्या बहुद्देशीय असले पाहिजेत.

अनेक विद्वान आणि अभियंत्यांनी देशाचे जल धोरण तयार करण्यासाठी आणि जलसंपत्तीच्या विकासासाठी योगदान दिले आहेत. त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अतुलनिय आहे. २० जुलै, १९४२ रोजी डॉ. आंबेडकरांनी मजूर मंत्री म्हणून सूत्रे हाती घेतली. त्यांचा व्हॉईसरॉय कार्यकारी मंडळाचे सभासद म्हणून समावेश करण्यात आला आणि त्यांच्याकडे श्रम, सिंचन व वीज हे महत्वाचे विभाग सोपविण्यात आले. या तिन्ही महत्त्वांच्या विभागाच्या नियोजनाचा पाया डॉ. आंबेडकर यांच्या कार्यकाळात घातला गेला. प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसन समितीचे अध्यक्ष म्हणूनही बाबासाहेबांनी काम पाहिले. भारताची श्रम, जल, वीज बहुउद्देशीय धरण प्रकल्पाची संकल्पना प्रथम बाबासाहेबांनी मांडली. केंद्रीय जल आयोग व केंद्रीय विद्युत आयोग यांची स्थापना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मंत्री असताना झाली. हिराकुंड, दामोदर व सोन नद्यांवरील नदी खोरे प्रकल्पांची सुरुवात त्यांच्याच काळात झाली. १९४२ ते १९४६ या चार वर्षांच्या कालावधीत अखिल भारतीय जल धोरणाची पायाभरणी झाल्यामुळे जलसिंचन आणि विद्युत ऊर्जेची नेत्रदीपक प्रगती झाल्याचे दिसून येते. ओरिसातील कटक येथे जवाहरलाल नेहरू यांच्या उपस्थितीत व डॉ. ए.एन. खोसला यांच्या अध्यक्षतेखाली एक समारंभ झाला. त्यावेळेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर मंत्री नव्हते. या धरणाबाबत बोलताना, ही धरणे भारताची आधुनिक मंदिरे आहेत, असे पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हे प्रकल्प सुरू करण्यात मोठा वाटा व सहभाग होता, असे डॉ. खोसला म्हणाले. ज्यांना नेहरू भारताची आधुनिक मंदिरे म्हणतात त्यांच्या पायाभरणीचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सन १९४२ ते १९४६ या काळात केले.

बाबासाहेंबाशिवाय जल व्यवस्थापनाच्या बाबतीत कुणी सखोल विचार

केला नाही व दूरदृष्टीपणा दाखविलेला नाही म्हणून बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने या देशाचे हितचिंतक ठरतात. त्यांच्या दूरदृष्टीपणारून ते सर्वश्रेष्ट ठरतात हे नाकारून चालनार नाही.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. डॉ. आंबेडकरांची जलविषयक भुमिका समजून घेणे.
२. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जल व्यवस्थापनाबाबत घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तूत संशोधनासाठी प्रामुख्याने संदर्भ ग्रंथ, संशोधन लेख, वर्तमानपत्र, नियतकालिके व वेबसाइट्स इत्यादी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे.

**डॉ आंबेडकर यांची जलविषयक भूमिका**

सन १९४२ ते १९४७ या कालावधीत व्हाईसरॉयच्या मंत्रिमंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मजुर खात्याचे मंत्री होते. या खात्याबरोबरच जलसिंचन आणि उर्जा विभागसुध्दा या मंत्रालयाला जोडले गेले होते. या तिन्ही महत्वाच्या विभागाच्या नियोजनाचा पाया डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यकाळात घातला गेला. डॉ. आंबेडकरांनी जलस्त्रोत आणि बहुउद्देशीय नदी खोरे विकासाचे धोरण युध्दोत्तर पुनर्रचना समितीव्दारे स्वीकारले. या समितीमध्ये केंद्र सरकार, राज्यसरकार, संस्थान सरकारे आणि व्यापार, उद्योग आणि वाणिज्य प्रतिनिधीचाही समावेश होता. मंत्री म्हणून त्या तीनही खात्यांचे सचिव डॉ. आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली काम करायचे, डॉ. आंबेडकरांचे जल संसाधन विषयीचे विचार उल्लेखनीय आणि प्रशंसणीय होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, जनतेच्या भल्यासाठी जर पाण्याचे जतन व संवर्धन करणे अत्यावशक असेल तर नदी किणारे बंदिस्त करण्याचा विचार गैर ठरतो. या संदर्भात विकसीत देशांनी अंगिकारलेला मार्गच योग्य आहे आणि तो म्हणजे विविध ठिकाणी पाण्याचे जतन करणे आणि त्याचा बहूउद्देशीय वापर करणे, धरणे बांधुन जलसिंचनाशिवाय नद्यांचा जलसाठा करने, त्याचा सिंचनासाठी उपयोग करणे इत्यादी बाबी साध्य करता येतात.

गेल्या काही वर्षापासून आपण नद्याजोड प्रकल्पांची चर्चा करीत आहोत, ही चांगली गोष्ट आहे. पण याबाबत अनेक विधायक कल्पना डॉ. आंबेडकरांनी मांडल्या होत्या. बाबासाहेबांचा उद्दात्त हेतू, त्यांचा दुरदृष्टीपणा, सर्वसामान्यांच्या समोर आला नाही किंवा आणल्या गेला नाही, असे म्हणता येईल. आपल्याकडच्या मोठ्या नद्या दरवर्षी १,११,०१३ दशलक्ष घनमीटर पाणी समुद्रात सोडतात. या पाण्याचा वापर (वीज, वाहतूक, सिंचन) केल्यास विकास होऊ शकतो. यावर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा विश्वास होता.

**दामोदर नदी प्रकल्प**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मजूर खात्याचे मंत्री असताताना जलनियोजन खातेही त्यांच्याकडे होते. या खात्यांतर्गत त्यांनी अनेक योजना राबविल्या. आपल्या देशातील जलसंपत्तीचा जास्तीत जास्त उपयोग करुन घेता यावा म्हणून त्यांनी एक धोरण निश्चित केले. देशातील जलमार्गाचा कसा वापर करता येईल याचे नियोजन करण्यासाठी त्यांनी केंद्रीय तांत्रिक ऊर्जामंडळ स्थापन केले. त्यानंतर दामोदर नदीवर धरण बांधण्याच्यादृष्टीने सर्व्हेक्षण केले. हा बहुउद्देशीय प्रकल्प असल्याने सिंचन, वीजनिर्मिती आणि जलवाहतूक हे उद्देश समोर ठेऊन त्यांनी कामाला गती दिली. बंगाल आणि बिहार राज्याच्या सहकार्याने त्यांनी हा प्रकल्प तडीस नेला.

जलमार्ग, धरणे संदर्भात त्यांची भूमिका स्पष्ट होती. कलकत्ता येथे ३ जानेवारी, १९४५ मध्ये या विषयासंदर्भात एक बैठक झाली. त्यावेळी डॉ. आंबेडकर म्हणाले, की ‘भारतातील जंगले आणि नद्या केंद्र सरकारच्या अखत्यारित आणल्यास पूरनियंत्रण आणि जमीन संधारण समस्यांवर उपाय करता येतील. दामोदर नदीवर धरण बांधल्याने पूरनियंत्रण, वीज उत्पादन तसेच शेतीला पाणी ही उद्दिष्टे साध्य होतील. आपल्या जलमार्ग धोरणाचा उद्देश केवळ पाटबंधारे आहे. रेल्वेला ज्याप्रमाणे प्रांतीय सीमा नाहीत तशाच जलमार्गांना देखील असू शकणार नाहीत. परंतु या दोघांत फरक केल्याने रेल्वेला केंद्रीय तर जलमार्गांना प्रांतीय मानले

आहे, असे केल्याने उलट तोटाच झाला आहे.'

**महानदी खोरे बहुउद्देशीय प्रकल्प**

ओरिसा राज्यात महानदी, ब्राम्हणी आणि वैतरणी या तीन प्रमुख नद्यांसह त्याच्या काही उपनद्या सुद्धा वाहतात. महानदी ओरिसा राज्यातील सर्वात मोठी नदी आहे कटक,पुरी आणि बालासोर अशी तीन जिल्हे ज्यांचे एकूण क्षेत्रफळ अंदाजे ८,००० वर्ग मैल आहे. नदीच्या खोऱ्यातील हे क्षेत्र नेहमीच पूर व नैसर्गिक संकटाने प्रभावित असे.जुलै १९४३ मध्ये आलेल्या महापुराने (महानदीच्या) तर संपूर्ण राज्यात हाहाकार माजला होता अर्थात नदीखोऱ्यातील हे क्षेत्र नेहमीच पुराने तसेच नैसर्गिक आपत्तीने प्रभावित होत असे. राज्यात मुबलक नैसर्गिक संसाधने आणि जलस्त्रोत असताना सुद्धा योग्य नियोजना अभावी ओरिसा राज्याची दयनीय अशीच अवस्था होती. नद्यांना महापूर ही तर नित्याची बाब होतीच शिवाय या आपत्तींने जीवितहानी व वित्तहानी सुद्धा सहन करावी लागत असे. सोबतच विविध आजारासह मलेरिया सारखे आजार आणि पुराने बाधित कुटुंबाचे पुनर्वसन इत्यादी बाबीवर सरकारला दरवर्षी मोठ्या प्रमाणात आर्थिक भार सहन करावा लागत असे. राज्याच्या आर्थिक विकासासाठी पुरेसा वाव असतानासुद्धा आणि नैसर्गिक साधन संपत्ती उपलब्ध असताना सुद्धा हे राज्य मागासलेले होते.

ओरिसा राज्याच्या विकासासाठी आणि पुरासारख्या गंभीर संकटातून राज्याची कायमस्वरूपी मुक्तता व्हावी यासाठी डॉ. आंबेडकर यांनी अमेरिकेतील टेनेशी व्हॅली योजनेचा सखोल अभ्यास केला होता. त्याच अनुषंगाने ओरिसा राज्य, या संकटातून कसे बाहेर येईल आणि हे राज्य विकासाच्या मार्गावर कसे आरूढ होईल यादृष्टीने डॉ. आंबेडकरांनी सर्वोतोपरी शर्थीचे प्रयत्न केले होते आणि म्हणूनच त्यांच्या संकल्पनेतूनच १९५७ मध्ये महानदीवर हीराकुंड धरण पूर्णत्वास आले. हिराकुंड धरण हे जगातील सर्वात मोठे धरण म्हणून ओळखले जाते. या धरणाचा ३,२४,००० हेक्टर क्षेत्राला लाभ झाला आहे.शेती सिंचनाखाली आली आहे पर्यायाने शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ झाली आहे, राज्य विकसिततेकडे अग्रेसीत होण्यास हातभार लागला आहे त्याचे श्रेय हे डॉ. आंबेडकर यांच्या जलनीतीलाच जाते.

**राष्ट्रीय जल धोरण**

१९४२–४६ या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताच्या विकास धोरणात अत्यंत महत्त्वाचे योगदान दिले आहे. देशाच्या जल आणि विद्युत ऊर्जा धोरणाच्या उभारणीत त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे.

देशाचे आर्थिक धोरण १९४० च्या दशकात ठरवले जात होते. त्याची स्थापना आणि मान्यता सुरू झाली होती. केंद्र सरकारच्या मंत्रिमंडळाच्या पूर्ण विकास समितीने सिंचन, ऊर्जा आणि औद्योगिक विकासाचे धोरण स्वीकारण्यासाठी शिस्तबद्ध प्रक्रिया पूर्ण केली. १९३५ च्या जल विकास कायद्यांतर्गत, सिंचन आणि वीज हे राज्य सरकार आणि प्रांतीय सरकारचे विषय होते. प्रादेशिक विकास आणि बहुउद्देशीय विकास प्रकल्पाच्या माध्यमातून जलसंपदा धोरण संपूर्ण देशात राबविण्याची डॉ. आंबेडकरांची इच्छा होती. त्यामुळेच त्यांनी पाण्याचा विषय केंद्र सरकारच्या अखत्यारीत आणला. बाबासाहेबांनी घटनेत तरतूद केली. कारण त्या काळात बाबासाहेब कामगार मंत्री आणि राज्य घटना मसुदा समितीचे अध्यक्ष अशी दुहेरी भूमिका करत होते. हे धोरण स्वीकारण्यासाठी कामगार विभागाने नोव्हेंबर १९४४ मध्ये केंद्रीय तांत्रिक विद्युत मंडळ (CTBT) आणि ५ एप्रिल १९४५ रोजी सेंट्रल वॉटरवेज इरिगेशन अँड नेव्हिगेशन कमिशन (CWINC) या दोन तांत्रिक संस्थांची स्थापना केली. केंद्रीय विद्युत मंडळाकडे देशाचा डेटा संकलित करणे, सर्वेक्षण करणे आणि वीज योजना तयार करणे यासारखी महत्त्वाची कामे सोपविण्यात आली होती. यामुळे देशभरात वीजपुरवठा, नियोजन, वाटप आणि अंमलबजावणी या प्रक्रियेला चालना मिळाली. आजच्या केंद्रीय जल आयोगाकडे जलसंपत्तीचे काम, माहिती संकलन, नियोजन, समन्वय आणि अंमलबजावणीची जबाबदारी सोपवण्यात आली आहे, जलस्रोतांच्या पद्धतशीर संवर्धनाचे महत्त्वाचे कामही सोपवण्यात आले आहे.

आंतरराष्ट्रीय नदी खोऱ्याचा विकास केंद्र सरकारच्या अखत्यारीत आणण्यात आला, राज्य, प्रांत आणि केंद्र सरकारच्या संयुक्त विद्यमान विकासासाठी तरतूद करण्यात आली. हे राष्ट्रीय जल धोरण बहुउद्देशीय नदी खोरे विकास प्रकल्पाचा एक भाग म्हणून मानले गेले. त्यामुळे प्रादेशिक विकासाच्या नियोजनात जलस्रोतांना सामाजिक—आर्थिक आणि पर्यावरणीय विकासाचा एक महत्त्वाचा पैलू मानला जाऊ लागला. त्यामुळे दामोदर, महानदी, सोन नदी आणि कोसी नदी हे पहिले बहुउद्देशीय उपक्रम मानले जातात.

**निष्कर्ष**

डॉ आंबेडकरांनी दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन, हिराकुड धरण, सोन आणि कोसी नदी प्रकल्पाच्या स्थापनेत मोठी भूमिका बजावली. भारतातील पाण्याच्या प्रश्नांसाठी केंद्रिय प्राधिकरणाच्या घटनेत त्यांनी मोठे योगदान दिले. व्हाईसरॉयच्या कार्यकारी परिषदेतचे सदस्य म्हणून त्यांनी केलेल्या प्रयत्नामुळेच आजचा जल आयोग आहे. सध्याच्या जलसंकटाच्या काळात जलसंपत्तीशी संबंधीत त्यांच्या कल्पना किती सुसंगत आहेत हे सुध्दा यावरून दिसून येते. डॉ. आंबेडकरांचे बहुउद्देशीय विकासाचे मॉडेल आज हिमालयात वाहणाऱ्या नद्यांबाबत राबविता येईल, गंगा, ब्रम्हपुत्रा, यमुना कोसी. गंडक आदी नद्यांच्या जलव्यवस्थापनाचा विचार होणे गरजेचे झाले आहे. पाण्याची टंचाई, पाण्याची वाढती मागणी, वाढते शहरीकरण आणि वाढत्या पर्यारणाच्या समस्येत होणारा बदल यामुळे देशाला जलसंकटाला सामोरे जावे लागू शकते, तेव्हा आतापासूनच पाण्याची गरज लक्षात घेऊन जल व्यवस्थापन, नियोजन आणि प्रचाराची गरज आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. सुखदेव थोरात (२००५) बाबासाहेब आंबेडकर: नियोजन, जल व विद्युत विकास भुमिका व योगदान, सुगावा प्रकाशन, पूणे ३०
२. महाराष्ट्र टाईम्स, डिसे. ११, २०१६
३. डॉ. डी. टी. गायकवाड (२०१६) भारत का जल संसाधन विकास — भारतरत्न बाबासाहब डॉ. आंबेडकर का उल्लेखनीय योगदान
४. Dr. Subhash (2017) Dr. Ambedkar's Contribution to Water Resource Development in India, Val. 7 ISSN-2249-555x
५. Dr. Nagendrappa Nanda (2020) Dr. Ambedkar's Contribution to water, Irrigation, power policy in India, 14th April 2020
६. https://hindi.indiawaterportal.org
७. www.forwardpress.in
८. https://www.mr.vikaspedia.in

# کشمیری زبان میں صحافت

میرسجادحُسین (گلشن پورہ ۔ ترال۔کشمیر)
۹۹۰۶۸۹۷۶۱۰ sajidsajadhe@gmail.com

**تلخیص:**

صحافت ادب کا ایک ایسا شعبہ ہے جس کا تعلق انسانی زندگی کے ساتھ ازل سے ہی رہا ہے۔ اس زمین پر جب انسانی زندگی نمودار ہوئی تو ایک دوسرے تک بات پہنچانے کے لئے ترسیل کی ضرورت پڑی اور ترسیل کا ایک موثر ذریعہ صحافت تھا۔ یہ انسانی زندگی کی ایک ناگزیر ضرورت ہے۔ قوم کی ترقی و بہبود کے لئے یہ اشد ضروری ہے۔ اس دنیا بہت ساری زبانوں نے اس شعبے میں اپنا اپنا رول بہت ہی اچھے طریقے سے ادا کیا ہے۔ اس ضمن میں کشمیری زبان بھی پیچھے نہیں رہی۔ زیر بحث مقالے می ہم کشمیری زبان میں صحافت کے مییدان میں جو تجربے کئے گئے ہیں ان پر ہی بات کریں گے۔

**تعارف:**

صحافت لفظ صحیفہ سے نکلا ہے جس کے معنی کتاب یا رسالہ کے ہیں۔اس لحاظ سے صحافت کے معٰنی کسی خاص مقرر وقت پر خبر نامہ نکالنا،اخبار کے لیے لکھنا اور اس کو ترتیب دینا ہے ۔ موجودہ دور میں صحافت وسیع مفہوم میں استمال ہوتا ہے۔ جس میں خبر جمع کرنا،تبصرہ کرنا ، اشتہارات، رسالہ، جریدہ اور وہ ساری کتابیں لکھنا شامل ہیں جن کا روز مرّہ کی زندگی کے ساتھ سیدھا تعلق ہو۔یہ قوم کی فکری ، ثقافتی او ر سماجی اساس ہوتی ہے۔

**صحافت کی تاریخ:**

صحافت کی تواریخ اتنی پرانی ہے جتنی انسا نی زندگی کی تواریخ ہے۔ پہلے زمانے میں ایک دوسرے تک پیغام پہنچانے کے لیے انسان ڈول بجانے، آگ جلانے،مصوری وغیرہ سی یہ کام لیتا تھا۔فنِ تحریر کے آغاز کے ساتھ ساتھ سفرِ تجارت اور باقی ضروریات نے خبر رسایی کو بڑھاوا دیا اور دھیرے دھیرے صحافت کا آغاز ہونے لگا۔ تواریخی مشاہدات سے یہ بات سامنے آجاتی ہے کہ آج سے تین ہزار سال پہلے روس میں قلمی خبرناموں کا رواج تھا۔ جن میں اہم سرکاری اعلانات درج ہوتے تھے۔ یہ خبرنامے وقت کے بادشاہ کی نگرانی میں مرتب ہوتے تھے۔ان خبرناموں کے سُننے والوں سے اس کے بدلے گزٹ (رایج الوقت سکّہ) وصول کیے جاتے تھے۔ اسی وقت گزٹ لفظ عوامی سطح پر مشہور ہُوا اور یہ لفظ اخباروں کے ساتھ وابسطہ ہُوا۔جدید اخبار نویسی کی بنیاد ان ہی اخباروں سے پڑی۔

اسلامی دنیا میں خبر رسایی کا باقایدہ محکمہ امیر معاویہ ؓ نے قایم کیا اور عباسیہ دور میں ایک دوسرے تک پیغام پہنچانے کے لیے کبوتروں سے یہ کام لیا جاتا تھااور دیکھتے دیکھتے صحافت کا فن ارتقایی مراحِل طے کرتا رہا۔ ہندوستان میں مذہبی تعلیمات اور سرکاری احکامات پتھروں پر اور تانبے کے پٹوں پر لکھنے کا رِواج مہاراجہ اشوک کے زمانے میں ہوا۔

انسانی رشتے استوار کرنے کے لیے باضابطہ اخبار نکالنے کی ضرورت پڑی اور دُنیا کا پہلا اخبارچین میں ۱۶۱۹ میں شایع کیا گیا۔اس کے فوراً بعد انگریزی زبان کا پہلا اخباربرطانیہ میں ۱۶۱۱ میں ''ویکلی نیوز آف انگلینڈ'' کے نام سے جاری کیا گیا۔ اس کے ساتھ ہی باقی دوسری زبانوں میں بھی اخبارات نکالنے کا دور شروع ہوااور ہندوستان میں اردو زبان کا پہلا ہفتہ وار اخبار ''جامِ جہاں نُما'' ۲۷ مارچ ۱۸۲۲کو کلکتہ میں سدا مکھؔ نامی ایکھ شخص نے جار ی کیا۔ اس کے بعد اُردو زبان میں باضابطہ طور صحافت کا دور شروع ہوا اور بہت سارے اخبارات اور رسایل نکالے گیے۔ جس سے صحافت کا میدان مستحکم اور مضبو ط ہونے لگا۔

**کشمیری زبان میں صحافت کی تاریخ:**

میں شروع ہُوا ۔ جس کا ایڈیٹر محمد یوسف ٹینگؔ تھا۔ اس کے بعد غلام نبی خیالؔ نے ۵ اپریل ۱۹۶۵کو ایک خوبصورت ہفتہ وار '' وطن '' شروع کیا۔فیلڈ سروے کی طرف سے ۱۹۶۷میں دینا ناتھ نادؔم کی نگرانی میں''چمن'' نامی ایک ہفتہ وار شروع کیا گیاجو زیادہ دیر نہ رہ سکا۔امین کاملؔ نے ۱۹۶۸میں ایک ادبی رسالہ ''نیب'' جاری کیا جو ہمار ے ادب کے نیے رجحان کا نمایندہ رسالہ ہے۔ ۱۹۶۸میں ہی غلام رسول سنتوؔش نے بھی ''کاشُر ادب'' نام پر ایک رسالہ نکالا ۔ جدید سوچ عام کرنے میں اس رسالے نے بھی ایک اچھا کردار نبھایا۔۱۹۷۴ میں کلچرل آرگنایزیشن نامی تنظیم نے ایک ہفتہ وار جاری کیا۔جس کا ایڈیٹرڈاکٹر محمد امین تابشؔ تھا۔ اس کے بعد شفیع شوقؔ اور گلشنؔ مجید نے اسلام آباد کشمیر سے رسالہ'' آش'' جاری کیا ۔پروفیسر رحمان راہیؔ کی صدارت میں جب ''کاشُر سمُت'' نامی ایک ادبی تنظیم وجود میں آیی تو اس کی طرف سے شہر شہر گاوں گاونعوامی جلسے نکالے گیے۔ان جلسوں میں پہلی بار عام لوگوں کے علاوہ یونیورسٹی کے طلبا نے بھی شرکت کی۔اس تنظیم نے ایک نہایت ہی خوبصورت فوٹو آفسیٹ ہفتہ وار ''سمُت'' جاری کیا۔

کشمیری صحافت کو فروغ دینے کے لیے ریاستی کلچرل اکادمی نے وجود میں آنے کے فوراً بعد ہی ''شیرازہ'' اور ''سون ادب'' جاری کیے۔ اِن رسالوں نے ادبی صحافت میں بہت سے نیے میعار قایم کیے۔ کشمیر یونیورسٹی کا شعبہ کشمیری بھی اپنا سالانہ جریدہ شایع کرتا رہا۔ جس کے کچھ خاص شمارے بھی شایع ہوے ہیں جنہوں نے کشمیری زبان کو فروغ دینے کے لیے اور طالبِ علموں کی علمی پیاس بُجھانے کے لیے ایک اہم رول ادا کیا۔

م۔ ح۔ ظفرؔ اور اقبال فہیمؔ کے''واد'' اور آفاقؔ عزیز اور محفوظہؔ جان کے''باوتھ'' نے بھی قابلِ تعریف خدمات انجام دی ہیں۔اس کے علاوہ اور بھی کیٔ ادبی تنظیموں نے جن میں خاص کر حلقہ ادب سونہ واری کی طرف سے ''وُلرک مَلر'' بزمِ ادب شُپین کی طرف سے ''ثقافت'' اور اے آر آزادؔ میموریل فاونڈیشن پلوامہ کی طرف سے'''نیج'' وغیرہ کشمیری صحافت کو آگے لے جانے میں پیچھے نہ رہی۔

جہاں تک کشمیری زبان میں صحافت کا تعلق ہے ہمارے یہاں صحافت کا آغاز بہت دیر سے ہوا۔ اس کی ایک خاص وجہ یہ تھی کہ کشمیر میں صدیوں تک شخصی راج قایم رہا۔جس کی وجہ سے کشمیریوں کو ویسا ماحول فراہم نہ ہو سکا کہ یہاں کے لوگوں کا شعور بیدار ہو سکے۔

کشمیری پنڈت ایسوسی ایشن نے ۱۸۱۷میں لکھنو میں ہفتہ وار ''بہارِ کشمیر'' جاری کیا۔ جس کے کچھ شمارے کشمیری زبان میں شایع ہوے۔ایس پی لالج کے میگزین ''پرتاب ''اور امر سنگھ کالج کے میگزین ''لالہ رُخ''کے کشمیری حصّے اس کی ابتدایی کوششیں تھی۔اس کے بعد ۱۹۳۵ میں غلام نبی رفیقیؔ نے ''گاشہِ تارُکھ'' نامی کشمیری اخبار شایع کیا ۔جو اس اخبار کے مدیر بھی تھے۔یہ کشمیری زبان کا پہلا اخبار تھا۔ا س کے بعد سرینگرسے ہی ایک اور اخبار''پراگاش'' کے نام سے شایع ہوا۔لیکن یہ اخبار زیادہ دیر تک نہ رہ سکا۔۱۹۳۹میں طنز و ظرافت پر پہلا کشمیری اخبار '' کوکڑوں کوں'' نام سے سرینگر سے شایع کیا گیا۔ اس اخبار کا ایڈیٹر پنڈت بی کے کول تھا۔

''گاش'' کشمیری زبان کا باضابطہ طور پہلا اخبار ہے۔جو شاعرِ کشمیرمہجورؔ صاحب کی نگرانی میں۱۳ اگست ۱۹۴۰ کو شایع ہوا۔جس کا مدیر محمد امین ابنِ مہجوؔر تھا۔ روایت کے مطابق یہ اخبار مولانا ابوالکلام آزادؔ کے کہنے پر نکالا گیا تھا۔لیکن دس گیارہ شُمارے شایع ہو نے کے بعد ہی دم توڑ بیٹھا۔ کشمیری کلچرل کانگریس (جو ترقی پسند ادیبوں کی ایک تنظیم تھی ) نے ۱۹۴۹میں'' کونگ پوش'' نامی کشمیری زبان میں ایک رسالہ جاری کیاجو دو سالوں تک کامیابی کے ساتھ چھپتا رہا۔کشمیری زبان کو فروغ دینے کے لیے اس رسالے نے ایک اہم کردار نبھایا۔مرزا عارفؔ کی کوششوں سے ۱۹۵۲میں ''گُلریز'' نامی ایک رسالہ جاری ہُوا ۔جو عارفؔ، نادمؔ اور خیالؔ جیسے بڑے ادیبوں کی کوششوں سے ایک نہایت خوبصورت اور مکمل ادبی رسالہ بن گیا۔اس کے بعد ۱۹۵۹ میں ''پمپوش '' نامی ایک اور ادبی رسالہ شایع ہُوا ۔ جس کا ایک حصّہ کشمیری زبان پر مبنی تھا۔

کشمیری صحافت کو فروغ دینے کے لیے سرکاری ادارون کا بھی اہم رول رہا ہے۔جس میں محکمہ اطلاعات کی طرف سے '' تعمیر '' نامی رسالے کا ایک حصّہ کشمیری زبان میں ۱۹۶۰

کیا۔جن میں ان اداروں میں زیر تعلیم طلبا اپنی مادری زبان میں اپنے جذبات، خیالات اور تجربات بِلا کسی رکاوٹ عوام تک پہنچانے میں کامیاب نظر آتے ہیں۔

**امدادی کتابیں:**

۱ (صحافت اور اس کی اخلاقی اقدار، مریم خنساء ، امَّ عبدِ منیب
مشربہِ علمِ حکمت ، ندیم ٹاون ملتان روڑ پاکستان۔ ۱۴۲۷ھ
۲ (اسلامی صحافت، سید عُبید بیدالسّلام زینی، ادارہ معارفِ اسلامی، منصورہ،
ملتان روڑ، لاہور۸۸۱۹ء
۳ (کشمیر انسائکلوپیڈیا ، اکادمی آف آرٹ کلچر اینڈ لنگویجز۔ جموں و کشمیر۔

چونکہ اخبار کسی بھی بات کو عوام تک پہنچانے کا ایک موثر ذریعہ ہے ۔اس کے ذریعے ہم اپنی بات کو کم وقت میں زیادہ سے زیادہ لوگوں تک بِنا کسی رکاوٹ پہنچانے میں کامیاب ہوتے ہیں۔جب ہم کشمیری زبان میں اخبار نویسی کی بات کرتے ہیں تو آج کل انگریزی اور اردو روزناموں کے مدِ مقابل کشمیری زبان کے روزنامے ''سنگرمال'' ''کہوٹ'' اور ''میراث''کشمیری صحافت کی خِدمات انجام دیکر ہم کشمیریوں کو سَراُٹھا کر چلنے کا موقعہ فراہم کر رہے ہیں اور ساتھ ہی یہاں کے نونہال ادیبوں کو اپنے خیالات عوام تک پہنچانے کے لیے موقعہ فراہم کر رہے ہیں۔ اس کے علاوہ یہاں کے اسکولوں، کالجوں اور کشمیر یونیورسٹی کے میگزینوں نے بھی کشمیری صحافت کو بڑھاوا دینے میں قابلِ تعریف رول ادا

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, June 2022, Volume-14, Issue-6

# शाश्वत विकासाची उद्दिष्टे आणि भारताची कामगीरी : एक दृष्टीक्षेप

**प्रा.डॉ.पी.आर.मुठ्ठे [१] प्रा.डॉ.एस.डी.आवाळे[२]**
[१]सहयोगी प्राध्यापक आणि विभाग प्रमुख पद्व्युत्तर अर्थशास्त्र विभाग आणि संशोधन केंद्र, यशवंत महाविद्यालय नांदेड.
[२]सहाय्यक प्राध्यापक पद्व्युत्तर अर्थशास्त्र विभाग आणि संशोधन केंद्र, यशवंत महाविद्यालय नांदेड.
Email Id : ajaymeco82@gmail.com
Email Id : shivarajwale@gmil.com

**प्रस्तावना** कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासामध्ये त्या देशातील उपलब्ध साधनसंपत्ती आणि मानवी भांडवल हे घटक अत्यंत महत्वाचे असतात. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर नियोजन काळात देशात रचनात्मक बदल घडून आल्याचे दिसून येते. कृषिला व्यापारी स्वरुप प्राप्त होऊन औद्योगिक विकासाला चालना मिळाली. लघु व कुटीरउद्योगाचे पर्व संपून मोठ्या उद्योगाचे पर्व सुरु झाले. वाढत्या विकासातून स्पर्धा व आर्थिक विषमता निर्माण झाली. ती कमी करण्यासाठी बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये 'सर्वसमावेशक व शाश्वत विकासाला' अग्रक्रम दिल्याचे दिसुन येते. त्यासाठी सामाजिक व आर्थिक विकासाच्या विविध योजना कार्यान्वित करण्यात आल्या. योजना राबविण्यासाठी शासन स्तरावरुन मानवी व नैसर्गिक संसाधनाचा अतिवापर करण्यात आला. नैसर्गिक संसाधनाची लयलुट, ऱ्हास करुन साध्य होणारा विकास शाश्वत व दिर्घकाळ टिकणारा नसतो. यामुळे भविष्यातील विकासाची गति मंदवण्याचा धोका असतो. 'शाश्वत विकास' हि संकल्पना घटत असलेली जागतिक नैसर्गिक संसाधने आणि त्यामुळे मंदवणाऱ्या भितीमधुन निर्माण झाल्याची दिसून येते. म्हणून भविष्यातील पिढ्यांना त्यांच्या उपभोगासाठी साधनांची पर्याप्त उपलब्धतता राहिल असा विचारपूर्वक वापर करुन होणारा विकास हि आजच्या विकासाची प्रमुख अट मानली जाते. यामुळे नैसर्गिक संसाधने, पर्यावरण उदा. शुध्द, हवा, मृदा, पाणी, उर्जा इ. घटकाची शाश्वत उपलब्धता यावर भर दिला जात आहे. म्हणूनच पर्यावरण व मानवी जीवन यांच्या चिरस्थयी व शाश्वत विकासाकरीता सप्टेंबर २०१५ च्या संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकास परिषदेत शाश्वत विकासाशी संबंधित १७ उद्दिष्ट्ये व १६९ विकासाशी संबंधीत लक्ष निश्चित करण्यात आले असून ती जगातील सर्वच देशानी २०३० पर्यंत साध्य करण्याचे लक्ष्य निर्धारीत करण्यात आल्याचे दिसून येते.[१] भारत सर्व समावेशक विकास धोरणाची पुर्तता करण्यासाठी विविध क्षेत्रातील बदलतांना सामोरे जात आहे. मात्र या सर्व धोरणाला शाश्वत विकास निकष असनेही तितकेच महत्वाचे आहे. ठरवून दिलेली निर्धारीत लक्ष्य साध्य करण्यासाठी भारताला भविष्यात आर्थिक शाश्वतता, सामाजिक शाश्वतता, पर्यावरणीय शाश्वतता, संस्थात्मक शाश्वतता या क्षेत्रात निर्धारीत लक्ष्य साध्य करण्यासाठी स्वत:ला सिध्द करावे लागणार असून ते एक मोठे आव्हान आहे. निर्धारीत लक्ष्य साध्य करण्यात भारताच्या कामगीरीचे मूल्यमापन करणे हे मुख्य उद्दिष्ट्ये समोर ठेऊन प्रस्तुत लघुशोध निबंधाची मांडणी करण्यात आली आहे.

**शोधनिबंधाचा उद्देश :**

संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकास परिषदेतील निर्धारित उद्दिष्टांचा अभ्यास करणे व भारताच्या शाश्वत विकास लक्ष प्राप्तीचे मूल्यमापन करणे हा प्रस्तुत लघुशोध निबंधाचा मुख्य उद्देश आहे.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये** शाश्वत विकास संकल्पनेचा अर्थ समजून घेणे.

संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकास परिषदेतील निर्धारित उद्दिष्टांचा अभ्यास करणे.

भारताच्या शाश्वत विकास लक्ष्यप्राप्तीचा आढावा घेणे.

**अभ्यासाची गृहितके**

वर्तमान विकासातून भविष्यातील विकास सुनिश्चित करण्यात शाश्वत विकास संकल्पनेची भुमिका महत्वपूर्ण दिसून येते.

सर्वसमावेशक व शाश्वत विकासासाठी निर्धारीत उद्दिष्टांचे महत्व अनन्यसाधारण दिसून येते.

शाश्वत विकासाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यात भारताची कामगीरी असमाधानकारक दिसून येते.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी व्दितीयक स्त्रोतांचा (Secondary Sources) वापर करण्यात आला असून यात विविध संदर्भ ग्रंथ, अहवाल, वेबसाईड (इंटरनेट) चा वापर करण्यात आला आहे. तसेच अशय विश्लेषणाचे तंत्र वापरुन मुद्देसूद मांडणी करण्यात आली आहे.

**अभ्यासाची मर्यादा**

प्रस्तुत लघुशोध निबंध हा व्दितियक स्त्रोतांवर आधारीत आहे. सदरील शोधनिबंधातून संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकास अहवालातील निर्धारीत उद्दिष्ट्ये व निर्धारित लक्ष्य साध्य करण्यात भारताच्या कामगीरीचे मुल्यमापन करण्यात येणार आहे. शोधनिबंधातील निष्कर्ष हे व्दितीयक

स्त्रोतांवर आधारीत आहेत ही प्रस्तुत लघुशोध निबंधाची अभ्यासाची मर्यादा आहे.

**शाश्वत विकासाची संकल्पना आणि अर्थ**

शाश्वत विकास ही संकल्पना व्यापक असून ती जगातील सर्व मानवी समुहाशी संबंधीत आहे.

**ब्रन्डलॅड आयोग**

१९८३ साली संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने 'जागतिक पर्यावरण व विकास आयोग' स्थापन केला या आयोगाच्या अध्यक्षा नॉर्वेच्या पंतप्रधान श्रीमती ग्रोहर्लेन ब्रन्डलॅड या होत्या. आयोगाने १९८७ मध्ये 'our common future' या अहवाल शाश्वत विकासाची दिलेली व्याख्या पुढीलप्रमाणे.

"शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो भविष्यकालीन पिढ्यांची स्वत:च्या गरजा भागविण्याची क्षमता धोक्यात न आणता वर्तमान कालीन गरजा भागवू शकतो."

**वसुंधरा परिषद (संयुक्त राष्ट्र पर्यावरण व विकास परिषद)**

१९९२ मध्ये रिओ दि जानेरो ब्राझीलमध्ये भरविण्यात आली. या परिषदेनुसार "विकासाचा हक्क अशा रितीने साध्य व्हावा सध्याच्या व भविष्यकालीन पिढ्यांच्या विकासात्मक आणि पर्यावरणीय गरजा समन्यायी पध्दतीने भागविल्या जाव्या."[२] यावरुन सध्याच्या वर्तमान विकास करीत असतांना भविष्यकालीन विकासावर त्याचा अनिष्ट परिणाम होऊ नये याची दक्षता घेणे ही काळाची गरज आहे. यात पर्यावरण रक्षण आणि विकास यांना अत्यंत महत्व दिसून येते.

**शाश्वत विकास संकल्पनेचा उगम काही महत्वपुर्ण निरीक्षणे :**

शाश्वत विकास (Sustainable Development) हा शब्दप्रयोग सन १९८० जागतिक संवर्धन डावपेचामध्ये करण्यात आल्याचे दिसून येते, तर १९८७ मध्ये पर्यावरण आणि विकास संबंधी सुचना देण्यासाठी 'ब्रन्डलॅड कमीशन' स्थापन करण्यात आले. हा शाश्वत विकासासंबंधी व्याख्या करणारा पहिला आयोग असल्याचे दिसून येते.

**पॉल ईहर्लिच यांनी आपल्या**

१९६८ मध्ये प्रकाशित केलेल्या ग्रंथात मानवी लोकसंख्या, संसाधनाचा वापर आणि पर्यावरण यातील संबंधाची चर्चा केल्याची आढळून येते. १९७१ मध्ये 'OECD' ने 'Polluter pays Principle' या तत्वाचा स्विकार केलेला दिसून येतो. म्हणजेच 'करेल तो भरेल' या म्हणीनुसार प्रदुषण करणाऱ्यानेच त्याची किंमत मोजावी असा या तत्वाचा अर्थ होतो. अमेरिकेतील MIT या संस्थेतील काही तरुण संशोधकांनी 'Limits to Growth' (1972) या अहवालात आर्थिक प्रक्रियेवर मर्यादा आणल्यास होणाऱ्या भविष्यकालीन परिणामाची यात चर्चा करण्यात आल्याचे दिसून येते.

१९७२ मध्ये संयुक्त राष्ट्राने 'स्टॉक होम' येथे 'UN Conference of Human Environment' ही परिषद भरविली या परिषदेत पर्यावरण हा एक विकासाचा निर्णायक मुद्दा असल्याचे मानण्यात आल्याचे दिसून येते. १९८७ मध्ये 'ब्रॅन्डलॅड आयोग अहवाल' आणि १९९२ 'वसुंधरा परिषद' यांनी शाश्वत विकास संकल्पनेचा विकास केला त्यामुळे ती विकासाची एक संपूर्ण संकल्पना म्हणून जागतिक पातळीवर उदयास आल्याचे दिसून येते. २०१५ नंतर संयुक्त राष्ट्र मिलिनियम डेव्हलपमेंट रद्द केल्यानंतर भविष्यातील आंतरराष्ट्रीय विकास उद्दिष्टे ठरविण्यासाठी 'सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स (SDG)' तयार करण्यात आला, यामुळे संकल्पनेची व्यापकता वाढल्याचे दिसून येते.[३]

**जगतिक शाश्वत विकासाची उद्दिष्टे** जगभरातून सर्व प्रकारच्या गरीबीचा अंत करणे.

१. अन्न सुरक्षा, उत्तम पोषण आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन देणे.
२. सर्व वयोगटातील लोकांना आरोग्य संरक्षण आणि निरोगी जीवनाला प्रोत्साहन देणे.
३. सर्व समावेशक आणि समान दर्जाचे शिक्षण सुनिश्चित करणे आणि सर्वांना शिकण्याची समान संधी उपलब्ध करुन देणे.
४. स्त्रि–पुरुष समानता प्राप्त करुन महिला शिक्षणावर भर देणे त्याचबरोबर महिला व मुलीचे सक्षमिकरण करणे.
५. सर्वांसाठी स्वच्छता आणि शाश्वत पाणी व्यवस्थापणाची उपलब्धता सुनिश्चित करणे.
६. परवडणारी, विश्वासार्ह शाश्वत आणि आधुनिक उर्जेचा वापर सुनिश्चित करणे.
७. सर्वसमावेशक आणि शाश्वत आर्थिक वाढ करुन उत्पादक रोजगार सर्वांसाठी उपलब्ध करुन देणे.
८. लवचिक पायाभूत सुविधा, सर्वसमावेशक आणि शाश्वत औद्योगिककरणाला प्रोत्साहन देणे.

९. देशा—देशांमधील असमानता कमी करणे.
१०. सुरक्षित लवचिक आणि टिकाऊ शहरे आणि मानवी वसाहाती तयार करणे.
११. शाश्वत उपयोग आणि उत्पादन पध्दती सुनिश्चित करणे.
१२. शाश्वत विकासासाठी हवामान बदल आणि त्याचे परिणाम हातळण्यासाठी त्वरीत कार्यावाही करणे.
१३. शाश्वत विकासासाठी महासागर आणि सागरी संसाधनाचा सुयोग्य वापर करणे.
१४. स्थानिक परिसंस्था, संरक्षित जंगले, जमिनीचा ऱ्हास आणि जैवविविधतेचे वाढते नुकसान रोखण्यासाठी प्रयत्न करणे व त्याच्या शाश्वत वापरासाठी प्रोत्साहन देणे.
१५. शाश्वत वापरासाठी शांततापूर्वक आणि सर्वसमावेशक सर्व समाजांना प्रोत्साहन देणे आणि सर्वांसाठी न्याय सुनिश्चित करण्यासाठी त्यांना सर्व स्तरावर प्रभावी जबाबदार बनविणे.
१६. शाश्वत विकासासाठी जागतिक भागीदारी पुनरुज्जीवित करण्यासोबतच अंमलबजावणीच्या साधनाचे बळकटीकरण करणे.[४]

सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासाच्या अनुषंगाने वरील उद्दिष्टाचे महत्व अनन्यसाधारण दिसून येते. निर्धारीत लक्ष्याची पुर्तता करण्यासाठी जगातील प्रत्येक देशाने आपल्या ध्येय धोरणामध्ये विशेष महत्व देऊन ते साध्य करण्यासाठी उद्दिष्टांची अंमलबजावणी काटेकोरपणे केल्यास येणाऱ्या पिढीचे भवितव्य निश्चितच सुखकर होईल. निर्धारीत उद्दिष्टे २०३० पर्यंत साध्य करण्यासाठी सदस्य राष्ट्रानी सहमती दर्शविल्याचे दिसून येते.

**शाश्वत विकासाची उद्दिष्टे आणि भारताची कामगीरी : (Sustainable Development Goals and India's Performance)**

शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्याच्या दिशेने राज्य व केंद्रशासीत प्रदेशाने केलेल्या प्रगतीचे विस्तृतपणे दस्तऐवजीकरण व गुणांकन करण्यासाठी सन २०१८ पासून भारतात एसडीजी इंडिया इन्डेक्स आणि हॅशबोर्ड अहवाल तयार करण्याची सुरुवात झाल्याचे दिसून येते. शाश्वत विकासावर देखरेख ठेवण्याचे हे एक प्रमुख साधन असून याव्दारे राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना स्पर्धेतून शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यास प्रेरणा मिळते. भारत सरकारच्या निति आयोगाव्दारे हा अहवाल केंद्रिय वितमंत्रालयाव्दारे प्रकाशीत करण्यात येतो. २०१८ च्या पहिल्या अहवालात ६२ निर्देशांकासह १३ उद्दिष्ट्ये समाविष्ठ करण्यात आली असून सन २०२०—२१ च्या भारत शाश्वत विकास निर्देशांक अहवाल ११५ निर्देशांकसह १६ उद्दिष्ट्ये निधारीत करण्यात आले असून १७ व्या उद्दिष्टाबाबत गुणात्मक मूल्यांकन केल्याचे दिसून येते. एसडीजी इंडिया इंडेक्स २०२०—२१ राष्ट्रीय निर्देशांक आराखड्याशी संलग्नीत असल्यामुळे लक्ष्य आणि निर्देशांकाच्या व्यापक समावेशनामुळे मागील वर्षाच्या तुलनेत त्यात सुधारणा झाल्याची दिसून येतो. राज्य आणि केंद्रशासित प्रदेशाचे त्यांच्या एसडीजी इंडीया इन्डेक्स गुणाच्या आधारे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात आल्याचे दिसून येते.

| | |
|---|---|
| आकांक्षित | : ० — ४९ |
| प्रयत्न करणारे | : ५० — ६४ |
| आघाडीवरचे | : ६५ — ९९ |
| प्राप्तकर्ता | : १०० |

एसडीजी इंडिया इंन्डेक्स (India Index of Sustainable Development Goals) प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी १६ शाश्वत विकास उद्दिष्टाबाबत लक्ष्यवार गुणाची गणना करतो. हे गुण ०—१०० दरम्यान असल्याचे दिसून येतात. जर राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांने १०० गुण प्राप्त केले तर त्या राज्य व केंद्रशासित प्रदेशाने एसडिजी—२०३० ची लक्ष्य गाठली असल्याचे सुचित होते. देशाच्या एकुण शाश्वत विकास निर्देशांकाच्या गुणात ६ अंकांनी सुधारणा होऊन तो २०१९ मधील ६० गुणावरुन २०२०—२१ मध्ये ६६ गुणावर पोहचला असल्याचे दिसून येते. शाश्वत विकासाची लक्ष्य साध्य करण्याच्या दिशेने होणारी हि सकारात्मक वाटचाल मुख्येत्वे उद्दिष्टे ६ स्वच्छ पाणी आणि स्वच्छता, उद्दिष्टे ७ परवडणारी व स्वच्छ उर्जा मधील अनुकरणीय देशव्यापी महत्वपूर्ण कामगीरीव्दारे झाले असून याचे समग्र उद्दिष्ट गुण अनुक्रमे ८३ आणि ९२ असल्याचे दिसून येतात.[५]

**तक्ता क्र ०१**

**भारताचा शाश्वत विकास लक्ष्य निर्देशांक अहवाल २०२०—२०२१**

| | |
|---|---|
| भारतातील पहिली पाच राज्ये | ७५ केरळ |
| | ७४ हिमाचल प्रदेश, तामिळनाडू |
| | ७२ आंध्रप्रदेश, गोवा, कर्नाटक, उत्तराखंड |
| | ७१ सिक्किम |
| | ७० महाराष्ट्र |
| भारतातील शेवटची पाच राज्ये | ६१ छत्तीसगड, नागालॅड, ओडिसा |
| | ६० अरुणाचल प्रदेश, मेघालय राज्यस्थान, उत्तर प्रदेश |
| | ५७ आसाम |
| | ५६ झारखंड |
| | ५२ बिहार |

Source : https : // pib.gov.in/press Release page aspx
नीती आयोग, एसडीजी इंडिया इन्डेक्स ऑनलाईन प्रकाशित अहवाल २०२०—२१, केंद्रीय वित्त मंत्रालय भारत सरकार दिल्ली.

वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट होते की, भारतात केरळ हे राज्य शाश्वत विकास लक्ष्य साध्य करण्यात अव्वलस्थानी असून सर्वात निम्नस्थानी बिहार राज्ये असल्याचे दिसून येते. एकुण १७ उद्दिष्टे लक्ष्य साध्य करण्यात भारताची संख्यात्मक व गुणात्मक प्रगती असमाधानकारक असल्याची दिसून येते.

**तक्ता क्र ०२**

**जलद शाश्वत विकास लक्ष्य साध्य करणारे राज्य (गुणांनुसार)**

| राज्य | २०१९—२० (गुण) | २०२०—२१ (गुण) | बदल (गुण) |
|---|---|---|---|
| मिझोराम | ५६ | ६८ | १२ |
| हरियाणा | ५७ | ६७ | १० |
| उत्तराखंड | ६४ | ७२ | ०८ |

Source : https : // pib.gov.in/press Release page aspx
नीती आयोग, एसडीजी इंडिया इन्डेक्स ऑनलाईन प्रकाशित अहवाल २०२०—२१.

वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट होते की, भारतातील एकुण राज्याचा विचार करता जलद शाश्वत विकासाची उद्दिष्ट्ये साध्य करणाऱ्या राज्याचे संख्यात्मक प्रमाण फारच अल्प दिसून येते. येणाऱ्या काळात उच्च शाश्वत विकास साध्य करण्यासाठी धोरणात्मक व्युहरचना भारताला आखून स्वत:ला सिध्द करणे हे गरजेचे ठरणार आहे. भारत शाश्वत विकास लक्ष्य निर्देशांक अहवाल २०२०—२१ नुसार केंद्रशासित प्रदेशामध्ये चंदीगड अव्वलस्थानी असून लक्षव्दिप आणि पॅन्डेचरी दुसऱ्या स्थानावर आहेत. तर अंदमान आणि निकोबार तिसऱ्या स्थानावर असल्याचे दिसून येते.

**शाश्वत विकास उद्दिष्टे आणि भारताचे धोरण :**

शाश्वत विकास उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी भारत सरकारकडून निश्चित ध्येय धोरणे आखण्याला प्राधान्य दिले जात असल्याचे दिसून येते. सन २०२०:२१ च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार भारत हा अनेक सक्रिय हवामान विषयक उपक्रम राबवित आहे. यात हवामान बदलावरील राष्ट्रीय कृती योजना, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय सौर अभियान, हवामान बदलावरील राष्ट्रीय अनुकुलन निधी, इलेक्ट्रीक वाहनाचा वापर आणि उत्पादन अंमलबजावणी योजना उपक्रमांचे महत्व दिसून येते. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर सौर क्रांती घडून आणण्यासाठी आंतरराष्ट्रीय सौर युती भारताने केली. यात वर्ल्ड सोलार बॅक आणि वन सन वन वर्ल्ड व ग्रिड इनिशिएटिव्ह या उपक्रमांची सुरुवात केली असल्याचे दिसून येते. या अनुषंगाने भारतात २०२० मध्ये जागतिक सौर तंत्रज्ञान परिषदेचे आयोजन करण्यात आल्याचे दिसून येते.[६]

**निष्कर्ष (Conclusion)** :

शाश्वत विकास ही संकल्पना व्यापक असून ती जगातील सर्व मानवी समुहाशी संबंधीत आहे. घटत असलेली जागतिक संसाधने आणि

त्यामुळे मंदवणाऱ्या आर्थिक विकासाच्या भितिंमधून शाश्वत विकास संकल्पना निर्माण झाली आहे. वर्तमानातील विकास हा भविष्यातील विकासाची शाश्वती आजच सुनिश्चित करणारा असावा तरच तो शाश्वत विकास ठरतो. भारताची पारंपारिक कृषिप्रधान अर्थव्यवस्था विकसित देशाप्रमाणे जलद आर्थिक विकासाचा मार्ग स्विकारु लागली आहे. त्यातून होणारा संसाधनाचा ऱ्हास नैसर्गिक परिसंस्थांचा ऱ्हास होण्यास कारणीभूत ठरु शकतो. म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात शाश्वत विकास महत्वाचा ठरतो. संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकास उद्दिष्ट्ये साध्य करणाऱ्या दक्षिण आशियातील सर्व देशाच्या क्रमवारीत भारत मागे आहे. याचे मुख्य कारण म्हणजे भारतापुढे चांगले आरोग्य, आनंद, लैगिक समानता हि आव्हाने असून दर्जेदार शिक्षण आणि चांगले जीवन या संदर्भात भारताची कामगीरी वाईट आहे. त्याच बरोबर दारिद्र्य निर्मुलन, अन्नसुरक्षा, पायाभुत सुविधा, सर्वसमावेशक आणि शाश्वत औद्योगीकरण साध्य करण्यात संयुक्त राष्ट्राच्या अहवालानुसार भारत अपयशी ठरला आहे. मात्र जमेची बाजु म्हणजे स्वच्छ पाणी आणि स्वच्छता, परवडणारी व स्वच्छ उर्जा यात समाधानकारक प्रगती दिसून येते. भारत सर्वसमावेशक विकास धोरणाची पुर्तता करण्यासाठी विविध क्षेत्रातील बदलाला सामोरे जात आहे. मात्र या सर्व धोरणाला शाश्वत विकास निकष असेने तितकेच महत्वाचे आहे. निर्धारीत उद्दिष्टे साध्य करण्यासाठी भारताला भविष्यात आर्थिक शाश्वतता, सामाजिक शाश्वत, पर्यावरणीय शाश्वतता, संस्थात्मक शाश्वतता या क्षेत्रात स्वतःला सिध्द करावे लागणार असून ते एक मोठे आव्हान आहे.

**संदर्भ (References)** :

१. रमेश सिंह (२०१४), भारतीय अर्थव्यवस्था, पब्लीकेशन मॅक ग्रॉ हिल एज्युकेशन इंडिया प्रायव्हेट लि., ६ वी आवृत्ती, न्यु दिल्ली, पेज १६.२ – १६.१९.

२. संपादकीय (२०१९–२०), भारतीय अर्थव्यवस्था, दुरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर २०१९–२०, पृष्ठ क्र. १५–२०.

३. श्री रंजन कोळंबे (२०१५), भारतीय अर्थव्यवस्था एमपीएससी व युपीएससी, भगीरथ प्रकाशन पुणे, पृष्ठ क्र.३३–३५.

4- https://hi.wikipedia.org/wiki.

5- https://pib.gov.in/press release page aspx.

6- https://muktpeeth.com/sustainable development-goal india.came down again below Bhutan Bangladesh.

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, June 2022, Volume-14, Issue-6

# ‘लोकमान्य टिळकांचे राजकीय विचार आणि धोरण’

**कुणाल दिलीप राठोड ( CHB प्राध्यापक)**

डॉ.कै. शंकरराव सातव कला आणि वाणिज्य महाविद्यालय, कळमनुरी. जिल्हा- हिंगोली (राज्यशास्त्र विभाग)

ई-मेल:- kunal2sonu@gmail.com

**सारांश :** सारे जग एकमेकांच्या जवळ येत आहे, त्याचे भान लोकमान्यांना होते. त्यामुळेच जागतिक घडामोडींकडे लक्ष ठेऊनच त्यांनी आपली धोरणे आखली आणि अमलातही आणली. 1 ऑगस्ट 2020 रोजी लोकमान्य टिळकांच्या मृत्यूला शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. 'लोकमान्य' हे लोकांना मान्य होते कारण त्यांनी आपली धोरणे सदैव लोकांच्या कल्याणासाठी आखली आणि प्रसंगी बदलली सुद्धा. आपल्या हातातील माध्यमांद्वारे त्यांनी आपली धोरणे लोकांपर्यंत पोहोचवली आणि त्यादृष्टीने लोकांना विचार कल्याणास उद्युक्त केले. ब्रिटिश सत्ता हे वरदान नसून ईश्वरी प्रकोप आहे, याची जाणीव लोकांमध्ये निर्माण करून देऊन, परकीय सत्तेविरुद्ध असंतोष निर्माण करून देऊन, परकीय सत्तेविरुद्ध असंगोष निर्माण करणारे लोकमान्य टिळक हे म्हणूनच महत्वाचे राजकीय विचारवंत ठरतात.

**प्रस्तावना :**

आजच्या आधुनिकोत्तर जगामध्ये 'पॉलिसी/धोरण थिंकिंग' हे एक शास्त्र बनले आहे. त्यासाठी जगभर अनेक थिंकटँक कार्य करत आहेत. सरकारच्या धोरणांवर समाजातील विचारवंतांचा प्रभाव असावा, हे यामागील सर्वसाधारण उद्दिष्ट्ये आहे. टिळकांचे चारित्र्य आपण अभ्यासतो, तेव्हा टिळकांनी आयुष्यभर हेच केले असे आपल्याला आढळते. भारताचे फक्त राजकीय नेतृत्व नव्हे, तर वैचारिक नेतृत्वही टिळकांकडून गांधीजींकडे आले आहे, हे आपण विसरून चालणार नाही. लोकमान्यांचे राजकारण आणि समाजकारण त्या दृष्टीने पाहायला हवे. 1 ऑगस्ट 1920 ला लोकमान्य टिळक गेले, तो दिवस महात्मा गांधी यांच्या असहकार चळवळीचा आरंभदिन होता. 'टिळक हे गांधी मार्गाचे पाहिले उपदेशक होते, टिळकयुगातूनच गांधीयुगाचा प्रारंभ झाला', असे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी म्हटले आहे. लोकमान्यांचा हा वैचारिक प्रवास कसा झाला, त्यांनी आपली धोरणे काशी मांडली, कसे बदलले आणि कसे लोकांपर्यंत पोहोचविले हे पाहणे आजघडीला खूप काही शिकविणारे आहे.

**उद्दिष्टे :**

1) लोकमान्यांच्या राजकीय विचारांचे अध्ययन करणे.

2) लोकमान्यांच्या राजकीय आणि सामाजिक तसेच आंतराष्ट्रीय धोरणांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत अध्ययनासाठी तथ्य संकलन करताना द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. अध्ययन विषयाशी संबंधित दुय्यम तथ्य संकलित करण्यासाठी प्रकाशित, अप्रकाशित असलेली शोध अध्ययन, संदर्भ ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्रे, संशोधन पत्रिका इत्यादी दुय्यम स्थान च्या माध्यमातून माहिती संकलित करण्यात आलेली आहे.

**आशय विश्लेषण :**

**लोकमान्यांची राजकीय सुरुवात :**

टिळकांनी सार्वजनिक जीवनात सर्वस्व अर्पण करण्याची मानसिक तयारी महाविद्यालयात असतांनाच केली होती. त्यांच्या देशसेवेचा प्रारंभच मुळी कारावासाने झाला. 1882 मध्ये कोल्हापूरच्या राजाला वेडा ठरवल्यावर टिळक आणि आगरकरांनी 'केसरी' तुन टीका केली. यात त्यांची फसवणूक होऊन बदनामीच्या आरोपाखाली त्यांना तीन महिन्याचा तुरुंगवास पत्करावा लागला. अर्थात, पुढे टिळक व आगरकरांचे मार्ग वेगळे झाले. 1895 च्या दुष्काळापासून टिळकांनी ब्रिटिश सत्तेचे स्वरूप स्पष्ट करून, लोकांना त्याविरोधात प्रतिकारासाठी उठाण्यास सुरुवात केली. त्यांच्या लेखांत लोक, लोकांसाठी असे सर्वग्राहक शब्द सर्वत्र आढळतात. एके ठिकाणी टिळक लिहितात, " शेतकरी

किंवा मजूर लोक हे सज्ञानी व गरीब असतात. ह्यांच्या करिता खरा उद्योग सुशिक्षित लोकांनीच केला पाहिजे व तो जर तालुक्यातील पुढारी लोक करणार नाहीत तर आमच्या देशाचे दुर्दैव अद्याप संपले नाही असे म्हणावे लागेल." लोकाभिमुख राजकारणाच्या संदर्भातले टिळकांचे हे मत आजही तितकेच लागू आहे.

टिळकांच्या खऱ्या कारकिर्दीला आणि अखेरपर्यंत चालविलेल्या त्यांच्या स्वातंत्रसंग्रामाला 1899 नंतरच अधिक तेज चढले. राजद्रोहाचा शिक्षा भोगून टिळक परत आल्यानंतर त्यांची लोकप्रियता वाढली होती. 1905 च्या बंगालच्या फाळणीमुळे देशात जहाल राजकारणाला मोठा उठाव मिळाला. वंगभंग आंदोलनात टिळकांच्या सहभागामुळे ते राष्ट्रीय नेते म्हणून नावारूपाला आले. दुसऱ्या राजद्रोहाचा शिक्षेतून 1914 साली टिळक मंडलेहून सुटून आले, तेव्हा मुंबई सरकारला त्यांचा जमानसावरील प्रभाव कमी होईल असे वाटत होते. उलट, टिळकांची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढतच गेली आणि ते अखिल भारतीय पातळीवर सर्वमान्य होऊ लागले.नेत्यांच्या सभा उघड्या मैदानावर आणि हजारांच्या संख्येने होऊ लागल्या. टिळकांच्या दर्शनासाठी व त्यांच्या मोठ्या मिरवणुकांतून सर्व प्रांतात लोकांची गर्दी होत असे. उत्तर भारतात त्यांचा उल्लेख 'टिळक महाराज' किंवा 'भगवान टिळक' असा केला जाई. सश्रद्ध भारतीय मनाने त्यांना विभूती म्हणून स्वीकारले गेल्याचे ते दिग्दर्शन आहे. असा लोकांचा पाठिंबा लाभलेला, पुढच्या काळातला गांधींचा अपवाद सोडला तर टिळक हे एकमेव नेते होते. त्यावेळच्या जहाल आणि मावळयांच्या मतभेदांत टिळकांची भूमिका अगदी स्पष्ट होती. काँग्रेसला टाळून अखिल भारतीय स्तरावर कोणतीही राजकीय कृती करण्यापेक्षा तिचा वापर करणे, जास्त उपयुक्त होईल ही त्यांची पूर्वीपासून धारणा होती. राष्ट्रीय सभा सर्वांची नसून ज्याचे बहुमत होईल त्याच्या हाती राष्ट्रीय सभेची सूत्रे राहिली पाहिजेत असे त्यांनी प्रतिपादन केले. 'वतनदारीचे हक्क आम्हाला आणि आमच्या शिष्यांना परंपरेने प्राप्त झाले आहेत, असे कोणी म्हणेल तर ते बरोबर नाही. त्याचप्रमाणे बावीस वर्षांच्या अनुभवाने निरुपयोगी ठरलेल्या शास्त्रांनीच पुढे युद्ध करणार, असा आग्रह धरणारा अविचारी असेल. रायफलसाठी शस्त्रे हातात असलेल्या प्रतिपक्षावर धनुष्यबाण किंवा तलवारीने चालून जाणाऱ्या गृहस्थाइतकाच हा मूर्खपणा आहे' , असे त्यांनी बजावले. सरकारच्या दृष्टीने तुम्ही मवाळ आणि आम्ही जहाल असा भेद नाही. त्यामुळे आपण आपसातले भांडण वाढवायला नको. याच्यापुढेच लोक आम्हाला मवाळ ठरवतील आणि ते जहाल असतील. आजच्या संसदीय लोकशाहीच्या परंपरेची पायाभरणी ज्या विचार आणि भूमिकांमधून झाली, ती ही मूल्ये अजूनही कालबाह्य झालेली नाहीत.

**टिळकांचा आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन :**

**प्रस्तावना :**मानवाच्या उत्क्रांतीच्या इतिहासात शेतीचा लागलेला शोध ही एक महत्वाची घटना आहे. शेती व्यवसायाची सुरुवात नवाश्मयुगात झाली असून त्याचा कालखंड इ. स. पूर्व दहा हजार वर्षांचा मानला जातो. इ.स. पूर्व पाच हजार ते तीन हजार या ताम्रपाषण युगाच्या कालखंडात माणूस घरे बांधून स्थायी झाला तेव्हा भारतात शेती व्यवसायाची बरीच प्रगती झाली होती.[१] प्राणिज अन्न व वनस्पतिज अन्न या दोहोंचाही वापर मनुष्यप्राणी करीत असला तरी एका ठिकाणी स्थायी झाल्याच्या कालखंडापासून तो आजपर्यंत शेतीतील उत्पादनच माणसाच्या उपजीविकेचे प्रधान साधन राहिले आहे. भारतातही मांसाहार आणि शाकाहार या दोन्ही प्रकारचे अन्न ग्रहण करणारे लोक असले तरी संयुक्त राष्ट्राच्या २००७ च्या आकडेवारीनुसार भारत देश हा सर्वात जास्त शाकाहार करणाऱ्या लोकांचा देश आहे. “एवढेच नव्हे तर, जगात जेवढे शाकाहारी लोकं आहेत त्यांची संख्या एकत्र केली तरी भारतातील शाकाहारींची संख्या त्याहून अधिक भरेल”,[२] असे निरीक्षण त्यात नोदवण्यात आले आहे. भारतात मांसाहार करणाऱ्या लोकांच्या आहारात सुद्धा वनस्पतिज अन्नाचा समावेश असतो, हे लक्षात घेतले तर या सर्वांना वनस्पतिज अन्नाचा पुरवठा करणारा शेतकरी खरोखरच अन्नदाता आहे, हे मान्य करावेच लागेल. अद्ययावत उद्योगांबद्दलचे अज्ञान व आवश्यक भांडवलाची अनुपलब्धता अशा काही कारणांमुळे पारंपारिक शेती व्यवसाय करणाऱ्या लोकांची संख्या भारतात खूप मोठ्या प्रमाणात आहे. भारतातील इतर उद्योगांच्या तुलनेत ‘शेकडा ६४ टक्के जनता कृषीक्षेत्रावर अवलंबून आहे आणि त्यातील ७० टक्के शेतकरी अल्पभूधारक आहेत.’[३] मात्र आज देशाचा पोशिंदा असणारा भारतीय शेतकरी अतिशय वाईट स्थितीत जीवन जगत आहे. अपुऱ्या सिंचन सुविधेमुळे सततच ओला नाही तर सुका दुष्काळ सहन करीत, निसर्गाशी झगडत झगडत शेती करणारा शेतकरी स्वत:च्या अस्तित्वासाठी संघर्ष करीत आहे. अशातच जागतिकीकरणाच्या दृष्टचक्रात सापडून संकरीत बियाणे, रासायनिक खते, विविध कीटकनाशके यांच्या अतिरिक्त वापरामुळे उत्पादन खर्चात भरमसाठ वाढ झाल्याने, हाती येणाऱ्या शेतमालापासून मिळणारे प्रत्यक्ष उत्पन्न व उत्पादन खर्चात मेळच बसत नसल्याने शेतकऱ्याच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर वाढत जात आहे. शेतकरी विषयक कायदे, शेतमालाच्या आयात-निर्यातीची शासकीय धोरणे, शासन व्यवस्थेतील भ्रष्टाचार, बेरोजगारी अशा अनेक पातळीवर शेतकऱ्याला लढावे लागत असून तो पूर्णपणे अगतिक झालेला आहे. पदोपदी होणारे स्वभिमानावरचे अत्याचार सहन न होऊन अनेक शेतकरी आत्महत्या करून जीवन संपवत आहेत. ही सद्यस्थिती संपूर्ण भारतासाठी अतिशय चिंताजनक आणि भयावह आहे.

**नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कादंबरी :**

इ. स. १९७५ च्या आसपास मराठी साहित्यात निर्माण झालेल्या ग्रामीण साहित्य चळवळीने प्रेरीत झालेल्या ग्रामीण भागातील तरुणांनी आपल्या सभोवतालचे ग्रामीण वास्तव साहित्यातून मांडायला सुरुवात केली. इ.स. १९९० नंतर ते अधिक वास्तावाभिमुख झाले. इ. स. १९९१ नंतर जागतिकीकरणाचा ग्रामीण विभागातील समाज जीवनावर जो प्रभाव पडला आणि त्यामुळे जी स्थित्यंतरे गावगाड्यात घडून आली, त्या सर्वांचा वेध नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरीने प्रभावीपणे घेतलेला आहे. नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरी ही ग्रामीण जीवनातील अनेक प्रश्न आणि विषय घेऊन अवतरलेली आहे. या मध्ये विविध पातळींवर ग्रामीणांचे होणारे शोषण उजागर करण्याचा व त्याच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक, राजकीय अशा विविध पातळ्यांवरच्या जीवनाच्या अवनतीला कारणीभूत असलेल्या कारणांचा शोध घेऊन त्याची मांडणी करण्याचा प्रयत्न नव्वदोत्तरी ग्रामीण साहित्याने केलेला आहे. शेतीव्यतिरिक्त ग्रामीण जीवनातील प्रश्न घेऊनही ग्रामीण साहित्यनिर्मिती झालेली आहे. मात्र ग्रामीण साहित्यात शेती व शेतकरी हा विषय मध्यवर्ती ठेवून झालेली साहित्य निर्मितीही मोठ्या प्रमाणात आहे. ग्रामीण भागातील जागतिकीकरणाचे दृश्य परिणाम म्हणजे शेतकऱ्यांच्या आत्महत्या, असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. शेती व शेतकरी यांच्याशी जन्मानेच नाळ जुळलेली असल्याने, एकेकाळी राजा म्हणून गौरविला गेलेला शेतकरी आज अत्यंत हलाखीत जीवन जगून आपल्या सामान्य गरजाही शेतीच्या भरोश्यावर पूर्ण करू शकत नाही, ही जाणीव संवेदनशील ग्रामीण लेखकांच्या संवेदनविश्वाचा विषय झाली आहे. म्हणूनच आपल्या सभोवताल एवढ्या मोठ्या संख्येने होणाऱ्या शेतकरी आत्महत्या ग्रामीण लेखकांच्या लेखनाचा विषय बनत गेल्या. ग्रामीण साहित्यातील सर्वच साहित्यप्रकारांनी हा विषय मांडलेला असला तरी कादंबरी या साहित्यप्रकारातून यावर विशेषत्वाने लेखन झालेले आहे. त्यातील काही निवडक ग्रामीण कादंबऱ्यांतील शेतकरी जीवनदर्शनाचा वेध घेणे हा या संशोधन निबंधाचा मुख्य उद्देश आहे.

**नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कादंबरीतील शेतकरी जीवन :**

शेती आणि शेतकरी यांच्या समग्र जीवनाचा वेध केवळ एका कादंबरीत घेता येणे खूप कठीण आहे. मात्र असे असले तरी सदानंद देशमुख यांच्या २००२ साली प्रकाशित झालेल्या 'बारोमास' या कादंबरीने यामध्ये बहुतांशी यश प्राप्त केले आहे. एकनाथ या उच्चशिक्षित मात्र डोनेशन अभावी बेरोजगार राहणाऱ्या ग्रामीण नायकाच्या माध्यमातून शेतकरी जीवनाचे अतिशय भेदक दर्शन सदानंद देशमुख यांनी बारोमास या कादंबरीमधून घडविले आहे. शेतकऱ्याचा निसर्गाशी चाललेला संघर्ष, अपुरी सिंचन व्यवस्था, दुबार पेरणीचे संकट, त्यासाठी मशागतीवर होणारा खर्च, संकरीत बियाणांचे वाढलेले भाव, महाग रासायनिक खते व कीटकनाशके, जमिनीचा खालावत जाणारा पोत, वाढलेली मजुरी या सर्वांचा भार सहन न झाल्यामुळे क्षणोक्षणी खंगत जाणारा शेतकरी ते या कादंबरीत उभा करतात. लागणारा उत्पादन खर्च आणि प्रत्यक्ष हाती येणारे उत्पन्न याच्यात ताळमेळ न बसल्याने थकणारे बँकेचे कर्ज, लुबाडणारी बेदरकार भ्रष्ट नोकरशाही, त्यासाठी शेवटी नाईलाजाने खाजगी सावकारांकडून ज्यादा व्याजाने काढावे लागणारे कर्ज व शेवटी त्यात दबून नष्ट होत जाणारे शेतकऱ्यांचे जीवन त्यांनी या कादंबरीतून जिवंत केले आहे. भौतिक सुखाची खुणावणारी स्वप्ने डोळ्यात साठवून ती पूर्ण करण्यासाठी शिकून पुढे आलेली ग्रामीण तरुणांची पिढी आणि नोकरीत वशिलेबाजीने शहरातील मुलांची होणारी निवड पाहून सुरुवातीला गुप्तधन शोधण्यासाठी रानोमाळ फिरणारी आणि पुढे रस्त्यावरील लुटमारीकडे वळणारी ग्रामीण सुशिक्षित तरुणांची फौज शेतीविषयी उदासीन आहे. स्वप्ने पूर्ण करण्यासाठी परंपरागत शेती विकायचा प्रॅक्टिकल विचार ही पिढी करते परंतु शेतीत राबायला नकार देते. शेतीमुळे शेतकऱ्यांच्या मुलांचे भावजीवनही कसे कसे बाधित होते ते वारंवार माहेरी जाणारी व भौतिक सुख मिळाल्याशिवाय शरीर सुख देणार नाही असे स्पष्ट सांगणारी एकनाथची पत्नी अलका, नोकरी अभावी जुळण्याआधीच तुटलेले मधूचे लग्न अशा उदाहरणांमधून लेखक मांडतात. खेडे आणि शहर, सुशिक्षित आणि अशिक्षित, ग्रामीण आणि नागर, भाषेतील शुद्ध–अशुद्धता अशा अनेक पातळयांवरचा संघर्ष या कादंबरीतून लेखक गोचर करतात.

अशोक कौतिक कोळी यांची २००६ साली प्रकाशित झालेली 'पाडा' ही कादंबरी केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या वास्तव जीवनाचे दर्शन घडवते. चांगदेव तापीकर हा या कादंबरीचा नायक. शेतकरी हा मूळातच लढवय्या आहे. तो आजवर अनेक संकटांशी लढतच आलेला आहे. चांगदेव तापीकर हाही असाच लढवय्या आहे. शेतातील पीक वाचवण्यासाठी पीकांना पाणी देणे आवश्यक असते. त्यासाठी वीजेची गरज असतांना सतत लोडशेडिंगच्या नावाखाली ग्रामीण भागातील वीज गुल असते. त्याविरुध्द आंदोलन करून काही प्रमाणात यश प्राप्त करणारा चांगदेव केळीच्या पाड्याला भाव न मिळाल्यामुळे केळीफेको आंदोलन करतो. मात्र केळीच्या त्या पाड्याच्या भरोश्यावर मुलगी सुनीताचे लग्न अवलंबून असल्याने व चांगदेवच्या या कृत्यामुळे सुनीताचे लग्न तुटल्यामुळे कमळाबाई अंथरुणाला खिळते. शेवटी बहिणीच्या मुलालाच नोकरी लावण्यासाठी डोनेशन भरण्याच्या काशीबाईच्या अटीवर सुनीताचे गणेशसोबत लग्न होते. मात्र कमळाबाईचा आजार वाढत गेल्याने तिच्या उपचाराचा खर्च करण्यासाठीही पुरेसे पैसे चांगदेवकडे असत नाहीत. म्हैस विकायचा विचार करून घरी आलेल्या चांगदेवला म्हशीला साप चावल्याने म्हैस मरून पडलेली दिसते. शेवटी बैलजोडी विकून उपचारासाठी आवश्यक पैसे घेऊन दवाखान्यात गेलेल्या चांगदेवची तिथेही निराशा होते. कमळाबाई मृत्यू पावते. सोसायटीमधील स्वार्थी राजकारण, ट्रकवाल्यांचे आंदोलन व प्रत्येक पातळीवर शेतकऱ्याची होणारी लुबाडणूक यामुळे शेवटी चांगदेव परभूत होतो. वेळेवर जावयाच्या नोकरीसाठी डोनेशन देता न आल्यामुळे मुलगी सुनिताचाही जळून मृत्यू होतो. शेतकऱ्यांच्या जीवनाला सर्वच बाजूंनी वेढून बसलेल्या दुःखाचे चित्रण यात लेखक जसे करतात तसेच शेतकऱ्यांकडे पाहण्याचा इतर व्यावसायिकांचा, नोकरदारांचा, मजूरदारांचा, सोयरिक जुळविणाऱ्या नातेवाइकांचा दृष्टीकोन कसा शोषकांचा आहे, हेही अधोरेखित करत जातात. उत्पादन खर्च व प्राप्त उत्पन्न यांच्यातील तफावत व त्यामुळे खचलेला शेतकरी आणि त्यामुळे त्याच्याशी सबंधित सर्वांचेच काळवंडत जाणारे भावजीवन वाचकांना अस्वस्थ करून जाते.

रा. रं. बोराडे यांची 'रिक्त- अतिरिक्त' ही कादंबरी उस उत्पादक शेतकऱ्यांच्या कष्टप्रद व अपमानास्पद जगण्याचे चित्र रेखाटते. नाथाप्पा, सिद्राम, मंडाबाई, व्यंकटराव तांगडे अशा वेगवेगळ्या पात्रांच्या माध्यमातून अतिरिक्त ठरलेल्या उसामुळे उस उत्पादक शेतकऱ्यांना किती मानसिक यातनांना सामोरे जावे लागते व साखर कारखान्याचे अध्यक्ष व त्यांनी निर्माण केलेली शोषकांची फौज सामान्य शेतकऱ्यांचे कसे शोषण करते याचे दिग्दर्शन ही कादंबरी घडवते. साखर कारखान्याच्या मालकांची अवकृपा होऊ नये म्हणून शेतकरी संघटनेपासून दूरता जोपासणारा शेतकरी, शेतकरी संघटनेत काळानुसार डोकावणारी काही आक्षेपार्ह तत्त्वे, केवळ आपल्यापुरता विचार करून स्वत:चा फायदा करून घेऊ इच्छिणारा शेतकरी वर्ग व त्यांच्यातील विभाजनाचा फायदा घेणारा राजकारणात वर्चस्व प्राप्त झालेला शोषकांचा वर्ग अशा अनेक बाबींचे चित्रण या कादंबरीत रा. रं. बोराडे करतात. उसाच्या भरोश्यावर नातीच्या लग्नाचा बेत आखून नाथाप्पा लग्न जुळवितात. मात्र शेवटपर्यंत उसाला तोडचिठ्ठी न मिळाल्याने ते हुंड्याची तजवीज करू शकत नाहीत. नातीचे लग्न मोडल्याने गावात तोंड दाखवायला जागा

राहिली नाही म्हणून मनात कुढत जाणारे नाथाप्पा सर्वच बाजूंनी कोंडी झाल्यावर शेवटी अतिरिक्त झालेल्या उससोबत स्वत:ला पेटवून देतात. कामापुरते आश्वासन देऊन शेवटी शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसणारे सरकार, निवडणुकीत कार्यकर्त्यांना आश्वासने देऊन राबवून घेणारे नेते, नोकरीसाठी आपल्या वाट्याची शेती विकून डोनेशन भरण्यासाठी वडिलांशी भांडणारी केदारसारखी सुशिक्षित बेरोजगारांची पिढी, हुंड्यासाठी लवकर मुहूर्त काढण्याची घाई करणारी वराकडील मंडळी अशा अनेक प्रश्नांवर या कादंबरीतून प्रकाश टाकलेला आहे.

'अंधार इथला संपत नाही' ही भालचंद्र देशपांडे यांची मार्च २००८ मध्ये प्रकाशित झालेली कादंबरी शेतकरी आत्महत्यांच्या कारणांचा शोध घेण्याच्या प्रयत्नांतून ग्रामीण जीवनाचा पट एका शोधकाच्या भूमिकेतून उलगडण्याचा प्रयत्न करते. दैनिक सर्वलक्षीचे वृत्तसंपादक असलेले सारंगस्वामी साधले हे या कादंबरीचे नायक आहेत. विदर्भातील बामणी-पिंपळदरी या क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यांमुळे त्या विभागात प्रत्यक्ष काही काळ वास्तव्य करून आपला अहवाल सादर करण्याच्या वृत्तसमूहाच्या मालकाच्या आज्ञेमुळे सारंगस्वामी या विभागात येतात. ग्रामीण जीवन, ग्रामीण परिसर, शेती संस्कृती, शेतकऱ्यांच्या अडचणी, शासकीय अधिकाऱ्यांची अडेलतट्टू धोरणे, शासकीय कार्यालयांमधील भ्रष्टाचार, शेतकऱ्यांचे सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवन, ग्रामीण परिसरातील खाजगी सावकारी, ग्रामीण भागातील जातीचे राजकारण, आरक्षणामुळे स्त्रियांचा राजकारणात प्रवेश झाला असला तरी वास्तवात स्त्रियांच्या नेतृत्वाला बगल देण्यासाठी सतत प्रयत्नरत असलेली प्रस्थापित मंडळी अशा अनेक अंगांनी ग्रामीण जीवन लेखकाने कादंबरीत मांडले आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या कारणांचा शोध परिपूर्ण करण्यासाठी सारंगस्वामी अनेक लोकांच्या भेटी घेतात. यात आत्महत्येचे पाऊल उचलणाऱ्या शेतकऱ्यांचे कुटुंबीय, कृषी विद्यापीठाचे तज्ज्ञ कुलगुरू, मानसशास्त्रज्ञ, शासनातील आयएएस अधिकारी, शेतकरी संघटनेतील विविध नेते, सेवानिवृत्त महसूल अधिकारी, भूगर्भशास्त्रज्ञ, सरकारातील मंत्री, बहुराष्ट्रीय बियाणे कंपनीतील अधिकारी, साहित्य संमेलनातील कृषिविषयक परिसंवाद व रासायनिक खतांच्या वापरावरील चर्चा करणारे वक्ते, दोर तुटल्यामुळे आत्महत्येतून वाचलेला शेतकरी, ज्यादा व्याजाने कर्ज देणारे खाजगी सावकार, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर कार्य करणाऱ्या परकीय स्वयंसेवी संस्थांमधील पदाधिकारी अशा अनेक लोकांशी चर्चा करून शेतकरी आत्महत्येच्या कारणांचा शोध नायक घेतात. शेतकऱ्यांचे हितैषी असल्याचे सोंग घेऊन आपल्या कंपनीचे बियाणे, व शेतीविषयक उत्पादने विकणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या ढोंगीपणावरही लेखक कादंबरीत भाष्य करतांना दिसतात. कादंबरीतील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमागील भीषण वास्तव वाचकाला अस्वस्थ करीत जाते.

कैलास रायभान दौंड यांची सप्टेंबर २००९ मध्ये प्रकाशित झालेली 'कापूसकाळ' ही कादंबरी कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या विदारक जीवनवास्तवावर प्रकाश टाकणारी कादंबरी आहे. जगन्नाथ गायकवाड या एका कोरडवाहू शेती करणाऱ्या साध्या नायकाच्या माध्यमातून या कादंबरीचे कथानक विस्तारत जात असले तरी नारायणवाडीच्या परिसरातील संपूर्ण कापूसउत्पादक शेतकरीच या कादंबरीच्या नायकाची जागा घेऊ लागतो. शेतीच्या मशागतीपासून ते पीक हाती येईपर्यंत शेतकऱ्याला अनेक दिव्यातून जावे लागते. बियाणे, कीटकनाशके, रासायनिक खते, वाढलेली मजुरी या सर्वांची जुळवाजुळव करता करता मेटाकुटीला आलेला शेतकरी पीक हाती येतांना पाहून थोडासा समाधानी होतो. मात्र हे समाधान फार काळ टिकत नाही. पिकाच्या भरोश्यावर शेतकऱ्यांनी आखलेले भविष्याचे आडाखे नेस्तनाबूत करण्यासाठी बाजारपेठ ही टपलेलीच असते. शेतकऱ्यांना आपले पीक बाजारपेठेत नेण्यासाठी करावी लागणारी पायपीट, त्यासाठी येणारा खर्च, फेडरेशनला कापूस घेऊन गेल्यानंतर तिथे शेतकऱ्यांना येणारे अपमानास्पद अनुभव, टोकन मिळविण्यासाठी करावी लागणारी यातायात, आणि टोकन मिळूनही शेवटी खरेदी केंद्रावर होणारा भ्रष्टाचार हा शेतकऱ्यांच्या मनात चीड निर्माण करणारा ठरतो. एकीकडे टोकन मिळवूनही दोन दोन महिन्यांपासून मापासाठी वाट पाहणारा गरीब शेतकरी आणि दुसरीकडे रात्रीच्या अंधारात पैसे चारून आपल्या कापसाचे माप करवून घेणारे व्यापारी अशा विपरीत अनुभवांमधून शेतकऱ्यांच्या बाजारपेठेतील शोषणाची व्यथा लेखक मांडत जातो. शेतकऱ्याच्या पांढऱ्या-सफेद कापसाला न मिळणारा भाव व्यापाऱ्यांच्या पाणी मारून ओल्या झालेल्या व पिवळा पडलेल्या कापसाला कसा दिला जातो? त्यामध्ये ग्रेडर व आणखी कुणाकुणाचे हितसंबंध गुंतलेले असतात? अशा अनेक प्रश्नांची मांडणी करून, या सर्वांमुळे चीड निर्माण होऊन संघर्ष करणाऱ्या शेतकऱ्यांवर खोट्या केसेस दाखल करून कसे अडकवले जाते, याचे प्रत्ययकारी चित्रण लेखकाने या कादंबरीत केले आहे. 'शेतातील माल पिकवण्यासाठी आलेल्या खर्चापेक्षा मालाला मिळणारा भाव अधिक असावा ही शेतकऱ्यांची किमान अपेक्षा असते, मात्र मध्यमवर्गीय लोक व त्यांच्या दबावात असलेले लोकप्रतिनिधी यांच्यामुळे तीही पूर्ण होत नाही'[४], असे कैलास दौंड कादंबरीच्या प्रस्तावनेत सांगतात.

राजन गवस यांची २०१२ साली प्रकाशित झालेली 'ब, बळीचा' ही कादंबरी आशय आणि अभिव्यक्तीचे नवे तंत्र घेऊन अवतरलेली वैशिष्ट्यपूर्ण कादंबरी आहे. शेती आणि शेतकरी याचे जीवन कवेत

घेण्याचा कितीही प्रयत्न केला तरी, असे प्रयत्न कसे अपुरे ठरतात याचे दर्शन या कादंबरीतून घडते. कलाप्पा कोणकेरी या नायकाच्या डायरीतील पाने, त्याने केलेल्या विविध स्वरूपाच्या नोंदी, चित्रपटासाठी पटकथा लिहिण्याच्या प्रयत्नातून तो घेत असलेला शेतकरी जीवनाचा व एकूणच ग्रामीण व्यवस्थेचा शोध, कातारामजी वडेवट्टीवार या श्रमिक शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्याला त्याने लिहिलेली विविध पत्रे, महात्मा फुले यांच्याशी कल्पनात्मक पातळीवर त्याने साधलेला संवाद अशा विविध मार्गांनी लेखकाने कृषी जीवनाचे चित्रण या कादंबरीतून केलेले आहे. शहरातील चित्रपट व्यावसायिक केवळ रंजनवादी भूमिकेतून खेड्याकडे, शेतकऱ्याकडे कसे पाहतात? चित्रपट व्यवसायातील व्यावसायिक कथालेखक व त्यांनी निर्माण केलेले गट ग्रामीण पटकथा लेखकांना दुय्यम वागणूक देऊन त्यांच्यावर कसे दबाव टाकतात? याचे वास्तव चित्र कादंबरीत दिसते. जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागातील जीवनाची घडी पूर्णपणे विस्कटलेली असून चंगळवादी संस्कृतीचा आणि भोगवादी दृष्टिकोनाचा प्रभाव गावखेड्यावर वाढत चालल्याची जाणीव कादंबरी करून देते. खेड्यातील राजकारणी पात्र असलेल्या लाभार्थ्यांना डावलून स्वतःच्या परिवारातील इतर सदस्यांच्या नावाने शासकीय योजना कशा लाटून घेतात? आपल्या विरोधात जाणाऱ्या सामान्य शेतकऱ्यांची, ग्रामिणांची पदोपदी अडवणूक कशी करतात? त्यासाठी कसे डावपेच आखतात, याचे वास्तव आणि प्रत्ययकारी दर्शन ही कादंबरी घडवते.

शेती ही संस्कृती असल्याची जाणीव करून देऊन तिला उद्योगाचे स्वरूप दिल्याने शेतकऱ्यांची स्थिती सुधारेल असे लेखकाला वाटत नाही. शेतकऱ्यांच्या शोषणाची मुळे ते सांस्कृतिक मूल्यव्यवस्थेमध्येही शोधू पाहतात. महात्मा फुलेंसारख्या समाजसुधारकांनी तत्कालीन शोषणव्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट करून त्यातून मुक्तीसाठी शिक्षण महत्वाचे मानले. मात्र आज ग्रामीण भागातील शिक्षणाची व्यवस्था कशी बकाल झाली आहे यावर ते भेदक प्रकाश टाकतात. शाळा म्हणजे गुंतवलेल्या भांडवलाची वसुली करण्याच्या कंपन्या झाल्या आहेत. स्त्री, शुद्र, अस्पृश्य यांच्या शिक्षणासाठी फुले दांपत्याने जीवाचे रान केले. मात्र काल शोषित असलेला हा वर्ग आज स्वतःच्याच आप्तस्वकीयांचे, समाजबांधवांचे शोषण करीत आहे, आणि त्याबद्दल त्याला काहीही वाईट वाटत नाही, ही विदारक जाणीव कादंबरीतून प्रकट झाली आहे. विविध पदांवर नोकरी करणाऱ्या स्त्रिया, सर्वच जाती-धर्मातील नोकरदार बिनदिक्कतपणे ग्रामीणांचे व शेतकऱ्यांचे शोषण कसे करीत आहेत, याचे वास्तव दर्शन कादंबरीतून घडते. बदलत्या गावगाड्यात विरत चाललेल्या नातेसंबंधांवरचे चिंतनही या कादंबरीत येते. शेतकरी कुटुंबातून शिकून नोकरीवर लागलेले सदस्य पुढे केवळ आपल्यापुरता विचार करून कुटुंबापासून कसे दुरावत जातात, याचे दर्शन कादंबरी घडवते. भोगवादी संस्कृतीच्या प्रभावाने ग्रामीण भागातील नवीन व्यावसायिक, नोकरदार वर्गाच्या नैतिक मूल्यऱ्हासाचे दर्शन घडवून जंगलातील धनगरवाड्यात राहणारी व आपल्यावर वाईट नजर ठेवणाऱ्या वनरक्षकाचे लिंग कापून हाती देणारी केंच्या धनगराची पत्नी या मूल्यव्यवस्थेची संरक्षक असल्याची जाणीव कादंबरीतून होते.

रवींद्र पांढरे यांची २०१६ साली प्रकाशित झालेली 'पोटमारा' ही कादंबरीही शेतकऱ्यांच्या सर्वंकष पातळीवरील शोषणाचे स्वरूप स्पष्ट करणारी कादंबरी आहे. कोरडवाहू आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या कष्टप्रद जीवनाचे वास्तव दर्शन या कादंबरीतून घडते. आपल्या वास्तव स्थितीची जाणीव असल्याने यातून बाहेर पडण्यासाठी धडपडणारी शेतकऱ्यांची मुले नोकरीच्या आशेने उच्च शिक्षण प्राप्त करू लागली. मात्र शहरी मुलांच्या डोनेशनच्या स्पर्धेत टिकाव धरू न शकल्यामुळे शेवटी त्यांना शेतीच करावी लागते, हे भीषण वास्तव प्रकाश पानघरे या नायकाच्या माध्यमातून कादंबरी मांडते. ग्रामीण भागातील शिक्षणाची व्यवस्था व त्यातील वाढत चाललेला भ्रष्टाचार, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे शाळांचे 'संस्काराचे केंद्र' हे स्वरूप बदलून 'पैसे कमविण्याचे साधन असे लाभलेले नवे रूप, ग्रामीण भागातील राजकारणातील संधिसाधुपणा, राजकारण्यांचा शासकीय कार्यालयांतील हस्तक्षेप, वाढलेले रासायनिक खतांचे व कीटकनाशकांचे भाव, वाढलेला उत्पादन खर्च व मिळणारे तोकडे उत्पन्न, कर्ज काढण्यासाठी द्यावी लागणारी लाच, वीज वितरण कंपनीचा हेकेखोरपणा, ग्रामीण भागातील लोडशेडिंग व त्यामुळे पिकांचे व शेतकऱ्यांचे होणारे हाल अशा विविध प्रश्नांची मांडणी या कादंबरीतून लेखकाने केलेली आहे. नोकरी लागेल या आशेने मुलांना शिकविणाऱ्या पालकांना आपल्या उच्चशिक्षित मुलांना शेतात काबाड कष्ट करतांना पाहून कशा यातना सहन कराव्या लागतात ते लीलाबाईच्या व्यक्तिरेखेवरून लेखकाने प्रत्ययकारक रीतीने मांडले आहे. नोकरदारवर्गाचा शेती आणि शेतकरी वर्गाकडे पाहण्याचा दृष्टीकोनही शेतकऱ्यांच्या मुळावर कसा उठतो याचे दर्शन या कादंबरीत घडते.

अशाप्रकारे नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरीने शेतकऱ्यांचे कष्टप्रद जीवनदर्शन घडविण्याचा प्रयत्न केला आहे.

**निष्कर्ष :**

१. नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरी शेतकऱ्यांच्या जीवनाचे वास्तव दर्शन घडवण्याचा प्रयत्न करते. आधीच्या रंजनवादी ग्रामीण कादंबरीच्या कल्पनात्मक ग्रामीण जीवनदर्शन घडविण्याच्या तुलनेत हे जीवनदर्शन म्हणूनच अधिक महत्वपूर्ण ठरते.

२. उत्पादन खर्च व प्रत्यक्ष उत्पन्न यांच्यात मेळ बसत नसल्याने शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अधिकाधिक वाईट होत जात असल्याची जाणीव नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरी करून देते.
३. शेतकऱ्यांच्या विविध पातळीवरील होणाऱ्या शोषणाचे दर्शन नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरी घडवते.
४. शेतकरी कोणत्याही भागातील असो, त्याच्या शेतातून निघणारे पीक कोणतेही असो, शेती कोरडवाहू असो की ओलिताखालील असो, शेती अल्प असो किंवा जास्त, शेती नेहमी तोट्यातच असल्याची जाणीव नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरी करून देते.
५. शेतकऱ्यांच्या अवनत स्थितीला सर्वच ठिकाणी बोकाळलेला भ्रष्टाचारही कारणीभूत असल्याची जाणीव नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरी करून देते.
६. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना कारणीभूत ठरणाऱ्या मूल्यव्यवस्थेचा व सामाजिक, राजकीय, आर्थिक हितसंबंधांचा शोधही नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरी घेते.
७. जागतिकीकरण, मुक्त अर्थव्यवस्था यांचा भारतातील ग्रामीण समाज व शेतकरी यावर विपरीत परिणाम पडलेला असून त्यामुळे शेतकरी अधिक हवालदिल झालेला असल्याची जाणीव नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरी अधोरेखित करते.

अशाप्रकारे नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरीतून शेतकरी जीवन दर्शन घडविणाऱ्या अनेक उत्कृष्ट कादंबऱ्या मराठीत निर्माण झालेल्या आहेत. परंतु त्या सर्वांचाच वेध घेणे येथे शक्य नसल्याने काही निवडक कादंबऱ्यांच्या माध्यमातूनच हा शोध पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भ टिपा :**

१. टीम ॲग्रोवन , 'भारतातील शेतीचा इतिहास हा असा आहे !', https://www.agrowon.com/mukhya-batamya/history-agriculture-india-51703#:~:text=%E0%A4%B6%E0%A5%87%E0%A4%A4%E0%A5%80%E0%A4%B2%E0%A4%BE%20%E0%A4%A8%E0%A4%B5%E0%A4%BE%E0%A4%B6%E0%A5%8D%E0%A4%AE%E0%A4%AF%E0%A5%81%E0%A4%97%E0%A4%BE%E0%A4%A4%20%E0%A4%B8%E0%A5%81%E0%A4%B0%E0%A5%81%E0%A4%B5%E0%A4%BE%E0%A4%A4%20%E0%A4%9D%E0%A4%BE%E0%A4%B2%E0%A5%80%20%E0%A4%85%E0%A4%B8%E0%A5%87,%E0%A4%AC%E0%A5%88%E0%A4%B2%2C%20%E0%A4%98%E0%A5%8B%E0%A4%A1%E0%A5%87%20%E0%A4%B5%E0%A4%97%E0%A5%88%E0%A4%B0%E0%A5%87%20%E0%A4%9C%E0%A4%A8%E0%A4%BE%E0%A4%B5%E0%A4%B0%E0%A5%87%20%E0%A4%AA%E0%A4%BE%E0%A4%B3%E0%A5%80%E0%A4%A4 , Retrieved on May 22, 2022, Time 18:42.
२. ॲडमीन लोकमत, 'शाकाहारींचा देश... भारत', https://www.lokmat.com/jarahatke/vegetarian-country-india/ , Retrieved on May 22, 2022, Time 19:31.
३. विकिपीडिया, 'भारतातील शेतकरी संघटना', https://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%AD%E0%A4%BE%E0%A4%B0%E0%A4%A4%E0%A4%BE%E0%A4%A4%E0%A5%80%E0%A4%B2_%E0%A4%B6%E0%A5%87%E0%A4%A4%E0%A4%95%E0%A4%B0%E0%A5%80_%E0%A4%B8%E0%A4%82%E0%A4%98%E0%A4%9F%E0%A4%A8%E0%A4%BE , Retrieved on May 22, 2022, Time 20:23.
४. दौंड कैलास, 'कापूसकाळ', मॅजेस्टीक पब्लिशिंग हाउस ठाणे, दुसरी आवृत्ती मे २०१५, पृष्ठ क्र. ७.

**संदर्भग्रंथ :**

१. कोळी अशोक कौतिक, 'पाडा', शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, दुसरी आवृत्ती जुलै २०१५.
२. गवस राजन, 'ब,बळीचा', पॉप्युलर प्रकाशन मुंबई, दुसरी आवृत्ती २०१५.
३. जाधव प्राचार्य डॉ. गजानन, 'नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी', अनघादित्य प्रकाशन अमरावती, प्रथमावृत्ती १५ ऑक्टोबर २०२१.
४. देशपांडे भालचंद्र, 'अंधार इथला संपत नाही', रजत प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती २५ मार्च २००८.
५. देशमुख सदानंद, 'बारोमास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, चतुर्थावृत्ती २०१२
६. दौंड कैलास रायभान, 'कापूसकाळ', मॅजेस्टिक पब्लिशिंग हाउस ठाणे, दुसरी आवृत्ती मे २०१५.
७. पांढरे रवींद्र, 'पोटमारा', लोकवांग्मय गृह मुंबई, प्रथमावृत्ती एप्रिल २०१६.

# हवामान बदल समस्या, आव्हाने व उपाय

**प्रा. चंदनशिवे वर्षा वैजनाथ**
सहा.प्राध्यापक, ने.हि.महाविद्यालय, ब्रम्हपुरी, जि.चंद्रपूर
ईमेल : vcganvir25@gmail.com

**सारांश :** प्रस्तुत शोधनिबंधातून हवामान बदलांच्या समस्येला कारणीभूत ठरणाऱ्या घटकांची कारणमिमांसा करण्यात आली असून यासाठी जबाबदारी निश्चित करुन या संदर्भात काय उपाययोजना केल्या जावू शकतात व या समस्यांची तीव्रता व अपेक्षित उपाययोजनाचा वेध घेण्यात आला आहे.

**बिजशब्द :** पर्यावरण, हवामान बदल, जागतिक तापमान वाढ, पुर, जागतिक महासत्ता, संयुक्त राष्ट्रसंघटना, राजकारण.

**प्रस्तावना :**

आधुनिक काळातील मानवजातीला भेडसावणारी प्रमुख समस्या म्हणजे हवामान बदल म्हणजेच पृथ्वीच्या सर्वसाधारण परिस्थितीत असलेल्या तापमानात मोठया प्रमाणात वाढ होणे आहे. ज्याला ग्लोबल वार्मिंग तसेच हरितगृहाच्या गॅसची मोठया प्रमाणात वाढ होणे आहे. हवामान बदलाचे दृश्य परिणाम आता अनुभवास येउ लागले आहेत. हवामान बदलामुळे समुद्राच्या पातळीत वाढ होते. भरतीच्या वेळी वादळ आल्यास पुरस्थिती अधिक गंभीर होते.

“सध्या राजधानी दिल्लीसह उत्तरेकडील राज्यामधल्या प्रदुषणाचा मुद्दा देशभर गाजत असतांना जगभरातील 100 प्रदुषित शहरांमध्ये भारतातील 46 शहरे, चीनमधील 42 शहरे, पाकिस्तानमधील 06 आणि बांग्लादेशमधील 04 शहरांचा समावेश आहे. इंडोनेशिया आणि थायलंड या देशातील प्रत्येकी एका शहराचा समावेश आहे. सर्वाधिक प्रदुषित शहरांमध्ये भारतातील 10 शहारांचा समावेश होतो. हिवाळयात दिल्लीतील हवा सर्वाधिक प्रदुषित असते तर काही ठिकाणी राहण्यायोग्य देखील नसल्याचे बोलले जाते.” मागील काही दशकापासून औद्योगिकरणामुळे व लोकसंख्यावाढीमुळे वातावरण मोठया प्रमाणात प्रदुषित झाले आहे. त्याचा परिणाम हवामान बदलावर झाला आहे. मोठया प्रमाणात होउ घातलेले औद्योगिकरण कार्बन उर्त्सजन करण्यास जबाबदार ठरते. कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण आटोक्यात यावे यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे एक करार करण्यात आला (United Nations Framework Convention on Climate Change (UNFCC)) परंतु प्रचलित आंतरराष्ट्रीय करार वातावरणातील कार्बन उत्सर्जन व हरितगृह वायूचे प्रमाण रोखण्यासाठी आणि वाढत्या सागरी पातळीला नियंत्रणात आणण्यासाठी असमर्थ आहेत. पर्यावरणातील बदलाचा अभ्यास, पृथ्वीवरील वाढती लोकसंख्या आणि उर्जेचा वापर यांच्या आकडेवारीनुसार ठरविला जातो. पृथ्वीचे तापमान येत्या काही वर्षात 1.4 ते 5.8 सेंटीग्रेड एवढे वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पृथ्वीवरील तापमानातील बदल पृथ्वीवरील भुप्रदेशात तसेच उत्तरेकडील रेखांशावर असणाऱ्या देशात अधिक प्रमाणात होतांना दिसतो.

**संशोधनाची यथायोग्यता :**

हवामानबदलांच्या अध्ययनाची यथायोग्यता म्हणजे वर्तमानकाळातील व भविष्यकाळातील मानवी समाजाचे अस्तीत्व ज्यावर आधारले आहे. मात्र बदलत्या परिस्थितीत मानवी महत्वाकांक्षेमुळे उपयोजित सदृश्य परिणाम दिसणास अडथळे निर्माण होतांत त्यामुळे वारंवार या समस्येकडे मानवमात्राचे लक्ष वेधून घेण्यासाठी अशा प्रकारचे संशोधन अत्यावश्यक ठरते.

**उद्दिष्टये :**

1) तापमानवाढीची कारणमिमांसा करणे
2) हवामान बदलांच्या जबाबदार घटकांची चर्चा करणे.
3) हवामन बदलांच्या समस्येवर उपाययोजना सुचविणे.

**गृहिततत्वे :**

1) हवामान बदलांस मानवाची महत्वकांक्षा जबाबदार आहे.
2) हवामान बदलांच्या समस्येमुळे पृथ्वीचा विनाश होउ शकते.
3) सामुहिक प्रयत्नातून हवामान बदलाची समस्या सोडविली जाउ शकते.

**संशोधन पध्दती**

जागतिक हवामान बदल व तापमान वाढ यांचा अभ्यास दुय्यम स्त्रोतांच्या आधारे करण्यात आला आहे. ज्यामध्ये पर्यावरणशास्त्र, संकेतस्थळ, विविध पर्यावरण संघटना यांची मासिके यांच्या आधारे तथ्य संकलन करण्यात आले आहे.

हवामान बदलांच्या समस्येची कारणमिमांसा पुढील मुद्दांच्या आधारे करता येईल.

**1) धृवबिंदुचे स्थानांतरण :**

हवामान बदलामुळे पृथ्वीचा अक्ष बदलला आहे. पृथ्वीच्या तापमानात वाढ होऊन हिमनद्या वितळत आहेत तसेच भुजलाच्या अती वापरामुळे देखील हवामानात बदल होतो आहे. अलास्का तसेच हिमालयासारख्या ठिकाणी अशा प्रकारच्या बर्फ वितळण्याच्या घटनेचा अनुभव मिळत आहे. त्यामुळे पृथ्वीच्या निर्मितीनंतर काही कालावधीत उत्तर व दक्षिण धृव आपापल्या मुळ ठिकाणापासून बाजूला सरकले आहेत. परिणामत: पृथ्वीवरील तापमानात फार मोठी स्थित्यंतरे पहायला मिळत आहेत.

**2) नागरिकरण :**

लोकसंख्या वाढीच्या परिणामातूनच नागरिकरणाच्या प्रक्रियेत मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. लोकसंख्या वाढीच्या परिणामस्वरुप शहरे वाढत जावून नगरे व महानगरे निर्माण झालेली आहेत. त्यामुळे शहराजवळच्या जमीनी जंगले, झाडे कमी होउन त्यांची जागा उंच इमारती, सिमेंट रस्ते, कारखाने हवामान बदलास कारणीभूत ठरत आहेत. शहरीकरणात उपलब्ध संसाधने उष्णता शोषक आहेत. ज्यामुळे उष्णतेचे प्रमाण अधिकाअधिक वाढत आहे. शहराच्या होत असलेल्या विस्तारामुळे तापमानात वाढ होत आहे.

**3) औद्योगिकरण :**

औद्योगिकरणाचा परिणाम प्रामुख्याने हवा, पाणी, माती या सर्वच घटकावर होतांना आढळत आहे. जीवाश्म इंधन जाळल्यामुळे निर्माण होणारा धुर आणि कार्बन उर्त्सजनामुळे वायू प्रदुषण ही सर्वांत मोठी समस्या आहे. शिवाय कारखाने उत्पादनाचे कार्य चालूच ठेवतात तेव्हा वायू प्रदुषण मोठया प्रमाणात होत जाते. विशेषत: नैसर्गिक जलस्त्रोतांच्या शेजारी जर कारखाने असतील तर या कारखान्यातील रासायनिक पाणी, घनकचरा या जलस्त्रोतात सोडला जातो. ज्यामुळे स्थानिक पाणीपुरवठयामध्ये हे विषारी द्रव्य मिसळून पेयजल साठा प्रदुषित होत आहे. ज्याचा थेट परिणाम मानवी आरोग्य व जीवसृष्टीवर आढळून येत आहे. हवेची गुणवत्ता कमी होवून श्वसनाचे विकार जडू लागले आहेत. खरेतर कारखाने उद्योगधंद्यासाठी व पर्यावरण पुरक कायद्याचे व नियमांचे काटेकोर पालन करित नसल्यामुळे या समस्या मोठया प्रमाणात निर्माण झाल्या आहेत.

| अ.क्र. | उद्योगांची नावे | पर्यावरणावरिल परिणाम |
|---|---|---|
| 1) | बांधकाम उद्योग | कार्बन उत्सर्जन, मिथेन वायू उत्सर्जन, तसेच हवा प्रदुषित होउन वैश्विक तापमान वाढ सिमेंट उद्योगामुळे 5% कार्बन उत्सर्जन होते. |
| 2) | इलेक्ट्रॉनिक उद्योग | इलेक्ट्रॉनिक उद्योगामुळे मोठया प्रमाणात घरगुती कचऱ्यात वाढ झाली आहे. इलेक्ट्रॉनिक वस्तू जर योग्यरितीने पुर्नवापर झाला नाही तर त्यातून मोठया प्रमाणात रासायनिक घटक मातीत मिसळल्यामुळे माती प्रदुषित होते. |
| 3) | रासायनिक उद्योग | रासायनिक उद्योगाचा फार मोठा फटका कृषी क्षेत्राला बसला आहे. ज्यामुळे मोठया प्रमाणात जमिनीची प्रत घसरत आहे. हरितगृह वायूची फार मोठया प्रमाणात निर्मिती ही वैश्विक तापमान वाढ व हवामान बदलास कारणीभूत ठरत आहे. |
| 4) | कापड उद्योग | या उद्योगासाठी फार मोठया प्रमाणात जैविक इंधनाचा ज्यातून कार्बन उत्सर्जन मोठया प्रमाणात होते. कपडयांना रंगकामासाठी केमीकलचा वापर धोकादायक आहे. |
| 5) | खाण उद्योग | जैवविविधतेला धोका पाणी प्रदुषण |
| 6) | अन्न व प्रक्रिया उद्योग | 26% हरितगृह वायूचे उत्सर्जन पृथ्वीच्या अर्ध्या भूभागाचा वापर केवळ कृषी उद्योगासाठी होतो. |

**4) जागतिक संघटनाचे प्रयत्न :**

पृथ्वी या आपल्या ग्रहाला वाचविण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटना ही सर्वांत अग्रेसर संघटना आहे. संयुक्त राष्ट्र संघाद्वारे (United Nations Framework Convention on Climate Change (UNFCC)) ची निर्मिती केली आहे. ज्यातील 197 देश सदस्य राष्ट्रे सहभागी आहेत. हवामान बदलास कारणीभूत ठरणाऱ्या मानवी हस्तक्षेपास रोखणे हा या परिषदेचा प्रमुख उद्देश आहे. याशिवाय याच माध्यमातून क्योटो करार, पॅरिस करार आदी करारांच्या माध्यमातून तापमान वाढीवर नियंत्रण ठेवणे व कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमी करणे आदी समान मुद्दयावर जागतिक स्तरावर सर्व राष्ट्रांना एकत्रित आणत त्यांच्यात प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी प्रेरित करण्याचे कार्य नेहमीच संयुक्त राष्ट्र संघ करित आहे.

23 सप्टेंबर 2019 रोजी सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी हवामान शिखर परिषद बोलवली ज्यात शासन खाजगी क्षेत्रातील, नागरी क्षेत्रांशी संबंधीत तथा सामाजिक कार्यकर्ते एकत्रित सर्वांनी हरित अर्थव्यवस्था स्वीकारावी यासाठी मोठया प्रमाणात मतपरिवर्तन घडवून त्यांनी कृतीशील आराखडा बनवून काम करावे हा या शिखर परिषदेचा मुख्य उद्देश होता. 2020 मध्ये पुन्हा यावर आढावा बैठक घेण्यात आली. यासंदर्भात या राष्ट्रांच्या भावी योजनांचा आढावा घेण्यात आला जागतिक वसुंधरा दिवस, जलदिन आदी कार्यक्रमांच्या माध्यमातून संयुक्तराष्ट्र द्वारा आपल्या पृथ्वी या ग्रहाला वाचविण्याच्या प्रयत्नात राष्ट्रांची, व्यक्तीची भूमिका सातत्याने जबाबदारीची जाणीव करुन देण्यास संयुक्त राष्ट्रसंघ प्रयत्नरत आहे असे दिसते.

### 5) जागतिक संघटनाच्या प्रयत्नाचे यशापयश :

संयुक्त राष्ट्र संघटना, जागतिक आरोग्य संघटना तसेच इतरही जगभरातील पर्यावरणवादी संघटना सातत्याने विविध स्तरावर तापमान व हवामान बदलांच्या संदर्भात जाणीव जागृती करण्याचा प्रयत्न करित आहेत. निराश झालेले पर्यावरणावादी राजकारण्यावर आश्वासने पाळण्यासाठी दबाव आणत रस्त्यावर उतरत आहेत. विविध देशांनी कार्बन उत्सर्जन व हरितगृह वायू वर नियंत्रण ठेवण्याचे वचन दिले परंतू हे वचन पाळण्यास काही राष्ट्रे मागे पडत आहेत आणि म्हणून 2018 मध्ये वार्षिक उत्सर्जन 2.1 ने वाढले आहे. कारण चीन आणि भारतासारख्या ठिकाणी कोळशाची मागणी वाढली आहे. चीन सारखे राष्ट्र 2030 पर्यंत कार्बन उत्सर्जनाचा उंचाक गाठणार आहे. त्यामुळे ग्लोबल तापमान 2 डिग्री सेल्सीयस खाली ठेवण्याच्या वचनबध्दतेच्या विरोधात ही बाब आहे. अमेरिकेसारख्या राष्ट्राने 2018 मध्ये कार्बन उत्सर्जन प्रमाण कमी केले आहे परंतू वायू प्रदुषण रोखण्याच्या पॅरिस करारातून बाहेर पडण्याची त्यांची इच्छा आहे. युरोपियन युनियन मध्ये 28 राष्ट्रे आहेत. ज्यांचे कार्बन उत्सर्जनामध्ये 1/5 वाटा आहे. त्यांनी सामुहिक 20% उत्सर्जन कमी केले आहे. पॅरिस कराराचे पालन करण्याच्या हेतूने सामुहिक उत्सर्जन 20% कमी केले आहे. भारतासारख्या देशाचे जागतिक तापमान वाढीत योगदान कमी आहे. परंतू कोळशाचा वापर वाढत असतांना अक्षय उर्जेच्या वापराला प्रोत्साहन देत आहे. सर्वसामान्य लोकांमध्ये पर्यावरण जागृती वाढण्यासाठी, कचरा व्यवस्थापन, प्लास्टीक निर्मुलन आदी चळवळीमध्ये लोक सहभाग वाढून आल्याचे दिसते याला कारण जागतिक संघटना आहेत त्यामुळे सध्यातरी हे ही नसे थोडके म्हणावे लागते.

### 6) महासत्तांचे राजकारण :

जगातील सर्वांत श्रीमंत आणि विकसीत देश हवामान बदलाच्या आपत्तीसाठी मोठया प्रमाणावर जबाबदार असले तरी याचा सर्वाधिक फटका बसणार तो म्हणजे गरिब व अविकसीत राष्ट्रांना विशेषत: अमेरिका, युरोपातील देश यांनी जीवाश्म इंधन जाळून आणि कार्बन उत्सर्जन करुन आपली अर्थव्यवस्था वाढवली. त्यांच्या कारखान्यामधून, घरामधून आणि वाहनामधून आजही कार्बन आणि हरितगृह वायू उत्सर्जन होते. यामध्ये चीन व भारतासारखे देशही या उत्सर्जनाच्या स्पर्धेत सहभागी झाले तरीही श्रीमंत राष्ट्रे पर्यावरणीय आपत्तीकडे जगाला नेत आहेत. ज्याचे गंभीर परिणाम अर्थातच गरबि राष्ट्रांना भोगावे लागतात उदा. सखल भागात असलेला बांग्लादेश वाढत्या चक्री वादळाच्या समस्येने त्रस्त आहे. काही वर्षांनी त्याचा 10% भुभाग समुद्रात गमावण्याची शक्यता आहे. ज्यामुळे 18 दशलक्ष लोक विस्थापित होउ शकतात. राजकीय अस्थिरता आणि हिंसाचार, काही प्रमाणात दुष्काळ आणि खराब पीक परिस्थिती यामुळे उप-सहारा, आफ्रिका आणि मध्य अमेरिकेतील लोकांना स्थालांतरित करावे लागले. यावरुन असे म्हणता येते की, जगातील सर्वच लहान-मोठे श्रीमंत-गरिब राष्ट्रे तसेच प्रत्येक व्यक्ती संस्था यांनी जागतिक राजकारणाच्या पलिकडे जाउन केवळ मानव जातीचे कल्याणाचा व अस्तित्वाचा विचार करुन हवामान बदलाच्या समस्येसंदर्भात कार्य करण्याची गरज निर्माण झाली आहे.

### 7) जागतिक तापमान वाढीचे परिणाम :

जागतिक तापमान वाढीचे परिणाम एकदम दिसून येत नाहीत मात्र प्रदिर्घ काळाच्या निरिक्षणातून या विषयीचे भाकीत करता येते. यामुळे जगातील दरवर्षी 45000 चौ.मैल क्षेत्रफळातील जंगल तोडण्यात येते. तसेच 23 टक्के सस्तन प्राणी आणि 30 टक्के जलचर प्राणी आणि 10 टक्यापेक्षा जास्त पक्षी नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत त्यामुळे जागतिक तापमान वाढीचे दृश्य परिणाम दिसून येत आहेत.

अर्थात जागतिक तापमान वाढ हि समस्या जागतिक असून त्याचा परिणाम आणि प्रभाव जागतिक स्तरावर जाणवतो.

1) पुढील वर्षामध्ये जागतिक तापमान 2 ते 3 सेंटीग्रेट वाढल्यामुळे जगातील अर्ध्या भागातील जैवविविधतेला धोका निर्माण झाला आहे.
2) जंगल नष्ट झाल्यावर भुस्खलन, कार्बन उत्सर्जन, आदी समस्या मोठया प्रमाणात निर्माण झाल्या आहेत.
3) हवामान बदलाचा परिणाम कृषीक्षेत्रावरही मोठया प्रमाणात आढळून येतो.
4) हवामान बदलामुळे हिमनदया वितळत आहेत व समुद्र पाण्याच्या पातळीत मोठया प्रमाणात वाढ होत आहे. त्यामुळे पुरपरिस्थिती निर्माण होण्याचा धोका निर्माण झाला आहे.
5) पाणी प्रदुषणामुळे पेयजल साठे दुषीत होत आहेत.

**निष्कर्ष :**

वरिल संपूर्ण अध्ययनावरुन असा निष्कर्ष काढता येतो की, हवामान बदलाचा परिणाम सर्वच जैविक घटकावर होत आहे. व अजैविक घटकातही बदल होत आहे. अर्थात या तापमान वाढीमुळे पृथ्वीवरील जिवसृष्टीस धोका निर्माण झाला आहे. मात्र सत्तास्पर्धा, जागतिक सत्तांची मनमानी मुळे जबाबदारीने हवामान बदलांच्या समस्येला सोडविता येत नाही अर्थात जागतिक स्तरावर होणाऱ्या सामुहिक प्रयत्नातून या समस्या सोडविता येणार आहेत.

**उपाययोजना :**

1) पर्यावरण शिक्षण, जनजागृती व शासनास सहभाग गरजेचे आहे.
2) वृक्षारोपण, वनीकरण, वनसंर्वधन, वनसंरक्षण सारख्या उपाययोजनाची कोटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी.
3) हवा प्रदुषणावर नियंत्रण करण्यासाठी संयत्रे बसवून नियमित सर्वेक्षण करुन उपाययोजना करण्यात याव्यात.
4) अणुस्फोट चाचण्या, युध्दात रासायनिक व जैविक शस्त्राचा वापर यामुळे हवा विषारी होत आहे. यामुळे अणुस्फोट चाचण्यांना प्रतिबंध करणे, तसेच शस्त्रस्पर्धेला आवर घालण्यासाठी संयुक्त प्रयत्न करणे आवश्यक आहे.
5) संयुक्त राष्ट्रसंघटना, जागतिक आरोग्य संघटना, क्षेत्रीय आधारावर निर्मित विविध पर्यावरण संरक्षण संघटना आदि संघटनाना सहकार्य करित जागतिक महासत्तांनी पर्यावरण पुरक धोरणे राबविणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

1) https://www.ipch.ch
2) https://www.un.org
3) कित्ता
4) https://foodbank.com
5) https://www.un.org
6) सामना ऑनलाईन 26 डिसेंबर 2021
7) डॉ.देसाई संभाजी, 'जागतिक पर्यावरण समस्या, आव्हाने व उपाय', प्रशांत पब्लीकेशन्स, जळगाव, प्र.आ. 12 फेब्रुवारी 2017, पृ.क्र.184
8) डॉ.पंडित बापट सुरेखा, 'पर्यावरणशास्त्र', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
9) डॉ.घारपूरे विठ्ठल, 'पर्यावरण भूगोलशास्त्र', पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.
10) Climate Change 2001 : Synthesis Report Intergovernmental Panel on Climate Change Geneva Switzerland 2001
11) Report on, 'National Mission for sustainable Agriculture' Strategis for meeting the Challenge of Climate Change, Report Published by Department of Agriculture and Co-Operation, Ministry of Agriculture New Delhi.

*'Journal of Research & Development'*
*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,*
*Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, June 2022, Volume-14, Issue-6*

# "आंबेडकरवादः एक विद्रोही दर्शन"

**प्रा. डॉ मंगल ससाणे**

विद्या प्रतिष्ठान का, कला , विज्ञान एवं वाणिज्य महाविद्यालय, विद्यानगरी , बारामती, जिला - पुणे 413133

Email: mksasane72@gmail.com

**शोध सार :** आंबेडकरवाद भीमराव अम्बेडकर का दर्शन माना जाता है। इसमें व्यक्ति हो या संघटन डॉ. बाबासाहब जी द्वारा प्रेरित मूल्ये जो मानवी जिंदगी के लिए हितावह हो तथा उनके विचारों को माननेवाला अनुपालन करनेवाला, सभी विचारों को जिंदगी भर जिया या किया में उतारनेवाला ही आंबेडकरी विचारों का सच्चा पाईक होता हैं। डॉ. बाबासाहब ने वेद, पुराण, गीता को कभी कोई महत्व नहीं दिया और यही ताकतवर कारण ही जिसकी वजह से उन्होंने हिंदू समाज, की सामाजिक तथा धार्मिक संहिता मनुस्मृति' का सार्वजनिक रूप से दहन किया । मतलब पडयंत्रकारी, या मनुवादी पाखण्ड को इस तेज तुफान ने जला दिया । मेरी दृष्टि से यही डॉ. आंबेडकर का विद्रोही दर्शन सामने आता है। उन्होंने जातिव्यवस्था विरोधी मुहिम की शुरुआत की । हिंदुत्व, पाखंडी वेद, पुराण में आस्था रखनेवाले ब्राह्मणों को धर्म के रूप में चुनौती दी। जो इस सड़ी गली जातिव्यवस्था को बढ़ावा देते हैं। उपर्युक्त विचारों का मार्मिक चिंतन करते हुए आंबेडकरवाद का यही सारगर्मित उद्देश्य सामने आता है। जो डॉ. तेजसिंह व्यक्त करते है " आंबेडकरवाद संपूर्ण मानवसमाज के लिए उन मूल्यों को स्थापित करना चाहता है, जो समता, स्वतंत्रता और बंधुत्व पर आधारित हो । इसलिए उनमें मानव कल्याण की सर्वोपरि है। समता स्वतंत्रता और बंधुत्व में ही व्यक्ति स्वातंत्र्य की भावना निहित है। एक व्यक्ति एक मूल्य सामाजिक लोकतंत्र का आधारबिंदू है। इसलिए शब्द-प्रमाण और ग्रंथ- प्रमाण की अवधारणा को अस्विकार करता है।" 1

इतिहास इस बात का गवाह है कि जब सामाजिक संक्रमण एवं अत्याचार आघात, संघर्ष हुए है। समाज में घटित इन घटनाओं से निजात दिलाने के लिए समय समय पर महापुरुषोंका जन्म भी हुआ है। इन महापुरुषोंने समकालिन व्यवस्था में व्याप्त मानव विरोधी तत्वों की आलोचना के साथ उसका सही विकल्प भी सुझाया। हमारी कयाकथित हिंदू समाज की सनातनी व्यवस्था जिसमें भारतीय दीन दलित समाज अज्ञानांधकार की खाई में तडपन के साथ चातुर्वर्ण्य की व्यवस्था में पिसन के साथ दरिद्रता की आग में जल रहा था। ऐसे समय में सन् १८९१ के १४ वीं अप्रैल के दिन महु नामक गाँव की सरकारी छावनी में माता भीमाई ने इस लाल को जन्म दिया। पिता रामजी सकपाल हर्ष से ओतप्रोत हुए ।भारतीय दलित समाज को संविधान शिल्पी बाबासाहेब आंबेडकर जी के विचारों का योगदान प्राप्त होता है। हजारों वर्षों से पीड़ित शोषित, दलित अछूतजन, शाषक -शोषक, सवर्ण वर्गों के जघन्य एवं अमानवीय शोषण दमन अन्याय के विरुद्ध संघर्ष को संगठित रूप देने का कार्य सर्व प्रथम अदभूत प्रतिभा सराहनीय निष्ठा, न्यायशीलता, स्पष्टवादिता के धनी परमपूज्य डॉ बाबासाहेब जी को जाता है। दलित साहिता की निर्मिती का मूलस्त्रोत उनकी विचारधारा है ।जो आंबेडकरवाद के नाम से परिचित है।

डॉ. बाबासाहेब आंबेडकरने दलितों का दुःख अवहेलना नजदिक से देखी थी । वर्णवादी तथा वर्गवादी समान में दलितोंपर होनेवाले अन्याय अत्याचार देखे भी और समय-समय पर सहन भी किए थे। उन्होंने दलितों को उनको दासता का बोध कराया और मुक्ति की स्पष्ट अवधारणा सामने रखी । सन १९२८ में बाबा साहब ने सबसे पहले महाड़ में अछूतों के लिए सार्वजनिक तालाब का पानी लेने हेतु सत्याग्रह किया। यह पहला अछूतों के लिए जश्न था। जो अपने मानव अधिकारों के लिए घरों से निकलकर सड़कों पर आये थे। दलित चेतना तथा विद्रोह का पहला प्रखर स्वरूप यह था। इस अवसर पर बाबासाहब ने हिन्दु धर्म पर तीखे प्रहार किए और मनुस्मृति को जलाकर दलितों को समान अधिकार दिलाने का अभूतपूर्व अलख जगाया। सन १९३५ में बाबासाहब ने ढेर सारे ग्रंथों का निर्माण किया। वैचारिक क्रांति के लिए उन्होंने " ३१- जनवरी १९२० में उन्होंने ' "मूक नायक '

नामक" पत्रिका शुरू की । सन १९२७ में "बहिष्कृत भारत" प्रसिद्ध की।" **2** दलित छात्रवासीस्कुल खोला। नागपूर सम्मेलन, पूना ऍक्ट, गोलमेज परिषद आदि के द्वारा दलितों में चेतना जगाई और दलितों के उद्धार के कदम तेज किए। जगायी और दलितों के उदार के कदम तेज किए। डॉ बाबासाहेब के विचारों से प्रभावित होकर दलित बड़ी संख्या में आंदोलन का हिस्सा बनने लगे। इसके माध्यम से दलित समाज प्रबोधित होता रहा। डॉ. बाबासाहब ने अपने समाज को स्वाभिमान, स्वावलंबन और स्वोध्दार की प्रेरणा देते हुए शिक्षा संगठन और संघर्ष का मार्ग दिखाया। वे निर्धार पूर्वक कहा करते थे कि " यदि गुलाम को उसके गुलाम होने का एहसास करा दिया जाए तो वह फिर गुलाम नहीं रहेगा वह गुलामी की बेड़ियों को तोड़ देगा" जिन्होंने भोगा है सहा है आपका अनुभव किया है उसके पास से विद्रोह हो ही मिलेगा। इस गुलामी और दास्तां पूर्ण जीवन से दलितों में चेतना जगाने का काम डॉक्टर अंबेडकर जी ने किया | " **3**

डॉ. आंबेडकर शिक्षा को अधिक महत्व देते थे । वे स्वयं आजीवन अध्ययनरत रहे थे। डॉक्टर बाबा साहब जी पर अपने गुरु ज्योतिबा फुले जी के विचारों का गहरा असर था ।उनके पद चिन्हों पर अविरत चलने का उन्होंने प्रण किया था ।जिस राह से वे गुजरे थे उन्हीं चिन्हों को ढूंढने का अविश्राम प्रयत्न वे करते रहे। महात्मा फुले जी ने पहचान लिया था कि दलितों में शिक्षा का अभाव है । इस कटु सत्य को उन्होंने निम्न शब्दों में व्यक्त किया है। जिसे मु .ब .शाह ने अपने ग्रंथ में उद्धृत किया है-

" विद्या बिना मति गयी।
मति बिना नीति गयी।
नीति बिना गति गयी |
गति बिना वित्त गया ।
वित्त बिना शूद्र गए ।
इतने अनर्थ एक अविद्या ने किये ।। " **4**

यह सुविदित है कि वे जीवन के अंतिम क्षण में भी लिख रहे थे। उन्होंने शिक्षा के लिए दलितों को प्रेरित किया। धीरे धीरे शैक्षिक वातावरण की हवा दलितों को छूने लगी और परिवर्तन की लहर दौड़ने लगी। शैक्षिक क्षेत्र के साथ साथ राजकीय क्षेत्र में भी दलितों को अधिकार प्राप्त हो इसलिए उन्होंने "इंडिपेन्डेन्ट लेबर पार्टी "का निर्माण किया जिसमें मुख्यत: मजदूर, किसान तथा मध्यवर्ग के लोग शामिल थे। साम्यवादियों तथा समाजवादीयों के साथ मिलकर मुंबई में संयुक्त ट्रेड यूनियन संघर्ष किया "ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट फेडरेशन" का गठन किया ।मजदूरों की ओर से सदस्य के रूप में वायसराय की कार्यकारणी समिती की सभा में भाग लेना। काँग्रेस के भारतीय शासक वर्ग के रूप में वर्ग चरित्र तथा विचारधारा का विश्लेषण करना "ऑल इंडिया शेडयूल्ड कास्ट फेडरेशन" की ओर से संविधान सभा में संविधान के मसौदे का प्रस्तुतीकरण जिसमें भूमि तथा प्रमुख उदयोगों के राष्ट्रीयकरण के साथ "राज्य समाजवाद" का भी प्रस्ताव रखा गया था। मद्रास में पेरियार के साथ मुस्लिम लीग के संम्मेलन में भी हिस्सा लिया था। कांग्रेस के सहयोग से बबई से संविधान सभा के लिए पुनः निर्वाचित होना तथा प्रारुप समिति के अध्यक्ष के रूप में कार्य करना । कानून मंत्री के रूप में कार्यभार संभालना तथा संविधान प्रस्तुत करना हिंदू संहिता बिल का मसौदा तैयार करना तथा नेहरु कांग्रेस और हिन्दू महासभा द्वारा सहयोग न मिलने से उस मंत्रीपद को भी उन्होंने त्याग दिया था। सन १९५६ में महाराष्ट्र के नागपूर में लाखों अनुयायियों के साथ बौद्ध धम्म का स्विकार करना। साथ ही साथ "रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया का गठन करना "और सार्वजनिक जलाशयों से पेयजल के लिए अछूतों के अधिकारों की प्राप्ति हेतु" बहिष्कृत हितकारिणी सभा" का गठन "चादर-टेक आंदोलन" तथा" कालाराम मंदिर में अछूतों के प्रवेश" हेतू नासिक में सत्याग्रह करना उन्होंने दलितों को सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रों में अधिकार दिलाने के लिए अविरत कष्ट उठाये तथा उपर्युक्त क्षेत्रों में अपना स्थान बनाए रखने के लिए शिक्षा यह एकमात्र प्रभावी माध्यम स्वीकार किया।

डॉ. बाबासाहब जी के विचारों का दर्शन दलित सामाजिक क्रांती से इस प्रकार होता है, जैसे सन १९५० में ""दलित साहित्य संघ" की स्थापना महाराष्ट्र में होती हैं। सन १९५३ ई.स में अप्पा रणशिंग ने "जनता" साप्ताहिक पत्रिका में दलित साहित्य की

सत्तालोचना पर बहस की थी। सन १९५५ में नागपूर में "जयभिम" साप्ताहिक के "दलित साहित्य अनास्था" नामक लेख छापा था। ई.स. १९६१के बाद तो दलित साहित्य का काफी विकास हुआ "दलित साहित्य संसद"; "बौद्ध साहित्य संसद", "दलित सेवक संघ", "मिलिद साहित्य परिषद और संगठन व संस्थाएँ "आदि में मूल विचार डॉ. बाबासाहब जी के होने के नाते दलितों के जीवन में सुधार ही सुधार आये। डॉ.आंबेडकर जी इस सड़ी-गली व्यवस्थाको बदलने के लिए सतत संघर्ष किया और अपने क्रांतिकारी विचारों का योगदान दलितों को दिया ताकि उस समुदाय में अन्याय के प्रति संघर्ष, विद्रोह करने की शक्ति पैदा हो। सबमूच उनका कार्य इतना अनमोल था। डॉ. बाबासाहब जी हमेशा इस बात के हिमायती थे कि हिंदू मानसिकता में परिवर्तन लाना और जाति व्यवस्था का निर्मूलन करना । समता, स्वाधिनता, बंधुता और सामाजिक न्याय आदि मूल्योंपर आधारित बौद्ध धर्म का स्विकार करना। वह धर्म जो अपने अनुयायियों को कुत्तों तथा अपराधियों से बद्तर मानकर असहनीय, अयोग्यता, आरोपित करता है वह कोई धर्म नहीं है। धर्म में इस प्रकार की अन्याय पूर्ण व्यवस्था के लिए कोई स्थान नहीं है। धर्म और दासता परस्पर विरोधात्मक है। क्योंकि जो धर्म किसी वर्ग को शिक्षा न ग्रहण करने दे ,धन संचय न करने दे वह धर्म न होकर मनुष्य के लिए विडम्बना है। इतना सबकुछ करने के पश्चात भी हिंदू समाज के सनातनी ठेकेदारों की ब्राह्मणवादी मानसिकता में बदलाव नहीं आया। परिणामस्वरूप विश्वभूषण परमपूज्य डॉ. बाबा साहब, गौतमबुद्ध के धर्म को स्विकार करते हैं। उन्होंने हमें वर्तमान तथा भविष्य में पाँव गढ़ाने का सामर्थ्य दिया। उनका दर्शन ही हमारी पीढ़ी का कायाकल्प है। उनकी विचारधारा का परिचय ही दलित साहित्य की निर्मिती रही। जिसके कारण दलित कवि, कहानीकार, उपन्यासकार अपनी अपनी अलग पहचान देने लगे।

आंबेडकरवादी विचारों का अंतिम लक्ष्य एक हो था और वह था शोषण मुक्त समाज का निर्माण करना तथा हर मनुष्य स्वाधिनता, समानता, बंधुता और सामाजिक न्याय का लाभार्थी हो। सभी भारतीय भाषाओं में लिखा साहित्य अक्तूबर की क्रांति से प्रभावित रहा। समाज को सही दिशा देनेवाले डॉ. अविडकरजी का महापरिनिर्वाण होने के बाद दलित दिशाहीन हुऐ लेकिन उनके शीर्षस्थ अनुयायियों ने इस धुरा को संभाल भी लिया। दलितों के लिए यह सुनहरा मौका मिला भी तो मिला सिर्फ भारतीय संविधान के अमर शिल्पी सामाजिक क्रांति के सूर्य राष्ट्रवादी देशभक्त समता के प्रतीक विशिष्ट मानवतावादी, शोषणमुक्त समाज के स्वप्न द्रष्टा, कुलीनता और हीनता की भावना के समाप्तिकर्ता, भारतीय जन-चेतना के प्रतिक साधारण परिवार का एक असाधारण व्यक्तित्व, सामाजिक न्याय एवं दलित क्रांति के प्रणेता स्त्री-हितों के हिमायतो, कातिकारी युगपुरुष, दलितों शोषितों के मसीहा तथा आधुनिक भारत के निर्माता बोधिसत्व के रूप में जाने जाते हैं। ऐसे युगपुरुष डॉ. आंबेडकरी जी के अमुल्य विचारों को।जिनका योगदान आज कोटी- कोटी दलित समाज पर है। अगर वे संविधान कमी ना होते तो समस्त दलित समाज अंधकार की खाई में ही रहता तथा उनका कर्तृत्व तथा विचारों का दर्शन अगर ना होता तो विरोध विद्रोह चेतना का कभी विचार भी ना किया जाता। आज का दलित जहां कहीं है वह सिर्फ डॉ. बाबासाहय आबेडकरजी के योगदान से ही। उन्होंने समाज के दीन दुखियों शोषितों, पीड़ितों, पददलितां उपेक्षितों तथा ऐसे नर नारीयों को नया जीवन दिया। जिन पर सदियों से अत्याचार ढाये जाते थे। अगर बाबासाहबजी भारतीय दलित समाज के मसीहा बनकर न आते तो शायद जूल्मों का यह अन्तहीन सिलसिला रुकने का नाम न लेता। इसलिए वे दलितों से कहते अपमानित होकर जीवित रहना धिक्कार है। "दलित स्वावलंबी बनें, आत्मसम्मान पैदा करें और हीन- भावना का त्याग कर शिक्षित व सक्षम बनें।" 5 स्वाभिमान जीवन के लिए अति आवश्यक है। स्वाभिमान के साथ जीवित रहने के लिए मनुष्य को कठिनाइयों का सामना करना पड़ता है। कठिन एवं तीव्र संघर्ष से ही शक्ति, विश्वास और आदर प्राप्त होता है और यह तब ही संभव है जब बहुजन भाग्य, भय तथा भगवान के मायाजाल पाखण्ड से मुक्त होगा और अत्त दीप भवः के आलोक में अपने पैरों पर खड़ा होगा। ऐसे विश्वभूषण

परमपूज्य डॉ. भीमराव रामजी आंबेडकरजी के प्रति मेरे कोटी कोटी प्रणाम...|

**निष्कर्ष:-**

दलित साहित्य की प्रेरणा डॉ. बाबासाहब उनका दर्शक तथा आंदोलन है। दलित साहित्य मनुष्य - मनुष्य का भेद मिटाने की लिए हमेशा चाह रखता है। वह मानवता का वाहन बनना चाहता है। दलित कवि , लेखक आदि ने अपने काव्यों के माध्यम से समाज सुधार, अपने हक ,समानता, सामाजिक पुनरुत्थान ,मुक्ति की अपेक्षा, चेतना की शिक्षा , महामानवों के विचारों की दीक्षा सम्मान की चाहत, जीवन की समीक्षा करने वाला साहित्य विचार, अपनी कविताओं के माध्यम से प्रस्तुत किए हैं। वे चाहते है वह भी इस भूमि के हकदार है, अपने हैं और उनको अपने अधिकार मिलने चाहिए | यही वैचारिक मंथन इन कविताओं से समाजव्यवस्था के बीच प्रस्तुत किये हैं । जो अधिकार सम्मान की अविरत माँग करता है। ऊँची शिक्षा लिए बिना कोई आगे नहीं बढ़ सकता यही रास्ता आंबेडकरवाद का है। आंबेडकरी विचारधारा का अर्थ ही यही है शिक्षा, संगठन , अन्याय, अत्याचार तथा उत्पीड़न के खिलाफ संघर्ष करना है।

**संदर्भ**

1 आंबेडकरवादी साहित्य-विमर्श - ईश गंगानिया पृ, क्र – 44

2 दलित उपन्यास एवं आत्मकथा साहित्य – डॉ. मंगल ससाणे , पृ, क्र – 22

3 संदर्भ -दलित विमर्श - डॉ -धीरजभाई वणकर पृष्ठ -९

4 संदर्भ -दलित चेतना और समकालीन हिंदी उपन्यास - डॉ. मुन्ना तिवारी - पृष्ठ – ३५

5 दलित विमर्श के आलोक में - डॉ. रश्मि चतुर्वेदी। पृष्ठ - १२८

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि भूकनायक

अपेक्षा अम्बेडकरवादी साहित्य का मुखपत्र (30-31 जनवरी-जून 2010)

दलित शिखरों के साक्षात्कार - डॉ. यशवंत वीरोदय

**Chief Editor**
Dr. R. V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102
Email- rbhole1965@gmail.com
Visit-www.jrdrvb.com

**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102